

# लिंकन

म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.
REFBK-0009838

# एब लिंकन

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९८३८
ठाणे (स्थळ प्रत)

वसंत दावतर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २३५२४ विः
क्रमांक ३५ नों: दिः ९३।११५८

REFBK-0009838

एक रुपया पन्नास नये पैसे

(१-५०)

कैलास प्रकाशन ६

प्रथमावृत्ति
मार्च १९५८

: मूळ लेखक :

स्टर्लिंग नॉर्थ

✤

: मराठी अनुवाद :

वसंत दावतर

✤

: मुद्रक :

व्यं. रा. शिगरे,

सर्वोदय मुद्रणालय,

४५० बुधवार, पुणें २.

✤

: प्रकाशक :

कैलास प्रकाशन,

१२ त्रिभुवन रोड,

मुंबई ४.

कैलास प्रकाशन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ..... दि. .....

## नॅन्सीचें बाळ

" माझी जीवनकथा एका वाक्यांत सांगतां येईल. 'गरिबाच्या आयुष्यांतील लहानसहान व साध्यासुध्या घटना'—हें 'ग्रे'च्या 'एलेजी'मध्यें आपणांस आढळणारें तें वाक्य होय."

— ए. लिंकन.

नऊ वर्षांचा डेनीस हँक्स लिंकनच्या झोपडीकडे जाणाऱ्या वाटेनें झपाझप जात होता. नॉलीन क्रीकला वळसा घालणाऱ्या गवताळ डोंगरांत भरकटलेल्या अनेक वाटांपैकीं ती एक वाट होती. ह्या वाटेनें वर्फाच्या थराचीं डबकीं ओलांडीत आणि वाटेवर बर्फानें गोठलेल्या चाकोऱ्या टाळीत तो हळुवार पावलें टाकीत चालला होता.

त्या दिवशीं १८०७ सालच्या फेब्रुवारी महिन्यांतली बारा तारीख होती. दिवस रविवारचा होता. अमेरिकेच्या इतिहासांत ज्याची दीर्घकाल स्मृति ठेवली जाणार होती असा हा दिवस. हा काळ हिवाळयाचा होता. सकाळच्या थंडीतून जातांना डेनीसला इतकेंच माहीत होतें कीं, टॉम आणि नॅन्सी हँक्स लिंकन ह्यांना मुलगा झाला होता आणि त्याचें नांव अब्राहम ठेवलें होतें.

ह्या वाटेनें डेनीस लिंकनच्या घरीं अनेकदां आला होता. नॅन्सी लिंकन ही डेनीसची चुलत बहीण. त्याचीं काका–काकी, टॉम व बेट्सी स्पॅरो अतिशय प्रेमळ होतीं. त्यांनींच ह्या दोघां भावंडांचें संगोपन केलें होतें. साहजिकच लिंकन कुटुंबाला असें वाटत होतें कीं, आपल्या ह्या नव्या मुलाला

पाहायला सर्वांआधीं कोणी यावें, तर तें स्पॅरो कुटुंबांतील मंडळींनीं आणि असें त्यांस वाटावें ह्यांत नवलाचें कांहींच नव्हतें.

उघड्यावर आल्यानंतर डेनीस झपाट्यानें जाऊं लागला. झपाझप चालतांना अस्वली कातडीच्या त्याच्या टोपीचें मागील लांबट टोंक वाऱ्यावर उडूं लागलें होतें. तो लिंकनच्या झोपडीच्या जवळ आला तेव्हां त्याला धुराड्यांतून बाहेर पडणारा सरपणाचा निळा धूर दिसूं लागला होता. आणि छोटा एब कोणासारखा दिसत असेल, हा विचार त्याच्या कुतूहलाचा बनला. साधारणपणें डेनीस लहान मुलांसंबंधीं फारसा विचार करणारा मुलगा नव्हता. पण नॅन्सीच्या बाळाबाबत कांहींतरी निराळें असावें!

त्या एकखणी झोपडीचें दार उघडून डेनीस आंत आला; तेव्हां शेकोटी-जवळ त्याला जें दिसलें, तें तो आयुष्यांत प्रथमच पाहत होता. थकलेल्या पण हास्यवदन नॅन्सीच्या कुशींत तें इवलेंसें बालक होतें. हेंच बालक एक दिवस अमेरिकेचा सर्वांत आवडता अध्यक्ष होणार होतें!

बऱ्याच वर्षांनीं– डेनीसच्या म्हातारपणची गोष्ट. थंडींतून तो लिंकनकडे गेला त्या दिवसाची गोष्ट राहून राहून सगळ्यांना सांगण्यांत त्याला आवडूं लागलें होतें. ही गोष्ट सांगतांना म्हाताऱ्या माणसांच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें तो कांहीं मालमसाला पदरचा घालीत असेल किंवा जें घडलेंच नाहीं तें घडलें होतें असेंहि सांगत असेल. असें सांगतांना कांहीं प्रसंग तो कल्पनेनें रचून सांगत असेल. पण त्यानें सांगितलेली गोष्ट ऐकणाराच्या आठवणींत चांगलीच राहत असे–तो ती कधींच विसरत नसे–इतकें मात्र निश्चितच.

'नॅन्सी बांबूच्या पलंगावर पहुडली होती. ती आनंदांत होती. टॉमनें शेकोटी चांगलीच धगवली होती; आणि उबेसाठीं त्यानें वरील जाळीवर अस्वलाचीं कातडीं पसरलीं होतीं.'

'बेट्सी स्पॅरोची धांदल चालू होती. एखाद्या स्त्रीला बाळबाळंतिणीचें ज जें काम करतां येण्यासारखें असेल, तें सारें बेट्सी करीत होती. लहानग्या

एबला तिनें न्हाऊं घातलें; लोकरी लिननचा सदरा त्याच्या अंगांत घातला; आणि वर जाडयाभरडया लोकरीचा कोट चढविला. नॅन्सीसाठीं तिनें बेरीचीं सुकीं फळें रांधलीं. ह्यानंतर तिनें इतर सामानाची आवराआवर केली...'

नॅन्सीनें बाळाला डेनीसजवळ दिलें. डेनीसला त्याचा चेहेरा 'चेरीच्या लगद्यासारखा स्निग्ध, तांबूस आणि मांसल वाटला. तसेंच तो वाळलेला व सुरकुतलेलाहि दिसला.'

'नीट घे बरं त्याला; मुलाची संवय नाहीं त्याला. मुलगा असा पहिल्यानें तूंच दृष्टीस पडतो आहेस त्याच्या.' नॅन्सीनें डेनीसला सांगितलें.

थोडया वेळानें बाळ रडूं लागला. तसें डेनीस आपल्या काकीला म्हणाला, 'काकी, ह्याला आधीं घ्या. मला कांहीं ह्याचं भाग्य थोर दिसत नाहीं.'

डेनीसनें सांगितलें तसेंच घडण्यासारखी वास्तविक परिस्थिति. लिंकन काय किंवा हँक्स काय, दोन्ही दरिद्री कुटुंबें. त्यांतल्यात्यांत हँक्स कुटुंब अधिक दरिद्री. तेव्हां हें मूल पुढेंमागें थोर आणि प्रसिद्ध पुरुष होईल, अशी कल्पना तरी त्यांना कशी करतां येईल ?

छोटया एबचें पहिलें वर्ष पाळण्यांतच गेलें. अन्न, ऊब, आणि वात्सल्य ह्यांशिवाय दुसरी कशाची सुद्धां त्याला गरज नव्हती. ह्या काळांत असेंच पाळण्यांत पडल्या पडल्या त्याला काय काय दिसत असेल बरें? शेकोटींतील विस्तव, कापूस किंवा लिननचे तंतू पिंजणारें फिरतें यंत्र, आईचा त्याच्याकडे बघणारा वत्सल चेहेरा, आणि कदाचित् शेकोटीच्या वरच्या अंगाला असलेल्या खुंटीवरील शिकारी बंदूक काढतांना दिसणारा टॉम लिंकनचा काळ्या राठ केसांचा उग्र चेहेरा इतकें त्याला दिसत असावें. ह्याशिवाय आणखी एक चेहेरा त्याला वारंवार दिसे, तो त्याच्या दोन वर्षांच्या बहिणीचा–साराहचा. ती मायेनें आणि कौतुकानें त्याच्याकडे बघे; त्याला झोंके देई; तो हंसला म्हणजे आपण हंसे; आणि आपल्याशीं बोलायखेळायला तो मोठा कधीं होणार तें वारंवार विचारीत राही.

होतां होतां अब्राहमला दुसरें वर्ष लागलें. बहिणीचें बोट धरून तो शक्य तितकें नीट चालूं लागला होता. असाच फिरतांना ह्या काळांत त्यानें आपल्या शेतांतील ' वासंतिक निर्झर ' हा सुप्रसिद्ध निर्झरप्रवाह पाहिला असेल. ' वासंतिक निर्झर प्रवाह ' एका लहानशा गुहेंतून वाहत होता. त्याचा प्रवाह स्फटिकासारखा स्वच्छ होता. शेवाळलेल्या दगड--कपारींतून हा प्रवाह आपला मार्ग काढीत पुढें जात होता. आणि चमत्कार असा कीं, असा जातां जातां वाटेंत संगीतासारखा श्रुतिसुभग नाद काढीत हा प्रवाह चटकन भूमींत अदृश्य झाल्यासारखा दिसे.

हॉजनव्हिल हें गांव केंटकीमध्यें आहे. ह्या गांवाजवळच नॉलीन क्रीक येते. येथील दक्षिण फोर्कच्या ह्या विलीन पावणाऱ्या निर्झरावरील शेताची—अब्राहमच्या जन्मभूमीची—कसलीच स्मृति अब्राहमला नव्हती.

अब्राहमच्या पहिल्या आठवणी नॉब क्रीकच्या दरींतील शेताच्या होत्या. अब्राहम दोन वर्षांचा असतांनाच लिंकन कुटुंब ह्या जागीं राहावयास आलें होतें. लिंकनच्या पहिल्या शेतापासून तसें पाहतां तें फार दूर नव्हतें. मुलड्रफ ह्या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या टेकाडाच्या उतारावर नॉब क्रीक ही सुपीक दरी होती. ह्या ठिकाणीं आल्यावर.....

थोडयाच दिवसांत एब हरणाच्या कातडयाचे जोडे व विजार, तंतूंपासून बनवलेल्या लिननचा सदरा व अस्वली कातडयाची टोपी घालून आसमंतांत हिंडूं फिरूं लागला. डेनीस हँक्सनें अशी आठवण सांगितली आहे कीं–' चालूं लागल्यापासून कपडयांचा त्रास वगळतां एबनें नॅन्सीला दुसरा कसलाच त्रास दिला नाहीं. बऱ्याच वेळां आम्हीं अनवाणीहि भटकलों आहोंत... न्याहरी आटोपतांच एब तडक जंगलांत धूम ठोकीत असे. त्या ठिकाणीं तो पाणथळ खडकांच्या फटीफटींतून मासे शोधीत राही. कधीं टॉम आणि मी कुत्र्यांना घेऊन अस्वलांच्या शिकारीला निघालों कीं तो आमच्या सोबत येत असे. कधीं जंगलांत मोहोळाच्या पाठीमागें तो मध-माश्यांना हुसकावी. केव्हां केव्हां तो 'पपी'साठीं धान्य गोळा करतांना दिसे.

असा त्याचा ह्या ठिकाणचा जीवनक्रम होता. वेधक असें जीवन जगतां येण्यासारख्या परिस्थितींत तो वावरत होता व त्या परिस्थितीला सुसंबद्ध असाच वागत होता. पण ह्यांतच त्याच्या जिवावर बेतण्याचे प्रसंग ओढवण्याची शक्यताहि होती.'

ह्या दिवसांच्या अब्राहम लिंकनच्या स्मृतीहि अशाच असाव्यात: " माझी पहिली आठवण नॉब क्रीकची आहे...आमची शेतजमीन तीन ठिकाणीं विभागलेली होती. ही जमीन टेकड्यांनीं व निमुळत्या[१] कड्यांनीं वेढलेली होती...एका शनिवारची गोष्ट. आमच्या एका शेताला आम्हीं ' मोठें शेत ' म्हणत असू. ह्या सात एकरी शेतांत इतर मुलांनीं धान्य पेरलें. ह्याच शेतांत मी ' पंपकिन 'च्या बिया टाकल्या. दुसऱ्या एका टेकाडावरील वाफ्यांत मीं दोन दोन बिया टाकल्या. ह्यानंतर दुसऱ्या दिवशीं सकाळींच भोंवतालच्या टेकाडावर मुसळधार पाऊस पडला. दरींत मात्र पावसाचा टिपूसहि नव्हता. पण कड्यावरून कोसळणाऱ्या पाण्यानें दरींतली जमीन पार धुपून गेली. दरींतून वाहणाऱ्या पाण्याच्या लोटाबरोबर आदल्या दिवशीं पेरलेलें धान्य व ' पंपकिन 'च्या बिया सर्व कांहीं वाहून गेलें."

अशाच एका पुरांत ओढ्यांत पडल्यामुळें बुडून मरण्याचा प्रसंग अब्राहमवर आला होता. पण सुदैव असें कीं, ऑस्टिन गोलाहर हा त्यांचा सोबती व स्नेही जवळच होता. त्यानें एका लांबलचक फांदीच्या आधारानें अब्राहमला किनाऱ्यावर सुखरूप आणलें.

येथेंच–नॉब क्रीकच्या ह्या शेतावर–विशाल जगाचें ओझरतें ज्ञान एबनें पहिल्या प्रथम मिळविलें. त्याच्या झोपडीच्या समोरच ' कंबरलँड ट्रेल ' नांवाची टेकडी होती. ह्या टेकडीवरून निरनिराळ्या चीजवस्तु विकणारे ठाकर, वस्तीसाठी जागेच्या शोधांत असलेले भटके, बेड्या घातलेले गुलाम इत्यादि अनेक प्रकारचे प्रवासी खालीं दरींत येत. एकदां ह्या टेकडीवरून एक सैनिक लंगडत लंगडत आपल्या घरीं चालला होता. १८१२ च्या युद्धांत निकामी झाल्यामुळें त्याला रजा देण्यांत आली होती. एबनें खडकांतून धरलेला एक मासा ह्या सैनिकाला दिला. हा सैनिक

काय म्हणत होता तें छोटचा एबनें कान देऊन ऐकलें. त्याचें बोलणें ऐकून एबला अचंबा वाटला. एब अतिशय खोडकर आहे पण तितकाच परिश्रम करणारा आहे, असें त्याच्याबद्दल तो सैनिक म्हणत होता. इतक्या लहान वयांतहि एबला शिकण्याची इच्छा आणि उत्सुकता होती. असाच अर्थ ह्यांतून निघतो.

योग्य वेळींच ह्या प्रदेशांत झचारिया रिने हा शिक्षक येऊन स्थायिक झाला. एका लांकडी झोपडींत त्यानें अध्यापन करायला सुरुवात केली. ह्या झोपडींतील जमिनीला गिलावा केलेला होता. त्याची अध्यापनाची पद्धति गोष्टीरूपानें शिक्षण देणाऱ्या सरहद्दीवरील प्रदेशासारखी होती. येथें प्रत्येक विद्यार्थ्यानें मोठ्यानें वाचून शिकायचें असे. सगळेच जण असेच मोठ्यानें वाचीत असल्यामुळें गजबजाट खूप होई. ह्या गजबजाटांतच शिक्षण चाले. ह्या ठिकाणच्या ह्या संस्कारांतून (?) एब पुढें आयुष्यभर स्वतःशींच पण मोठ्यानें पठण करीत राहिला.

पुस्तकी विद्येविषयीं थॉमस लिंकनचें फारसें बरें मत नव्हतें. ' आपले वडील कष्टाळू होते पण ते भटक्याचें जीवन जगणारे होते. ते अक्षरशः अशिक्षितच राहिले. ' असें अब्राहमनें टॉम लिंकन संबंधीं लिहून ठेवलें आहे. टॉम हा उत्तमपैकीं शिकारी होता. तो बऱ्यापैकीं सुतारहि होता. शेतावर तो कष्ट करी पण त्यांत त्याला फारसें यश कधीं आलें नाहीं. तो गोष्टी सांगूं लागला म्हणजे कोणाचेंहि मन वेधून घेत असे. अशा ह्या जबर आणि भटक्या माणसाला स्वतःची सही कशीबशीच व चुकतमाकत करतां येत होती. ' शिक्षणा 'चा तो उपहासच करी.

ँक्स आणि स्पॅरो घराण्यांतील पिढीजात दारिद्र्याच्या व निरक्षरतेच्या वातावरणांतच नॅन्सी हँक्स लिंकन वाढली. पण तिच्या अंगीं एक प्रकारचा शिष्टजन्य प्रेमळपणा होता. स्वभावतःच ती बुद्धिमान होती, असें अनेकांनीं आपल्या आठवणींतून सांगितलें आहे. कांहींचें तर असें म्हणणें आहे कीं, तिला लिहितां वाचतां सुद्धां येत होतें. पण हें खरें असण्याची शक्यता दिसत नाहीं. इतकें मात्र निःसंशय कीं अब्राहम आणि साराह ह्यांचें आपल्या

आईवर निरतिशय प्रेम होतें व तिनेंच असा आग्रह धरला होता कीं, आपल्या मुलांना कांहीं थोडे दिवस तरी शाळेंत पाठविलें पाहिजे.

१८१६ त नॅन्सीनें ओळखलें कीं, थॉमस बेचैनींत असतो. पुन्हा एकदां त्याची जमीन जाण्याचा धोका निर्माण झाला होता. कारण तो वापरीत असलेल्या जमिनीवर दुसऱ्या लोकांनीं आपला हक्क सांगितला होता. आणखीहि त्याला कळून चुकलें होतें कीं, ज्या राज्यांत गुलामगिरी अस्तित्वांत आहे, त्या राज्यांत एका गरीब शेतकऱ्याला गुलामांवांचून जीवन कंठणें कठिण होतें. म्हणून त्याची दृष्टि दुसरीकडे लागली होती. दृष्टिसमोर ओहिओ नदी येत होती. तिच्या उत्तरेला इंडियाना. हा प्रदेश बहुतेक निर्जन. पण सुपीक जमीन तेथें होती. थॉमसच्या म्हणण्याप्रमाणें हीच एक सुसंधि होती. नव्या जमिनीची मशागत करण्याचें साहस माणूस करूं शकेल आणि ह्या धर्तीनें त्याला आपल्या आयुष्याची नव्यानें घडी बसविण्यासाठीं आरंभ करतां येईल.

नवरा नव्या प्रदेशाच्या शोधासाठीं एकटाच निघाला, तेव्हां नॅन्सीला काय वाटलें असेल ? आपण केवळ कल्पनाच करूं शकतों. तिच्या लग्नानंतर दहा वर्षांच्या अवधींतच तीनदां त्यांच्या संसाराची घडी विस्कटली होती. त्यामुळें थॉमसला कधीं काळीं मनापासून समाधान लाभेल कीं नाहीं, ह्याची तिला खात्री नव्हती. त्यांत ह्या वर्षीं अतिशय थंडी पडली होती. सरहद्द प्रदेशांत राहणाऱ्या लोकांच्या आठवणीप्रमाणें इतकी थंडी पूर्वीं कधींच पडली नव्हती. भटक्या लोकांनीं असें लिहून ठेवलें आहे कीं, ह्या वर्षींचें गोठणें म्हणजे मृत्यूची मिठी. थॉमस इंडियानाहून परत येईल तेव्हां हिंवाळा सुरू झालेला असेल. ह्यावेळीं दोन मुलांना घेऊन निर्जन प्रदेशाची वाट चालणें धोक्याचें होतें. नॅन्सी झोपडींतल्या अंधारांत केव्हां केव्हां एकटीच असे. झोपडीच्या धुराड्यांतून बाहेर घोंघावणाऱ्या वाऱ्याचा घों घों आवाज झोपडींत ऐकूं येई. अशा वेळीं कित्येकदां नॅन्सीनें आपल्या डोळ्यांतील अश्रूंना वाट करून दिली असेल.

पण टॉमचा हा नवा बेत एबला आपल्या साहसाला उत्साहभरित करील अशी संधि वाटली असेल. त्यांच्या झोपडीमागें एक उंच सुळका होता.

गोठलेल्या वातावरणांत जणूं लपून गेलेल्या झाडींतून पलीकडे इंडियाना पर्यंत–' हिंदी माणसें ' नांवांतच सुचविणाऱ्या–दृष्टि पोहोंचविण्यासाठीं एब ह्या मागील सुळक्यावरहि चढला असेल. इंडियानांत अस्वलें विपुल होतीं-असतील ह्याबद्दल शंका नाहीं. पण एबला त्याचें काय ? लवकरच त्याला आठ वर्षें पुरीं होणार होतीं व मोठ्या माणसाच्या सफाईनें बंदूक किंवा कुऱ्हाड चालविणें त्याला जमणार होतें.

ऑक्टोबरच्या उन्हाचा डोळयांना त्रास होऊं नये म्हणून डोळयांवर हाताची सावली करून एब इंडियानाच्या दिशेनें दूरवर दृष्टि टाकी. असें पाहात असतांना त्याच्या मनांत विचार येत, समोर दिसणारा निळा पट्टा हा आकाशाचा छेद आहे कीं, आपणांस हवेंहवेंसें वाटणारें इंडियाना जिच्या कित्येक मैल पलीकडे आहे ती ही ओहिओ नदी आहे ?

# २

## अपुऱ्या आधारानें

" इंडियानाचें राज्य सांघिक राज्यांत ज्यावेळीं सामील झालें, त्याच सुमारास आम्ही नव्या घरीं आलों. हें घर वन्य प्रदेशांत होतें. येथें झाडाझुडपांत बरींच अस्वलें व इतर हिंस्र पशुसुद्धां होते. अशा ठिकाणीं मी वाढलों."

— अब्राहम लिंकन.

नोव्हेंबरांत टॉम लिंकन परत आला. परत आल्याबरोबर नॅन्सीला त्यानें सांगितलें कीं,' पीजन क्रीकला १६० एकर शेतजमिनीचा सौदा आपण केला आहे. हें ठिकाण ओहिओ नदीच्या बरेच मैल उत्तरेला आहे. ' ह्या ठिकाणची जमीन कसदार कशी आहे, हरणें व लाव्हे येथें कसे भरपूर सांपडतात, हेंहि

सांगावयास तो विसरला नाहीं. पण पिण्याचें पाणी आणावयास बरेंच दूर जावें लागतें; रानांत अस्वलें, लांडगे, चित्ते आणि रानमांजरें बरींच आहेत; जवळच्याच दलदलींत हिंवतापाचे डांस मुक्काम देऊन असतात; ह्या गोष्टी सांगण्याचें त्याला स्मरण राहिलें नाहीं.

इंडियानांत जमिनीची सरकारी मोजणी झाली होती. तेव्हां तेथें घेतलेल्या जमिनीची कायदेशीर नोंदणी नीट होईल, असा विश्वास बाळगतां येत होता. केंटकीत इतका विश्वास धरणें कठिण होतें, हें कांहीं खोटें नाहीं. इंडियानांतील जमीनहि सुपीक होती. पण निवाऱ्यासाठीं त्यांना त्या ठिकाणीं झोपडी नव्हती. अशा स्थितींत त्या निबिड निर्जन प्रदेशांत हिंवाळ्याच्या आरंभीं जाणें टॉम लिंकनसारख्या अगतिक पित्यालाहि कष्टाचें वाटलें असेल.

लिंकन कुटुंबाचें हें स्थलान्तर होतांना डेनीस हँक्स त्यांच्या सोबत होता. प्रत्यक्ष पाहिलेली माहिती लिहून ठेवणारा एकटाच. तेव्हां त्याच्याच माहितीवर आपणास पुन्हां एकदां विश्वास ठेवला पाहिजे.

" नॅन्सीनें सामानसुमान बाहेर काढलें व मीं तें घोड्यांवर लादलें. बांबूचा पलंग, लहानसें टेबल व तिपाई, असलें सामान घोड्यावर वाहून नेण्याची गरज नव्हती. इंडियानांतच टॉम तें तयार करूं शकला असता. एबनें बंदुकीचा ताबा घेतलाच होता......" असें डेनीसनें लिहिलें आहे.

दोन दिवसांच्या प्रवासानंतर हें कुटुंब ओहिओ नदीच्या दक्षिण किनाऱ्यावर पोहोंचलें. समोरच अँडर्सन क्रीकचें मुख होतें. एका सोयीस्कर नावेंत बसून हें कुटुंब नदीच्या रुंद व सुंदर वळणावरून पलीकडे गेलें. तेथें ते पोसी ह्याच्या शेतावर उतरले व आपल्या नव्या शेताच्या दिशेनें चालूं लागले. त्या दाट झाडीच्या निर्जन प्रदेशांतून मोठ्या कष्टानें वाट काढीत ते सावकाश चालले होते. असें जातांना तें सोळा मैलांचें अंतर संपतां संपत नाहीं असें त्यांना वाटत होतें.

दिवस हिंवाळ्याचे होते, तरी ते ज्या जंगलांतून चालले होते त्या जंगलांतील वृक्षांवर कांहीं थोडीं पानें शिल्लक होतीं. ह्यांच्या आधीं त्या अरण्याला

अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........

कोणाचा पाय लागला नव्हता. पॉप्लर व बीच वृक्षांचीं अखेरी अखेरीचीं सोनेरी पानें चकाकत होतीं. मॅपलचा निळसर छटा असलेला गडद रक्तवर्ण कांहीं पर्णांतून अजून दिसत होता. अक्रोडाच्या जातीच्या कांहीं हिकोरी वृक्षाचीं हरणाच्या रंगाचीं पानें इतस्ततः विखुरलीं होतीं. हिकोरीचीं फळें सारखीं येऊन जमिनीवर आपटत होतीं. गांठीच्या ओक वृक्षाचीं पानें नेहमीं सगळ्यांत शेवटीं व सावकाश गळतात. त्यामुळें ते तांबूस तपकिरी रंगानीं आच्छादिल्यासारखे दिसत होते. उंचच उंच सिकॅमोर नदीकांठावर उभे होते. त्यांच्या राखाडी खोंडावर प्रकाशाचे कवडसे चमकत होते. सॅसाफ्रासचे उबदार रंग पाहून सॅसाफ्रास चहासाठीं मिऱ्याचीं मुळें कोठून खणावीं हें कोणासहि कळण्यासारखें होतें. अक्रोड, गम, ॲश व एल्म ह्या वृक्षां ून रानटी द्राक्षांच्या वेली लटकल्या होत्या. त्यांच्या पिवळ्या पानांतून गारठलेले निळे झुबके दिसत होते. ह्या जगांत मानवानें पहिलें पाऊल टाकण्याच्या आधीं-पासूनच येथें विशाल वृक्ष अनंत पसरलेले होते. त्यांच्या गर्दींतून क्षितिजाचें दर्शन दुर्लभ होतें. दृष्टि पोहोंचेल तेथपर्यंत वृक्ष, वृक्ष, वृक्ष. दुसरें कांहीं सुद्धां नव्हतें.

ह्या वृक्षांच्या सावलींत हिंदी माणसें—साधीसुधीं हिंदी माणसें--लपलेलीं होतीं. १८१६ मध्यें दक्षिण इंडियानांतील कोणतीच टोळी युद्धपिपासु नव्हती. तरी बाकीचीं माणसें झाडाझुडपांतून ओहिओ नदीवरून सावकाशपणें चाललीं असतांना एब आपल्या हातांतील बंदूक सांवरून सर्वत्र काळजी-पूर्वक निरीक्षण करीत होता. आपलें नांव आपल्या आजोबांचें आहे व केंटकीमध्यें असतांना एका हिंदी माणसानें त्यांना ठार केलें होतें, ही गोष्ट एब विसरूं शकत नव्हता.

एबच्या वडिलानीं बऱ्याचदां त्याला ही गोष्ट सांगितली होती. ह्यावेळींहि उघड्यावर ते कसेबसे शेकत बसले असतांना त्यांना दुरून लांडग्याचें ओरडणें ऐकूं आलें, तेव्हां टॉमनें ती गोष्ट परतहि सांगितली असेल.

अब्राहम लिंकनचे आजोबा डॅनियल बूनचे मित्र होते. १७८२ मध्यें ते व्हर्जिनियांतून डोंगर तुडवीत केंटकींत आले. केंटकींत ग्रीन नदीच्या कांठावर

ते आणि त्यांची पत्नी बाथशेबा स्थायिक झालीं; तेव्हां त्यांना तीन मुलगे व दोन मुली होत्या. ह्यावेळीं दोन हजार एकरांहून अधिक जमिनीवर त्यांची मालकी होती.

१७८६ मध्यें मे महिन्यांत एकदां एबचे आजोबा व त्यांचे तीन मुलगे शेतांत काम करीत असतांना जवळच्याच झाडींतून गोळी झाडल्याचा आवाज आला व म्हातारा अब्राहम जमिनीवर कोसळला. थोडयाच वेळांत त्यांचा अंत झाला. ह्यावेळीं टॉम लिंकन आठ वर्षांचा होता. त्याचे थोरले दोघे भाऊ कोणाकडून तरी मदत मागण्यासाठीं धांवून गेले व शूर असला तरी घाबरलेला टॉम आपल्या वडिलांच्या देहाजवळच उभा राहिला. त्यानें वळन पाहिलें तों अकस्मात एक हिंदी माणूस हातांत भाला घेऊन शेतांतून त्याच्याच दिशेनें येतांना त्याला दिसला.

हा हिंदी माणूस आपणास पकडून घेऊन जाईल का? तो आपल्याला जागच्या जागीं ठार करील का? असले प्रश्न टॉमच्या मनाला अस्वस्थ करूं लागले. इतक्यांत त्या हिंदी माणसाच्या छातीवरील पदकावर त्याचे चमकदार डोळे खिळले. क्षणांत त्यानें बंदुकीच्या गोळीचा आणखी आवाज ऐकला. पण ह्यावेळीं तो त्यांच्या संरक्षण स्थानाकडून आला होता. ह्या हिंदी माणसाचें पदक जेथें होतें तेथून खालच्या बाजूला गोळी लागून रक्त वाहूं लागलें. इतक्यांत तो हिंदी माणूस टॉमच्या पायापर्यंत येण्यासाठीं पुढें सरकला होता. बंदूक चालविण्यांत टॉमचे भाऊ निष्णात होते—खारीच्या डोळ्यांतहि ते गोळी मारूं शकले असते इतके निष्णात.

म्हाताऱ्या अब्राहमच्या मृत्यूमुळें तें कुटुंब उध्वस्त झालें व त्यामुळेंच टॉमला इंडियानांत यावें लागलें.

लहानसा एब आतां शेकोटीच्या अधिक जवळ सरकला. आणखी एका लांडग्यानें पूर्वीच्या लांडग्याला साथ दिली होती. विस्तवाची ज्योत चमकूं लागली तसें दुरून चित्त्यांच्या डरकाळ्या ऐकूं येऊं लागल्या; त्यानें लिंकनचा थरकांप झाला.

× × ×

ते आपल्या नव्या जमिनींत पोहोंचले, तेव्हां आपली जमीन ओळखण्याला त्यांना एकच खूण होती. ती खूण म्हणजे एकशें साठ एकर जमिनीच्या चारी कोपऱ्यांना लिंकननें काटक्यांची रास करून ठेविली होती. एब व टॉम ह्यांनीं लगेच पारध्याच्या आश्रयासारखा माचा तयार केला. तो चौदा फूट रुंद असावा व तितकाच उंच. खांबावर झाडांच्या फांद्या टाकून तो तयार केलेला होता. दक्षिणेच्या बाजूनें तो सताड उघडा होता व त्या बाजूला सतत रात्रंदिवस एक लांकडाचा ओंडका जळत ठेवला होता. ह्या मनुष्यनिर्मित गुहेंत पानें हीच जमीन व तेंच अंथरुण. पावसाळ्याचा काळ सोडला किंवा बर्फ पडे ते दिवस वगळले किंवा धुरानें त्यांची ही झोपडी भरे तेव्हांची वेळ वजा केली, तर लिंकनचें हें घर खारी राहात त्या झाडांच्या ढोलीइतकेंच उबदार होतें.

लवकरच टॉमनें दुसरी चांगल्या प्रकारची झोपडी बांधावयास सुरुवात केली. पण तो तापदायक हिंवाळा एब, साराह व त्यांचे आईवडील ह्यांनीं त्या अर्ध्याकच्च्या आश्रयाखालींच कंठला.

सुदैवानें तेथें शिकारीला जागा खूप होती व अन्नाचा तोटा नव्हता. पण पाण्याचा प्रश्न होता. मैलावरच्या झऱ्यावरून पाणी आणणें हें कित्येक वर्षें एबचें कामच होऊन बसलें होतें. नव्या झोपडीसाठीं लाकडें तोडण्यासहि तो मदत करीत होता व एकदां तरी तो जेवण वाढून आणीत असे.

कित्येक वर्षांनंतर दुसऱ्या एखाद्या मुलाला आपण गोष्ट सांगतों आहों अशा थाटांत अब्राहम लिंकननें पुढीलप्रमाणें लिहून ठेवलें:–

' एब लहान होता. पण त्याच्या वयाच्या मानानें तो मोठा दिसत होता. ह्याच काळांत त्यानें हातांत कुऱ्हाड घेतली होती व तेवीसाव्या वर्षापर्यंत तो सारखा खपत होता. नांगरणीचे व कापणीचे दिवस सोडले तर त्या हत्याराचा उपयोग तो सतत करीत होता. ह्याठिकाणींच एब पारध्याचे प्राथमिक धडे शिकला. पुढील काळांत ह्या कसबात त्याची अधिक प्रगति झाली नाहीं. त्याला आठ वर्षें पुरीं होण्याआधीं एकदां नव्या झोपडीच्या जवळपास रान-कोंबड्या आल्या. एबचे वडील घरांत नव्हते. ह्यावेळीं हातांत छोटी बंदूक

घेऊन एबनें झोपडीच्या फटींतून त्यांतली एक कोंबडी मारली. ह्यापेक्षां अधिक मोठ्या शिकारीसाठीं बंदुकीचा चाप त्यानें ओढला नाहीं.

अखेर क्रमाक्रमानें, मिसिसिपी नदीच्या परिसरांत, ओहिओ नदीच्या आसपास व अखेर पीजन क्रीकमध्यें पानाफुलांची उधळण करीत एप्रिल महिना आला. अर्धवट बांधून झालेली झोपडी व माचा ह्यांच्या आसमंतांत फेंसासारख्या पांढऱ्या फुलांची दुनिया क्षणार्धांत् निर्माण झाली. नुकत्याच उगवलेल्या गवतावर फुलांचे निळसर ठिपके दिसूं लागले, सुवर्णवर्णी फुलेंहि चमकूं लागलीं. झोपडीच्या आसपासच्या मोकळ्या जागेंत लिंकननीं मका व भाजीपाला ह्यांची लागवड केली, पण ह्या जागेंत अस्वलें धुमाकूळ घालूं लागलीं. लिंकननें एका कडव्यांत ह्या परिस्थितीचें वर्णन केलें आहे:

' माझे वडील प्रथम येथें स्थायिक झाले, तेव्हां हा प्रदेश सरहद्दीवरचा होता. येथें चित्ते ओरडत होते, त्यामुळें रात्रीं भीति वाटे. शिवाय डुकरांची शिकार करण्यासाठीं अस्वलें घिरट्या घालीत होतीं. '

१८१७ मधील हिंवाळ्यांत—म्हणजे लिंकन ह्या प्रदेशांत राहावयास आले, त्यानंतर जवळ जवळ एका वर्षानें हा प्रदेश पूर्वीइतका एकाकी राहिला नाहीं. कारण, ह्या सुमारास थॉमस .बेट्सी स्पॅरो आणि उत्साही डेनीस हँक्स हीं सुद्धां ह्याच ठिकाणीं राहावयास आलीं. स्पॅरो दांपत्य नॅन्सी लिंकन व तिचा चुलत भाऊ डेनीस हँक्स ह्यांचे पालक होतें हें आपणास स्मरत असेलच. इंडियानांत तीं सौ. लिंकनचे आईबाप म्हणून ओळखलीं जात.

स्पॅरोनीं त्या ' उघड्या बोडक्या ' माचावर घर केलें. डेनीस नेहमी असेंच म्हणत असे. १८ × २० च्या नव्या झोपडींत लिंकन राहूं लागले. झोपडीला वरून छप्पर होतें. येथें नॅन्सीनें आपलें पिंजण्याचें यंत्र बसविलें, तेथेंच ती रांधीत होती व पलंगावर झोंपत होती. येथें पुन्हां तिला टेबल व स्टूल मिळालें. पण झोपडीला चांगलासा दरवाजा बसवायला व खिडक्यांना तकतकीत कागद चिकटवायला टॉम विसरला होता. दरवाजाला कातडीं लोंबकळत होतीं. तीं गार वाऱ्यानें उडत. खालीं साधी जमीनच होती. लांकडी फळ्यांतील फटी बुजवून घेतलेल्या नव्हत्या. वरचें छप्परहि पुरें

झालेलें नव्हतें. अशा स्थितींत मृत्यूनें ह्या घराकडे आपली नजर वाजवीपेक्षां लवकर वळविली असल्यास नवल नाहीं.

डेनीस हँक्सनें सांगितलें आहे कीं, 'आम्ही बराच वेळ शिकार करीत असूं; विशेषतः काम करून आम्हीं दमत असूं तेव्हां–आणि असें वारंवार घडे ह्याबद्दल खात्री बाळगा.'

त्या अर्धवट झोपडींत १८१७–१८ च्या हिंवाळयांत लिंकन कुटुंब थंडींत कुडकुडत होतें, तर स्पॅरो दांपत्य व डेनीस हँक्स माचावर गारठत होते. १८१८ मधील वसंत ऋतूंत लागवडीस आणण्यासाठीं सहा एकर जमीन साफसूफ केलेली होती; पण तोंपर्यंत ह्या कुटुंबांना शिकार, बेरीचीं फळें व कंदमुळें ह्यांच्यावरच गुजराण करावी लागली.

पुढील हिंवाळयांत ह्या प्रदेशांत एक भयंकर सांथ पसरली. गाई आणि माणसें ह्या सांथीनें पटापट मरूं लागलीं. थॉमस आणि बेट्सी स्पॅरो दोघेंहि ह्या सांथीच्या तडाख्यांत सांपडलीं. त्या उघड्या बोडक्या माचावर नॅन्सी शक्य तितकी त्यांची शुश्रूषा करूं लागली. जखमी जनावरांप्रमाणें तीं पाचोळयावर मृत्यु पावलीं.

टॉम लिंकननें दोघांना मूठमाती दिली नाहीं तोंच नॅन्सीनें अंथरूण धरलें. अगदीं जवळचा डॉक्टर बोलवायचा तरी पस्तीस मैलावरून. टॉमनें हा प्रयत्न केला असता,तरी त्याचा कांहीं उपयोग झाला नसता. ह्या रोगावरचा उपाय कोणालाच सांपडला नव्हता.

नॅन्सीनें अब्राहमला आणि साराहाला आपल्याजवळ बोलावलें. ह्यावेळीं झाडांवर पानें चकाकत होतीं व आकाश निरभ्र होतें. एकमेकांशीं चांगल्या तऱ्हेनें व प्रेमानें वागण्याचें वचन नॅन्सीनें मुलांकडून घेतलें. त्यानंतर लवकरच ती निधन पावली. ती झोपडी आईवेगळी झाली आणि पिंजण्याचें यंत्र स्तब्ध पडलें.

डेनीस हँक्सनें म्हटलें आहे कीं, 'परमेश्वरा, नॅन्सी वारली तेव्हांचें त्या झोपडींतील करुणास्पद दृश्य मी कधींच विसरणार नाहीं!'

'अंत्यविधि पार पाडण्यास एबनें आणि मीं टॉमला मदत केली. टॉमनें झोपडी बांधून उरलेलें लाकूड फोडलें. मी त्याला फळ्या व पट्ट्या तयार करायला मदत केली. त्या एकत्र जोडण्यासाठीं टॉम भोकें पाडीत होता; तोंपर्यंत एब पट्ट्या हातांत घेऊन होता. एबनें त्यांत खुंट्या बसविल्या. त्यावेळीं मला वाटलें, टॉम नेहमींच कोणाना कोणासाठीं शवपेटी तयार करीत असे. हरणांच्या वाटेवरील जागेंत आम्हीं नॅन्सीचा देह पुरला. हरीण हा जंगलांतला एकच प्राणी असा होता कीं, ज्याची स्त्रीला भीति वाटत नव्हती. नॅन्सीला हें इतकें वाईट मरण आलें, तेव्हां एब जवळजवळ नऊ वर्षांचा होता.'

जेथें नॅन्सीची शवपेटिका पुरली होती, तेथें सर्वत्र शांत होतें. हिवाळ्यांत झाडांचीं पानें गळून पडत तेव्हांसुद्धां त्यांचा आवाज होत नसे; बर्फहि तितक्याच निःशब्दतेनें पडत होतें. जेव्हां एबला वाईट किंवा एकाकी वाटे, तेव्हां तो जेथें जाऊं शकत होता, अशी ती एकच जागा होती.

# ३

## एबला नवी आई येते

" एब हा गुणी मुलगा होता....कधीं तो मला वांकड्या शब्दानें बोलला नाहीं. तसेंच त्यानें कधीं द्वेषानें माझ्याकडे बघितलें नाहीं...प्रत्येक माणसाबद्दल व वस्तुमात्राबद्दल त्याला सहानुभूति होती...त्याच्या आणि अल्पशा माझ्या भावना एकाच जातीच्या होत्या—त्या एकाच प्रवाहाच्या घटक बनल्या होत्या."

—साराह बुश लिंकन

साराह बारा वर्षांची होती. ह्या वयांत ती, वडाल, दहा वर्षांचा एब आणि डेनीस ह्यांच्याकरितां घरचें स्वयंपाक-पाणी पाही. असेंच वर्ष उलटून गेलें.

झाडांच्या दाटींत तेथें ऐसपैस जागा नव्हती. अशा स्थितींत ' पीजन क्रीक'च्या कण्यावर बांधलेली त्यांची झोपडी पुरी बांधूनहि झाली नव्हती. येथें जे दिवस त्यांनीं काढले, ते त्यांच्या आयुष्यांतले अतिशय दीनवाणे दिवस ठरतील.

नॅन्सी आणि स्पॅरो कुटुंबांतील इतर मंडळी ह्यांचे अंत्यसंस्कार विधिपूर्वक करतां आले नव्हते. टॉमला ह्याचें राहून राहून दुःख होई. एकदां काय झालें, पारसन एल्किन हे त्याला अचानक भेटले. पारसन एल्किन हे केंटकींतल्या हार्डीन परगण्यांत राहणारे. हरणाच्या वाटेवरल्या त्या मातीच्या ढिगाऱ्यां-समोर–जेथें मृतांना माती दिली होती तेथें–आवश्यक ते धार्मिक मंत्र म्हणण्याचें त्यांनीं कबूल केलें, तेव्हां कोठें टॉमला जरा हलकें वाटलें. ते धर्मोपदेशक मृतांच्या वतीनें परमेश्वराची करुणा भाकीत असतांना एब, साराह, डेनीस व टॉम मृतांविषयींच्या आदरानें मान वांकवून उभीं होतीं. मृतांच्या देहांची राख झाली होती. माती मातीस मिळाली होती !

पण जिनें ह्या सर्वांवर जिवेंभावें प्रेम केलें होतें, तिच्या मृत्यूची भरपाई कशानेंहि होण्यासारखी नव्हती. त्यांना सहानुभूति दाखवावयास किंवा धीर द्यावयास आतां नॅन्सी जवळ नव्हती. लोकर साफसुफ करणें, पिंजणें–विणणें, सावण आणि मेणबत्त्या बनविणें, कांजी तयार करणें, अशा किती तरी गोष्टी करावयास आतां नॅन्सी नव्हती. अशा पोरक्या अवस्थेंत त्या मुलांच्या अंगावर चिंध्या लोंबूं लागल्या. त्यांच्या केसांच्या जटा झाल्या; आणि स्वच्छतेची त्यांना ओळख उरली नाहीं.

पुढील हिंवाळ्यांत नॅन्सीचें वर्षश्राद्ध झालें. टॉमला तो एकलेपणा सहन होईनासा झाला. तो केंटकीला परतला. मुलें झोपडींत एकटींच होतीं. कधीं नव्हे तो एकलेपणा त्यांना भयाण वाटूं लागला. काळोख्या रात्रीं वारा वृक्षराजींत निःश्वास टाकी. हिंवाळी हवेंत पानें सळसळत आणि झोपडीच्या छपरावर उसकाउसक होई. अशा वेळीं तीं मुलें भयभीत होत. त्यांना वाटे, एखादा चित्ता आपला पंजा झोपडींत रिघविण्याचा तर प्रयत्न करीत नाहीं ना ? रानमांजरें कधीं कधीं तसा यत्न करीत.

टॉम लिंकन आला तो एलिझाबेथटाऊन मध्यें दाखल झाला. फार वेळ इकडे तिकडे न गमावतां तो साराह् बुश जॉन्स्टनच्या घरीं गेला. नॅन्सीशीं लग्न करण्यापूर्वीं त्याचें ह्या बाईवर प्रेम होतें. तिचा नवरा डॅनियल जॉन्स्टन आतां तीन मुलांना मागें ठेवून स्वर्गवासी झाला होता. एलिझाबेथ, मॅडिल्डा व जॉन अशीं त्या मुलांचीं नांवें होतीं. हीं मुलें टॉमच्या मुलांच्या वयांचींच होतीं. साराहाचीं मुलें बापावेगळीं होतीं, तर टॉमचीं मुलें आईच्या मायेला कायमचीं अंतरलीं होतीं.

टॉम साराहाला म्हणाला, 'असं पाहा मिस् जॉन्स्टन, माझी बायको वारली; आणि तुझा नवराहि गेला. मी इथें आलों, तो तुझ्याशीं लग्न करायच्या इराद्यानें आलों आहें. आपण एकमेकांना लहानपणापासून ओळखतों. तुझी हरकत नसेल तर आपलं लग्न आपण चटकन उरकून घेऊं या. मला फार दिवस इथें थांबतां येणार नाहीं.' तेथल्याच एका गृहस्थानें सांगितल्याप्रमाणें टॉमच्या बोलण्याचा हा वृत्तान्त आहे.

अशा वेळीं साराह् उत्तरली, 'टॉमी, मी तुला ओळखत का नाहीं? तुझ्याशीं लग्न करायला माझी कसली हरकत असणार? पण तें तूं म्हणतोस तितक्या चटकन होण्यासारखं मात्र नाहीं. कारण इथें मला थोडं कर्ज आहे. तें तर मला आधीं फेडलं पाहिजे!' साराहाचें उत्तर हें असें असल्याचें सांगतात.

टॉम लिंकन मात्र ह्या उत्तरानें निराश झाला नाहीं. त्यानें ताबडतोब होतें तें कर्ज फेडलें. त्यामुळें लगेच दुसऱ्या दिवशीं– २ डिसेंबर १८१९ रोजीं–त्यांचें लग्न झालें.

पीजनक्रीकच्या त्या झोपडीसमोर एके दिवशीं चार घोडे येऊन थडकले. त्यांच्यावर सामान लादलेलें होतें. पलंगी खांब, खणी टेबल, लिनन विणायचें यंत्र, साबणाचें, स्वयंपाकाचीं भांडीं, पत्र्याचीं भांडीं अशा कितीत भारी वस्तु त्या सामानांत दिसत होत्या. आणि ह्या सामानासोबत एब व साराह ह्यांची नवी आई होती. ती हास्यवदन होती. तिच्यासोबत एब–साराहासाठीं

एक नवा भाऊ आणि दोन बहिणीसुद्धां होत्या. हें सारें पाहून एब, साराह व डेनीस ह्यांना खूपच आश्चर्य वाटलें.

साराह बुश लिंकन ही थोर निष्ठेची बाई असली पाहिजे ! नाहीं तर ती आल्या पावलींच परत निघाली असती. सुखसोयींचें, निर्मळ, भरपूर आणि सुरेख सामानसुमान असलेलें घर सोडून ती येथें आली होती आणि येथें तिला काय आढळलें ? मातीनें सारवलेली झोपडी. तिला खिडक्या-दरवाजेहि नव्हते. फर्निचर अगदीं थोडें आणि तेंहि ओबडधोबड. गवती भुस्कटाच्या चटया व बांबूचा पलंग. एब, साराह आणि डेनीस ह्यांचीं अंगेंहि घाण झालीं होतीं.

डेनीसनें म्हटलें आहे, " ती आली तेव्हां आम्हीं भणंग भिकाऱ्यासारखीं व घाणेरडीं होतों. घरातलें टॉमचें सुतारकामाचें टेबल बाहेर घोडयांच्या दोणीजवळ आणून ठेवायला तिनें मला सांगितलें. आल्यानंतर तिनें मला सांगितलेलें हें पहिलेंच काम. नंतर तिनें मला, एबला व तिचा मुलगा जॉन जॉन्स्टन ह्याला झऱ्यावरून पाणी आणून दोणी भरून ठेवावयास सांगितलें. आम्हीं इतकें केल्यानंतर तिनें एक चांगल्याशा साबणाचें व पाणी काढण्यासाठीं दुसरें अशीं दोन भांडीं आणून दिलीं व हातपाय धुऊन जेवावयास या असें आम्हांस सांगितले. ' सेरी ' काकीच्या जवळ असतांना सहजच आमच्यांत एक प्रकारचें माणूसपण येई. "

देखणी व प्रेमळ अशी ही नवी आई एबला व त्याच्या बहिणीला एकदम आवडली. ह्या प्रेमळ देवतेला अब्राहम आयुष्यभर अगदीं अंतःकरणापासून स्मरत असे. ती सुस्वभावी तर होतीच पण आपल्या कामांतहि तरबेज होती. साहजिकच तिनें आपल्या नव्या मुलांच्या केसांची नीट निगा केली व त्यांच्या मळक्या फाटक्या कपडयांना निर्मळ आणि ठाकठीक ठेवलें. झोपडींतील जमीन तिनें घासूनपुसून काढली व टॉमला चांगली नितळ जमीन करावयास बसविलें. दरवाजावर अस्वलाचें कातडें लोंबत होतें, तें कसरीनेंहि मधून मधून खाल्लेलें होतें. साराहाला ह्यांत समाधान वाटण्यासारखें नव्हतें. हवा आंत येऊं शकणार नाहीं, असा कातडी बिजागरांचा

फळीचा दरवाजा हवा, असा आग्रह तिनें धरला. वांबूचे आणखी पलंग करावयाच्या खटपटीला टॉम लागला; तर इकडे साराहानें जुन्या पिशव्या रिकाम्या करून त्या धुतल्या. नंतर तिनें त्या धान्याच्या कोंड्यानें भरून त्यावर आपल्या हलक्याफुलक्या पलंगाची योजना करून चांगलीं निर्मळ अंथरुणें घातलीं. मुलांसाठीहि तिनें छपराखालीं अशीच सोय केली. चुना विकत आणून तो भितींना व छताला काढला. अशा ह्या झोपडींत केंटकीला पंचेचाळीस पौंडांना विकत घेतलेलें साराहाचे 'रार्याटिंग' टेबल एका कोपऱ्यांतल्या अंधारांत धूसरपणें चमकूं लागलें. ह्याबरोबर आपण अधिक माणसांत आलों, असें एबला वाटूं लागलें.

आपल्या साऱ्या आशाआकांक्षा पुऱ्या करण्याची जिद्द बाळगण्याला ही नवी आई एबला उत्तेजनच देत असे. ती वत्सल होती व तिची ओढ लागावी असा गुण तिच्यांत होता. तसेंच ती धीटहि होती. 'ती खूप उंच होती. हिंदी माणसासारखी ती सडपातळ होती. तिची कांति मोहक होती. ती अतिशय देखणी व बोलकी होती व तिच्या बोलकेपणांत एक प्रकारचा जिवंतपणा आढळे. ती अभिमानीहि होती. म्हातारपणींसुद्धां तिचे केंस जसेच्या तसे होते. उतारवयांत घेतलेल्या छायाचित्रांतहि ती आकर्षक दिसते व तिच्या चेहेऱ्यावर तजेला आढळतो...तिनें आपली झोपडी अगदीं टापटिपीनें ठेवली होती. आपल्या दुहेरी परिवारावर तिचा वचकहि चांगला होता. पण त्याचबरोबर तिची त्यांच्यावर मायाहि होती. त्यांच्याशीं वागतांना ती मनमोकळेपणानें वागे आणि सहनशीलताहि दाखवी. एबशीं तर तिचा हास्यविनोदहि चाले!' साराहाच्या नातीनें तिचें ह्या शब्दांत वर्णन केलें आहे.

२५ डिसेंबर १८१९ पासून सुरू झालेल्या नाताळचे दिवस ह्या कुटुंबाचे मजेंत व उल्हासांत गेले असतील. ह्या दिवशीं साराहानें भुकेलेल्या मुलांसाठीं रानकोंबडीच्या व हरणशावकाच्या सागोतीचा खास बेत केला होता. त्या झोपडींत मुलांना आतां आई होती; टापटीप होती. लांबट आकाराचें व पॉलीश केलेलें एक टेबल होतें. त्या टेबलाभोंवतीं नाताळच्या रुचकर

मेजवानीसाठीं सगळींजणें बसलीं असतील अशावेळीं मोजकें बोलणाऱ्या टॉमनें ह्या दिवसाच्या मजेंत व उत्तेजकतेंत कृतज्ञतेचे दोन शब्दहि मिसळले असतील.

# ४

## सुरुवातीचें शिक्षण

" तेथें तथाकथित शाळा होत्या. त्या शाळांतून शिक्षकाचें काम करावयास पात्रता लागत नसे. लिहिणें, वाचणें आणि हिशेब करणें, इतक्या गोष्टी आल्या म्हणजे पुरेसें असे. एखाद्याची शिक्षणाची आकांक्षा वाढीला लावील, असें तेथें कांहींसुद्धां नव्हतें. "

— अब्राहम लिंकन

दक्षिण इंडियानांत लहानपणीं एब अनवाणी भटकत असे. ज्यांनी म्हणून त्याला अशा स्थितींत पाहिलें होतें, त्यांपैकीं बहुतेकांना दोन गोष्टींचें नेहमीं स्मरण होतें. एबची हरणाच्या कातडीची विजार त्याच्या पायांच्या मानानें तोकडी होती व त्यामुळें नडगीचें हाड विजारीबाहेर सहा इंच तरी मोकळें राही, ही एक गोष्ट. दुसरें असें कीं नेहमीं त्याच्या हातांत कोणतेंना कोणतें पुस्तक असे.

एब शरीरानें सुदृढ बनत होता, तसाच तो आपल्या बुद्धीवरहि संस्कार करीत होता; असेंच ह्यांतून निदर्शनास येतें. शरीरानें तो शेवटीं इतका सुदृढ झाला कीं, किशोरावस्थेंत असतानाच तो शेजारपाजारच्या कोणाहि मोठ्या माणसापेक्षां अधिक जोरदार असा कुऱ्हाडीचा घाव घालूं लागला. त्याच्या बुद्धीत अद्भुत असें कांहींच नव्हतें पण आजूबाजूच्या अनेक मैलांच्या

परिसारांत त्याच्याइतका हजरजबाबी आणि बहुश्रुत मुलगा आणखी कोणी नव्हता, इतकें मात्र खरें. गांवालगतच रानाळ प्रदेशांत कांहीं भावनाप्रधान वक्ते भाषणें करावयास येत. त्यांचें एब अनुकरण करीत असे. त्यासाठीं तो मोडून पडलेल्या झाडाच्या एका ओंडक्यावर उभा राही. अशा व्याख्यान-प्रसंगीं लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांचें लक्ष आपल्या भाषणानें वेधून घेणाराहि त्याच्यासारखा दुसरा कोणी नव्हता. ह्या भाषणांनीं तो आपल्या गुणग्राहक श्रोत्यांत हास्याचे कल्लोळ निर्माण करी. पण तसेंच चर्चमध्यें ऐकलेले उपदेशाचे भाग व केव्हांतरी वाचलेल्या पुस्तकाचीं पानेंच्या पानें मुखोद्गत म्हणून दाखविण्याइतका तो गंभीरहि राहूं शके.

एब साधा आणि लाजाळू होता. विनोदी चुटके आणि अनेक क्लृप्त्या ह्यांचा सांठा त्याजपाशीं भरपूर होता. तरी तो विचारमग्नहि असे व कांहीं वेळां तर उदासहि दिसे. तो स्वभावानें तसा सौम्य होता. पण उत्तेजित झाला म्हणजे धडाडीहि दाखविणारा होता.

रीतसर शालेय शिक्षण झालें नाहीं म्हणून एब आयुष्यभर कष्टी असे. त्याची अध्यक्षपदीं निवड झाल्यानंतरहि हें दुःख कमी झालें नाहीं. अभ्यास आणि वाचन ह्यांच्याद्वारें त्यानें नंतर बरेंच ज्ञान मिळविलें. पण त्याचा त्याला गर्व नव्हता. तो नेहमींच विनम्र असे. अज्ञान परंपरागत होतें आणि दारिद्र्य पाठीशीं लागलें होतें; साहाय्य करणारें कोणीं नव्हतें; अशा एकाकी अवस्थेंत झगडत कष्टत जी सुज्ञता प्राप्त केली होती, ती सर्व प्रकारच्या शैक्षणिक सुखसोयी ज्यांना उपलब्ध असतात, त्या लाखों लोकांच्या सुज्ञतेपेक्षां थोर दर्जाची होती.

लिंकननेंच म्हटल्याप्रमाणें तो शाळेंत ‘नांवालाच’ गेला. केंटकी आणि इंडियाना, ह्या दोन ठिकाणचें मिळून त्याचें शाळेंतलें वास्तव्य एका वर्षाहून कमी भरेल. ह्या वास्तव्यांत एकंदर पांच शिक्षकांच्या हाताखालीं तो शिकला. त्यांपैकीं क्रॉफर्ड, डोर्सी आणि स्वीनी ( किंवा स्वानी ) हे इंडियानांतले बहुतेक, वेब्स्टरचें ‘अक्षर ओळखीचें प्राथमिक पुस्तक,’ पिकेचें ‘गणित’ आणि बायबल, हीं त्याच्या अभ्यासाचीं पुस्तकें.

ह्या सर्व घरगुती शाळांतील शिक्षणपद्धति बरीच एकसारखी होती. मांस, धान्य आणि हरणाचें कातडें, ह्यांच्या रूपानें प्रत्येक विद्यार्थ्यानें फी द्यावयाची. लांकडी झोपडींतच ह्या शाळा भरत. त्यांच्या खिडक्यांना चिकटविलेल्या तकाकीच्या कागदांतून सूर्यकिरणाचा जो कांहीं अंधुक प्रकाश आंत येईल तितकाच. लांकडांच्या ओबडधोबड बाकांवर बसणें कांहीं तितकेंसें सुखावह नव्हतें. शेकोटींतील जळत्या लांकडांची धग शिक्षकांना व पुढील रांगेंतील मुलांना जवळ जवळ भाजून काढीत असे. पण मागच्या बाकांवरील मुलें थंडीच्या दिवसांत कांकडत आणि थंडीनें गोठलेल्या बोटांत बोरू धरणें त्यांना जड जाई.

एका सहामाहींत तर लिंकनला जातां–येतां नऊ मैल अंतर पायीं कापावें लागलें होतें. हवा चांगली असतांना झाडाझुडपांतून तो मजेंत चालला असेल. ओक आणि हिकोरी वृक्षांतून खार आपलें भक्ष्य शोधीत हिंडतां–फिरतांना पाहून त्याला गंमत वाटली असेल. किंवा पांढऱ्या शेपटीचीं हरणें झाडाझाडांतून दौडत जात असतांना पाहण्यांतहि तो आनंदानें दंग झाला असेल. पण हिंवाळ्यांत पावसानें व वितळलेल्या बर्फानें तो नखशिखान्त ओलाचिंब होऊन येत असला पाहिजे...' हरणाच्या कातडीपासून बनविलेल्या जोड्यांनीं पावसापाण्यापासून संरक्षण होत नसे...बोरी बाभळीसारख्या वृक्षांचे कांटे व हिकोरी वृक्षाचीं निखळलेलीं धारधार पातीं, ह्यांनीं त्याच्या सुती मोज्यांच्या चिंध्या झाल्या होत्या. जुन्यापुराण्या हरणाच्या कातड्याच्या कपड्यांना अनेक भोकें होतीं; त्यांतून बर्फाच्या कणांना आंत जाण्यास सहज मार्ग सांपडत होता.' असें डेनीस हँक्सनें ह्या दिवसांसंबंधीं लिहून ठेवलें आहे. पण बादळी हवेंत ओल्याचिंब पायांनीं अशा प्रकारचा हा नऊ मैलांचा प्रवास रोज करणें, लिंकनला अतिशय कष्टाचें व दुःखाचें गेलें असेल.

कसेंही असलें तरी एबच्या लेखीं शाळेला महत्त्व होतें. तेथील प्रत्येक दिवस त्याच्या दृष्टीनें मोलाचा होता व जास्तींत जास्त ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न त्यानें केला. नाथानियल ग्रीग्जबाय हा त्याचा शाळासोबती असें म्हणतो कीं, एब सर्वांच्या आधीं शाळेंत येई, वर्गांत तो नेहमीं पहिला असे. आणि

अभ्यासाच्या बाबतींत सर्वांना खूप मागें टाकी. शाळेंत त्याच्या इतकें चांगलें शुद्धलेखन इतर कोणाचें नव्हतें. एकदां तर त्यानें d-e-f-i-e- शब्द बरोबर लिहावयास एका मुलीला शिताफीनें मदत केली होती. 'b' नंतर कोणतें अक्षर, ह्या गोंधळांत ती पडली होती. एबनें शांतपणें आपल्या डोळ्याकडे बोट दाखविलें होतें.

इंडियानांत नंतर केंटकींतल्या प्रमाणें 'पठण पद्धती' ची शिक्षणपद्धति सुरू करण्यांत आली. ह्या पद्धतीप्रमाणें मुलें आपआपले धडे मोठ्यानें वाचून तयार करीत असतांना दुरून ऐकणाराला शाळेंतून मधमाश्यांचें घोंघावणें ऐकू आल्यासारखें वाटे व शाळेंत जाऊन पाहिलें तर वाटे ती एखादी राजकीय परिषद असावी. शिक्षक हिकोरीची काठी हातांत ठेवून शिकविण्याचें काम करीत. 'ढ' मुलाला एखाद्या वेळीं वर्गाच्या कोपऱ्यांत पाठवून 'मूर्खाच्या टोपीचें' तिकोणी आसन घालून बसण्याची शिक्षा दिली जाई. वर्षाच्या सुरुवातीला केव्हां केव्हां एखाद्या थोराड व तापट मुलाशीं झगडून वर्गांत शिक्षकाचा वचक बसवावा लागे. आणि नवल असें कीं, मुलांनीं आपल्या मनाला येईल तो धडा शिकण्यासाठीं निवडावा अशी पद्धति होती. श्री. क्रॉफर्ड ह्यांनीं मुलांना वागावें कसें तें शिकविण्याची धडपड केली. त्यासाठीं ते खाद्या मुलालाच बाहेरून शाळेंत यावयास सांगत व जणूं काय तो शाळेंत आलेला पाहुणाच आहे, असें मानून सर्व विद्यार्थ्यांशीं त्याचा परिचय करून देत. वळणदार आणि स्पष्ट अक्षर कसें काढावें आणि अस्खलित कसें बोलावें, ह्या गोष्टी एबला श्री. डोर्सी ह्यांच्या शाळेंत शिकावयास मिळाल्या. आज उपलब्ध असलेलें लिंकनच्या हातचें पहिलें लिखाण म्हणजे पुढील दोन ओळी.

Abraham Lincoln, his hand and pen
he will be Good but god knws wohen

( अब्राहम लिंकन, त्याचें हस्ताक्षर आणि त्याची लेखणी हीं उत्तमच निपजतील. पण तो दिवस कधीं उगवणार तें एका परमेश्वरालाच ठाऊक.)

डोर्सी आणि स्वीनी ह्यांच्या शाळांत लिंकननें प्राण्यांना क्रूरतेनें वागविण्याविरुद्ध निबंध लिहिले. सरहद्दीवरल्या त्या असंस्कृत आणि अप्रगत माणसांना ही गोष्ट चकित करणारी होती. त्यामुळें मुक्या प्राण्यांना माणुसकीनें वागवावें म्हणून अब्राहमनें त्यांची घेतलेली कड त्याचे कित्येक शाळासोबती कधींच विसरले नाहींत. आयुष्यभर लिंकन कवितेचा शौकिन होता. ह्या दोन शाळांत असतांना आणि त्यानंतरहि थोडे दिवस लिंकननें कविता करण्याचा प्रयत्न केला. ह्या प्रयत्नांतून शेक्सपियरशीं किंवा लॉंगफेलोशीं स्पर्धा करील असें कांहीं निर्माण झालें नाहीं. ह्यांपैकीं आरंभीच्या एका हस्तलिखितांत लिंकननें पुढील करुणोद्‌गार काढलेले आढळतात.

Time what an empty vapor tis
and days how swift they are
swift as an indian arrow
fly on like a shooting star
the present moment just, is here
then slides away in haste
that e can never say they're ours
but only say they'e past.

( काल पुरुष किती ओका ओका आहे !
आणि कालगति तरी किती विलक्षण !
वर्तमानाचा क्षण—
उल्कापाताप्रमाणें सुटणाऱ्या हिंदी शरांसारखा
निमिष मात्र उजळतो;
आणि चपलगतीनें सृष्टिआड होतो.
आपण इतकेंच म्हणूं शकतों—
ते क्षण ' आपले ' कधींच नसतात
ते केवळ दृष्टिआड झालेले असतात. )

एबचे बरेचसे जुने शेजारी सांगतात कीं, एब आळशी होता. कामापेक्षां पैसा आणि खाणेंपिणें हेंच त्याला अधिक. त्याच्याबद्दल आदरानें लिहिणारा डनीस हँक्स. पण त्यानेंहि कबूल केलें आहे कीं, 'तो अतिशय आळशी होता, नेहमीं कांहीं तरी वाचावें, खरडावें, लिहावें, आंकडेमोड करावी, कविता करावी, हा एबचा उद्योग.' शेजारच्या एका शेतकऱ्याला एब म्हणाला होता, काम कसें करावें हें बापानें त्याला शिकविलें होतें; पण त्यांत रस कसा घ्यावा हें शिकविलेलें नव्हतें.

खरें म्हणजे, एबच्या शरीराचा व मनाचा विकास होत होता. वाढत्या रोपाच्या वाढीला सामुग्री लागावी, तसा त्याचा उत्साह ह्या वाढींतच खर्च होई. खरोखरीच तो काम करी. आठव्या वर्षापासून त्याचें शरीर झिजत होतें. हें झिजणें चालूच होतें. पण ह्याच्या जोडीला शिक्षणासाठींहि तो कष्ट करीत होता. खोपटाला घर मानणाऱ्या तेथील अशिक्षितांना वाचणें व अभ्यास करणें हें कामच वाटत नव्हतें. दक्षिण इंडियानांतला अतिशय तीव्र बुद्धीचा एक तरुण माणूस त्यांच्या (व त्याच्याहि) स्वप्नींहि कधीं आलें नसेल, अशा भवितव्याची तयारी करतो आहे, ह्याची त्यांना उमजच पडत नव्हती.

टॉम लिंकनला आपल्या मुलाच्या नावीन्यपूर्ण व चमत्कारिक वागण्यामुळें कधीं संतोष वाटे, तर कधीं तो संत्रस्त होई. आपल्या जमिनींत खणणें, नांगरणें व कुंपण घालणें असलीं कामें करून घेण्याची त्याची दृष्टि. त्यामुळें कधीं एबचें वर्तन त्याला कुचंबणेचें वाटे, तर कधीं त्यालाहि स्वतंत्र मार्ग चोखाळण्याची संधि कां देऊं नये, असेंहि त्याला वाटे. शेतांतील मातीच्या ढिगाऱ्यावर उभें राहून हास्यविनोद करतांना, नकला करतांना किंवा हवेंत हातवारे करतांना लिंकनला पाहिलें कीं, शेतांत काम करणाऱ्या कोणत्याहि गृहस्थाला किंवा लहान मुलाला काम थांबवावेंसेंच तीव्रतेनें वाटे. जेंट्रीच्या भांडारांत असो, अथवा लोहाराच्या दुकानांत असो, किंवा धान्य दळणाच्या गिरणींत असो– कोठेंहि गेला, तरी लिंकन लोकांचें भरपूर मनोरंजन करीत असे. ह्यामुळेंच तो त्यांचा लाडका होता. बऱ्याच वेळां पहावें तों, तो आपला

कांहींना कांहीं वाचीत असलेला दिसे. घरीं-रिकामा बसला असतां वाचन, नांगरतांना वाचन व शेकोटीजवळ शेकत बसला असतांहि वाचन. जळीं, काष्ठीं, पाषाणीं सारखें वाचन. टॉम लिंकनला केवळ सहीच करतां येई; तेव्हां साहजिकच त्याला वाटे, इतक्या वाचनापासून काय फायदा होणार आहे?

कांहीं लोक सांगतात कीं, लिंकनचे वडील समजदार होते. त्याच्या अभ्यासांत त्यांनीं कधींच व्यत्यय आणला नाहीं. डेनीस हॅंक्सला दोघांहि-बद्दल आपुलकी वाटे. पण त्याचें मात्र असें म्हणणें आहे कीं, परक्याचे देखत रोखठोक बोलण्याबद्दल टॉमनें लिंकनला केव्हां केव्हां दंडुक्यानें मारलें-झोडपलें होतें.

पण टॉम इतका कठोर होता, तरी एबच्या सावत्र आईनें–साराह बुश लिंकननें–एबच्या वाचनाला उत्तेजन दिलें. आणि त्याच्या गमतींनीं ती मनमुराद सुखावे.

लिंकननें एकदां काय गंमत केली, एका मुलाला त्यानें उलटा केला आणि चिखलानें बरबटलेले त्याचे पाय झोपडीच्या छपराच्या आंतील भागाला टेकून तशा स्थितींत त्याला चालावयास लावलें. हें पाहून साराह बुश लिंकन रागवायचें दूरच राहिलें, पण खदखदून हंसूं लागली. एबच्या खोडसाळपणांत दुष्टता नसे. त्यानें लगेच त्या ठिकाणीं उमटलेल्या पावलांवर सफेतीचा हात फिरविला. साराहानें म्हटल्याप्रमाणें, खरोखरच त्या दोघांच्या मनाचा मेळ बसला होता. जेवतांना हातांत पुस्तक घेऊन बसल्याबद्दल किंवा मध्यरात्रीपर्यंत वाचीत जागें राहिल्याबद्दल तिनें लिंकनला कधींच खडसावलें नाहीं. इतकेंच कशाला, 'छापील जगाचा ' अजब मार्ग आक्रमीत किती तरी दूर असलेल्या ज्ञानसाम्राज्यांत प्रवेश करण्यापासून लिंकनला कोणीच परावृत्त करूं शकलें नसतें. डेनीस हॅंक्सनें म्हटलें आहे, एब बारा वर्षांचा झाल्यापासून त्याच्या हातांत पुस्तक नसल्याचें मला कधीं आठवतच नाहीं. तो खमीसाच्या आंतल्या बाजूस पुस्तक ठेवी; त्याच्या विजारीचे खिसे कांहीं खाद्यपदार्थांनीं भरलेले असत व अशा स्थितींत तो शेतांत खणण्याचें किंवा नांगरण्याचें

काम करावयास जात असे. दुपारीं तो एखाद्या झाडाखालीं सावलीला बसे व खातांखातां वाचीत असे आणि रात्रीं घरीं परत आल्यानंतर तो किंचित आळोखेपिळोखे देऊन व हातपाय ताणून वाचावयास बसत असे.

वाचणें आणि वाचतांना पाठीवर रेलणें ह्या दोन्ही संवयी लिंकनला अखेरपर्यंत होत्या. ' इसापनीति ', ' रॉबिनसन क्रुझो ', ' यांत्रिक क्रमण ' व पारसन व्हीमचें ' वॉशिंग्टन, ' हीं त्यानें पहिल्यांदा वाचून संपविलेलीं पुस्तकें. आणि जवळ जवळ तोंडपाठ होण्याइतका ह्या पुस्तकांचा अभ्यास त्यानें केला होता, असें सांगतात तें खरें असावें. एकदां लिंकन वाचीत बसला होता. इतक्यांत पाऊस आला आणि झोपडीच्या फळकुटांच्या फटींतून ठिबकलेल्या पाण्यानें अचानक त्या पुस्तकाचें मुखपृष्ठ डागाळलें. तें पुस्तक त्यानें दुसऱ्याकडून मागून आणलें होतें. तेव्हां तें नवें घेऊन परत करण्यासाठी त्यानें दोन तीन दिवस धान्य भरण्याचें काम केलें. ही सगळीच कथा अद्‌भुत वाटेल पण असें घडलें असल्याचा पुरावा सांपडतो.

व्हीमच्या ' वाशिंग्टन ' चरित्रावर अनेकांनीं टीका लिहिल्या आहेत वॉशिंग्टनला खोटें बोलणें जड वाटलें, म्हणून आपल्या छोटया कुऱ्हाडीनें आपणच चेरीचें झाड खापावलें असल्याचें त्यानें कबूल केलें; ही घटना घोळवून घोळवून सांगितली गेली आहे. पण प्रामाणिक एबच्या मनावर ह्या पुस्तकाचा कसा उत्कट आणि टिकाऊ परिणाम झाला हें मात्र कोणीं सांगितलेलें नाहीं.

बऱ्याच प्रमाणांत लिंकननें वॉशिंग्टनच्या जीवनाधारें आपल्या जीवनाची आंखणी केली. व्हीमची गौरवाची परीकथा एक वेळ बाजूला ठेवली, तरी अमेरिकेच्या ह्या दोन अध्यक्षांत गमतीदार सारखेपण दिसेल. दोघेहि इंग्लिशांपैकीं, दोघेहि उंच ( वॉशिंग्टनची उंची सात फूट एक इंच व लिंकनची सहा फूट चार इंच. ) तारुण्यांत दोघेहि खेळाडू, दोघेहि जमिनीची मोजणी करण्याला शिकलेले. आणि दोघेहि अमेरिकेचे अध्यक्ष झाले; हें तर सर्वविश्रुतच; आणखी एक गोष्ट सत्य आणि अर्थपूर्ण आहे. दोघेहि विलक्षण प्रामाणिक होते. वॉशिंग्टन आणि लिंकन ह्यांच्या चरित्रग्रंथांच्या अभ्यासानें

किती तरी मुलांच्या जीवनाला आज निश्चितच कांहींना कांहीं वळण लागत असेल. आणि अशा मुलांपैकीं एखाद दुसरा तरी किंवा अधिकहि अमेरिकेचे भावी अध्यक्ष होतील.

लिंकनच्या काळांत मुलगा एकवीस वर्षांचा होईपर्यंत त्याच्यावर सर्वतोपरी बापाचा अधिकार असे. त्यावेळचा कायदाच असा होता. ह्या कालावधींतील मुलाच्या स्वकष्टाच्या मिळकतीवरील आपला कायदेशीर हक्क टॉम लिंकननेंहि कधीं सोडला नाहीं. साहजिकच, ह्या काळांत लिंकननें जें जें कमावलें तें सारें बापाच्या स्वाधीन झालें. केव्हां केव्हां तर त्याला शेजाऱ्यांच्या शेतावर काम करावें लागलें आहे आणि केव्हां केव्हां घरडुकरांची कत्तलहि करावी लागली आहे. ह्या कामाचे त्याला दिवसाला एकतीस सेंट्स मिळत. डुकराला कापणें हें एक क्रूरतेचें कृत्य होतें. एब हें काम सफाईनें व आवडीनें करीत असे, असें सांगतात. पण, वन्य पशूंना मारावें लागतें म्हणून ज्यानें शिकारीचा नाद सोडून दिला होता; मुक्या प्राण्यांबाबत होणाऱ्या क्रूर वर्तनाबद्दल त्यानें विरुद्ध निबंध लिहिले होते; अशा माणसाला डुकरांना कापण्याचें काम सुखद वाटेल, हें अशक्य आहे.

कांहीं गोष्टी मात्र एबला नक्कीच आवडत. कोठारांत धान्य भरणें, धान्य वारावणें, लाकडी सलपे जमा करणें इत्यादींसारखीं सामुदायिक रीत्या करावयाचीं कामें ह्यांत येतात. ह्या कामांत एबच्या हास्यविनोदाला संधी मिळे; भाषणें करणें, पळणें, आणि झगडणें हें सुद्धां शक्य होई. त्याचा कोटिबाजपणा ओबडधोबड आणि गमतीदार असे. अशावेळीं तो दारू अधिक घेई. पण ती केवळ गंमत म्हणून, एरव्हीं तो दारूला क्वचितच स्पर्श करी व दारू घेतली तरी त्याच्या तोंडून वेडावांकडा शब्द कधीं निघत नसे. त्याचें ज्ञान वाढत होतें. त्यानें सांगितलेल्या गोष्टी लोकांचें चांगलें मनोरंजन करीत. त्या गोष्टी प्राथमिक दर्जाच्या होत्या. अशा सामुदायिक कामांत एब रमून जात असे.

पण वर्तमानपत्रें वाचावयास मिळावींत म्हणून व पुस्तकांच्या शोधांत तो घरापासून जसजसा दूर जात होता, तसतसा तो बहुतेक शेजाऱ्यापाजाऱ्यांपासून मनानें दुरावत होता. त्याचे राजकीय विचार सुरुवातीला लोकशाही-

वाद्यांना अनुकूल होते. पण नंतर तो परंपरावादी बनला. नव्या प्रजासत्ताक पक्षाची स्थापना होईपर्यंत तो परंपरावादीच राहिला. १८५० च्या मध्याला नव्या प्रजासत्ताक पक्षाची स्थापना झाली. ह्याच पक्षानें अखेर लिंकनला 'व्हाइट हाऊस' मध्यें प्रवेश करावयाची संधी दिली.

ह्या सुमाराला वाचलेल्या दोन पुस्तकांचा प्रबळ आणि चिरस्थायी परिणाम लिंकनच्या परिणत मनावर आढळतो. 'इंडियानाचे सुधारलेले कायदे' व 'कोलंबियन क्लास बुक' हीं तीं दोन पुस्तकें. अधिकाधिक एकाग्र मनानें लिंकननें हीं पुस्तकें वारंवार वाचलीं.

पहिल्या पुस्तकानें त्याला कायद्याच्या अभ्यासाकडे वळविलें व नंतर त्यानें तो व्यवसाय पत्करला; इतकेंच नव्हे, तर 'स्वातंत्र्याची घोषणा' व त्याचा निर्माता थॉमस जेफरसन ह्यांच्याबद्दल त्याच्या मनांत आदरभाव निर्माण केला. ह्याशिवाय इतर कित्येक महत्त्वाच्या कागदपत्रांकडे लक्ष द्यायला त्याला उद्युक्त केलें तें ह्याच पुस्तकानें. अशा कागदपत्रांत घटनेच्या पहिल्या दहा सुधारणांचा अंतर्भाव होतो. इंडियानासकट वायव्येकडील सर्व संस्थानांत गुलामगिरी कायमची बेकायदा ठरली पाहिजे, हें त्याला ह्या पुस्तकानें शिकविलें. जन्मजात समता हा मनुष्याचा विशेष आहे, विधात्यानें माणसाला कांहीं चिरंतन हक्क दिले आहेत; सुरक्षितता, स्वातंत्र्य आणि सुखाचा शोध, हे त्यांपैकीं कांहीं होत. असल्या सिद्धान्तांचें मनन लिंकननें ह्याच पुस्तकाच्या वाचनांतून चालविलें होतें.

दुसऱ्या पुस्तकानें–'कोलंबियन क्लासबुक'नें त्याची दृष्टि सर्वसाक्षी बनविली व अमेरिकेच्याच नव्हे, तर पश्चिम पृथ्वीगोलापार नेली. अखिल जगाच्या भूगोलाचें व इतिहासाचें ज्ञान त्याला ह्या पुस्तकांतून झालें. आपण ज्या ग्रहावर राहतों, त्या ग्रहापलीकडे दृष्टि टाकली, तर आपल्या ह्या ग्रहासारखे आणखी कित्येक ग्रह दूरवरच्या भव्य व तेजस्वी सूर्याभोंवतीं प्रदक्षिणा घालीत आहेत; कोणत्याहि रात्रीं निरभ्र आकाशांत चमचमणाऱ्या लाखों ताऱ्यांसारखाच सूर्य हा एक तारा आहे, हें ज्ञानहि त्याला ह्या पुस्तकांतूनच झालें. ह्या पुस्तकानें त्याचा दृष्टिकोन विशाल केला.

असाच एक दिवस ! सूर्य पश्चिम समुद्रांत बुडी घेत होता व पूर्वेच्या क्षितिजावर पौर्णिमेचा चंद्र वर येऊं लागला होता. खाडीच्या पाण्यांत पाय सोडून त्याशीं खेळत लिंकन व शेजारची केटी रॉबी शेजारीं शेजारीं बसलीं होतीं. त्यानें केटीला सांगितलें कीं, खरें म्हणजे सूर्य खालीं जात नाहीं किंवा चंद्र वरहि येत नाहीं. खरें असें आहे कीं, पृथ्वी आपल्या भोंवऱ्यासारखी आंसावर फिरते आहे व त्यामुळें हे स्वर्गीयग्रह उगवतांना व मावळतांना दिसताहेत. केटी व एब हीं एकमेकांच्या प्रेमांत सांपडलेलीं नव्हतीं ! त्यांची केवळ शुद्ध मैत्री होती. पण आयुष्याच्या अखेरीपर्यंत केटी ज्योतिःशास्त्रांतला हा चमत्कारिक व साधा धडा कधींच विसरली नाहीं; किंवा त्या दिवशीच्या त्या संध्याकाळच्या शांततेत, सरितेच्या तटाकीं बसून, दक्षिण इंडियानांतील झाडींतून वर येणारा तो भल्या मोठ्या सुवर्णपुष्पासारखा चंद्र पाहतांना भल्या उंचीच्या व घरगुती वळणाच्या एबच्या प्रज्ञेच्या व ज्ञानाच्या अनुभवाच्या त्या क्षणाचा विसर तिला कधींच पडला नाहीं.

# ५

## मिसिसिपींतून....

> ‘ रोजगारावर काम करणारा मी एक मजूर होतों......हें सांगायला मला मुळींच लाज वाटत नाहीं. गरिबींतल्या कोणत्याहि मुलाला करावीं लागणारीं कामें मीं ह्या दिवसांत केलीं आहेत.
>
> **अब्राहम लिंकन**

लिंकनला आयुष्यभर कशाची ओढ होती असेल, तर ती मचव्यांची व जलमार्गावरील सफरींची. एबच्या जन्मापूर्वी टॉम लिंकननें स्वतः एक मचवा बांधला होता. त्यानें तो मालानें भरला व ओहिओ व मिसिसिपी ह्या नद्यांतून न्यू ऑर्लिन्स बंदरांत नेला होता. सरहद्दीवरच्या ह्या प्रदेशांत वाहतुकीचें

सर्वांत चांगलें साधन म्हणजे ह्या मोठमोठ्या नद्या. विशेषेंकरून धान्याच्या अवजड गोणी व मांसाच्या पेट्या किंवा जिवंत डुकरांचे पेटारे न्यायचे तर ह्या नद्यांइतकें सोयीस्कर साधन दुसरें नव्हतें. मिसिसिपीच्या रुंद खोऱ्यांत बरेंच धान्य पिके. ह्या धान्याला न्यू ऑर्लिन्स ही एकच मोठी बाजारपेठ होती.

नदीवरचा हा प्रवास म्हणजे एक प्रकारें साहस होतें. हें साहस करण्याची संधि मिळण्यापूर्वीं एबला कांहीं दिवस ह्या कामांत उमेदवारी करावी लागली. ह्या वेळीं त्याची उंची सहा फूट होती व त्याला नुकतेंच सोळावें वर्ष लागलें होतें. ह्या वयांत अँडर्सन क्रीकच्या मुखावर उतारूंची नेआण करण्याच्या कामीं एबची नेमणूक झाली. ही नेमणूक जेम्स टेलर नांवाच्या गृहस्थांनीं केली होती. ह्यांची स्वतःची नाव होती. ज्या ठिकाणीं एब काम करीत होता, त्याच ठिकाणीं अॅन्डर्सन नदी ओहिओ नदीला मिळते. येथील कावाडकष्टाच्या कामाबद्दल एबला रोज सदतीस सेंट्स मिळत होते. कांहीं प्रवाशांना येथून बोटीवर पोहोंचविण्याचें कामहि तो करीत असे. ह्या कामाबद्दल त्याला अधिक पैसेहि मिळत. एब ह्या कामावर असतांनाचा एक प्रसंग ! एक बोट नदीच्या पात्रांत खोळंबून राहिली होती. दोन इसमांना तिच्यावर जावयाचें होतें. पण त्या बोटीवर जावें कसें, ही त्यांना विवंचना पडली होती. एबनें आपल्या नावेंतून त्यांना तत्परतेनें त्या बोटीवर पोहोंचविलें. खूष होऊन त्या गृहस्थांनीं एबला अर्धा अर्धा डॉलर रक्कम दिली. ह्या आकस्मिक कमाईबद्दल एब म्हणतो, ' दिवसाचा तो लहानसा प्रहर. त्याप्रहरीं माझ्यासारख्या एका गरीब मुलानें एक डॉलर कमाविला होता. कांहीं केल्या माझा ह्या गोष्टीवर विश्वासच बसत नव्हता.'

एक वर्षानें एबला सतरावें वर्ष लागलें. त्याची उंची इतक्यांत आणखी दोन इंचांनीं वाढली होती. आणखी दोन वर्षांनीं तो आणखी दोन इंचांनीं उंच झाला. ह्यावेळीं तो सडपातळ व सुदृढ आणि भरदार तरुण दिसूं लागला होता. एब मुळांतच प्रामाणिक आणि विश्वासू होता. तसाच तो



अनुक्रम 23472 वि: 2/1/7
क्रमांक 5 3 नों: दि: 23.1.75

खेळकरहि होता. बरेचसे शेजारीपाजारी एबचें कौतुक करीत. आणि त्याला कारणहि तसेंच होतें. त्याच्याइतका सोटयाचा जोरदार फटका मारणारा इंडियानाच्या त्या भागांत आणखी कोणी नव्हता. तरीसुद्धां ह्या वयांत आयुष्यांतील एक सुसंधी म्हणून सांगतां येईल असें काम मिळावें हें नवल होतें. जेंट्री नांवाच्या गृहस्थानें एबला ही संधि दिली होती.

जेंट्री म्हणजे ह्या भागांतला एक श्रीमान् गृहस्थ.' जेंट्री व्हिले ' येथें त्याचें दुकान होतें. ह्या जेंट्री व्हिलेंतच चुटके आणि चटकदार गोष्टी सांगून एब उनाड आणि गप्पिष्ट लोकांची करमणूक करीत असे. जेंट्रीनें एबला असें सुचविलें कीं, आपला मुलगा ॲलेन ह्याला मदतीला घेऊन एबनें एक मचवा बांधावा आणि त्याच्यावरून न्यू ऑर्लिन्सला जावें. ही संधि येतांच लिंकन ताबडतोब तयार झाला. मचव्याच्या नाळीवरचा वल्हा सांभाळण्याची त्याची कामगिरी होती. ह्या कामाबद्दल महिन्याकांठीं आठ डॉलर देण्याचें जेंट्रीनें कबूल केलें होतें. शिवाय येतां जातां सगळा खर्च जेंट्रीनें करावयाचा होता.

मचवा हें नदीच्या वाहतुकीचें एक साधारण वाहन. ओहिओ नदीच्या कांठाला पसरलेल्या रानांत लांकूड विपुल होतें. तें कापून आणून योग्यप्रकारें तासल्यानंतर त्याचीं चौकोनी बहालें व फळ्या बनवीत. ह्या बहालांचा व फळ्यांचा मचवा बांधीत. एकेका मचव्याची लांबी विसापासून ऐंशीं फुटांपर्यंत असे. बांधणीचा खर्च दर फुटाला एक डॉलर ह्या प्रमाणांत येई. असल्या मचव्यावर एक लांकडी खोपटहि बांधीत. मालाच्या सौद्यासाठींहि खास जागा असे. एक कोठार ठेवीत. नेहमीं लागणाऱ्या वस्तु ठेवण्यासाठींहि वेगळ्या खणाची सोय केलेली असे. हे मचवे समुद्रांतून जात असतांना भटक्या व लुटारू चांचेलोकांचा त्यांना धोका असे. चांचेलोकांच्या बंदुकांच्या गोळ्यांपासून बचाव व्हावा म्हणून मचव्याचे कांठ उंच ठेवलेले असत. पुढच्या भागांत ते निमुळते असत. पाण्यांत ह्यांना सावरावयाचें म्हणजे मोठें अवजड काम. नदीच्या प्रवाहाच्या विरुद्ध दिशेनें ते नेणें तर अशक्यप्राय. पण मचव्यांतून मालाची ने–आण करण्याचा खर्च फार नसे. धान्याच्या गोणींनीं,

दारूच्या पिपांनीं किंवा पाळीव जनावरांनीं हे मचवे भरले कीं, विशेष सायास न पडतां त्यांच्यासह न्यू ऑर्लिन्सला जाणें सोपें होतें. कितीहि वजनाचा माल त्यांत भरला, तरी ते तरंगत जात.

आतां असा हा मचवा बांधावा कसा ह्याची विवंचना करण्याचें लिंकनला कांहीं कारण नव्हतें. मचवा बांधतांनाचें बारीकसारीक काम करण्याची मदत वडिलांना लिंकननें अनेकवेळां केली होती. फरशी, कुऱ्हाड, रोखणी व रंधा, हीं हत्यारें कधीं वापरावीं, ह्याची माहिती त्याला होती. आणि झाडें तोडणें व लांकडें तासणें ह्यांसारख्या अवजड व कष्टाच्या कामाला आवश्यक तें शरीरबळहि त्याला होतें.

लिंकनला नोकरीला ठेवतांना ही त्याची पात्रता जेंट्रीनें काळजीपूर्वक न्याहाळली होती ह्यांत शंका नाहीं. लिंकनच्या भरंवशावर जेंट्रीनें हातीं घेतलेलें हें काम वायां जाणारें नव्हतें; किंवा ह्यासाठीं करावा लागणारा खर्च बुडित खर्चांत जमा होण्याचा धोकाहि नव्हता. हें उमजूनच जेंट्रीनें लिंकनशीं करार केला होता. नदीच्या ह्या विशाल जलमार्गावरील लोकांचें आयुष्य दगदगीचें, धकाधकीचें व भयप्रद होतें. तरी १८१८ च्या एप्रिलमध्यें एब आणि त्याचा साथीदार ॲलेन जेंट्री हे दोन तरुण आपल्या नियोजित सफरीवर निघाले. माइक पिंक ह्याला 'मचवेवाल्यांचा बादशाह' म्हणत. तो ह्यावेळीं हयात नव्हता. त्यामुळें त्याच्या घातपाती ताकदीच्या आव्हानाला तोंड देण्याचा प्रसंग लिंकनवर येण्याचा संभव नव्हता. पण माईकसारखी फुशारकी सांगणारे व त्याच्या ताकदीची जवळजवळ बरोबरी करणारे चांचे ह्यावेळींहि ह्या प्रदेशांत वावरत होते. आपली ताकद सिंहाची आहे, झेप घोड्याची किंवा मिठी अजगराच्या मगरमिठीसारखी आहे. असा त्यांचा गर्व होता. कोणालाहि चुटकीसरसें गारद करणें आपल्या हातचा मळ आहे, असा त्यांचा भाव असल्यामुळें आपल्या हल्ल्याचें आव्हान स्वीकारायला कोणीच तयार होणार नाहीं, ह्याची त्यांना बालंबाल खात्री होती. कोणताहि अंमली पदार्थ कितीहि प्रमाणांत घेतला, तरी त्याची नशा आपल्यावर चढणार नाहीं, असें ते अभिमानानें सांगत; आणि आपली

बरोबरी करील असा जवळपासच्या प्रदेशांत कोणीच नाहीं हा त्यांचा ताठा होता.

तसें पाहिलें तर लिंकन चटकन् हमरीतुमरीवर येणारा गृहस्थ नव्हता. पण तसाच प्रसंग आला तर मचवा, सामान, व अॅलेन ह्यांच्याबरोबर स्वतःचें संरक्षण करण्याची ताकद त्याच्या एकटयाच्या मनगटांत होती. एब हा ह्या तोडीचा साथीदार होता, हें जेम्स जेंट्री पूर्णपणें जाणून होता. केव्हिन रॉक हें ठिकाण ओहिओ नदीवरील इलिनॉयसच्या किनाऱ्यावर आहे. येथें खुनी लुटारूचें वास्तव्य असे. त्यांना चुकवून हे दोघे एकदां पुढें सटकले असते कीं, पुढें भेटणाऱ्या चाच्यांच्या बारीकसारीक झपाटींतून तगून न्यू ऑर्लिन्सला सुखरूपपणें पोहोंचणें सोपें होतें.

आधींच ओक वृक्षांचा पाचोळा जमिनीवर पसरला होता. त्यांतून नेच्यांचे वक्राकार कोंब डोकावत होते. दाट झुडुपांतील तांबडया कळयांनीं रंगाच्या भावी दुनियेची नांदी केली होती. ह्या मोसमाला एब आणि अॅलेन ह्यांनीं मचवा हांकारला. त्यांत धान्य, निरनिराळ्या प्रकारचें मांस, विक्रीच्या इतर वस्तु इ० माल भरला होता. जेंट्री व्हिल्याचा किनारा सोडून नदीच्या खोल पात्रांतून मचवा जाऊं लागला. अशा तऱ्हेनें त्यांनीं आपल्या साहसी सफरीला आरंभ केला. ह्यावेळपर्यंत त्यांच्या मचव्याच्या ताज्या लांकडाचा वासहि निवळला नव्हता.

विशाल ओहिओ नदी संथपणें वाहत होती. हिवाळयांत गळून पडलेलीं वृक्षांचीं पिवळीं जर्द पानें तिच्या प्रवाहांतून तरंगत जात होतीं. वसंत ऋतूच्या आरंभाला ह्याच नदीच्या प्रवाहांतून लांकडांचे ओंडके वाहत जात होते. वर आकाशांतून उत्तरेकडील शीत प्रदेशाच्या दिशेनें बदकांच्या जातीचे कांहीं पक्षी उडत चालले होते. ह्या दिवसांत उत्तरेकडील भागच त्यांना घरटीं बांधावयास सोयीस्कर होता. उडतांना हे पक्षी जो आवाज काढीत होते तो एखाद्या रानकोंबडीच्या एकाकी व वारंवार केलेल्या क्रंदनाच्या आवाजाला मागें टाकील असा होता.

नदीच्या कांठाला शेवाळलेल्या पाण्यांत खंड्यापक्षी बुडी मारीत होते व आपलें भक्ष्य शोधीत होते. एखाद दुसरें कांसव उन्हांत लांकडी ओंडक्यावर विसांवलें होतें. आधींच ओहिओ नदीचा प्रवाह भव्य होता. तशांत वाटेनें हजारों ओढे व नाले तिला येऊन मिळत व तिच्या प्रवाहांत भर टाकीत होते. उन्हाचा कडाका असो, पावसाची मुसळधार असो अथवा धुक्याचें आवरण असो, एब व ॲलेन ह्यांचा मचवा रात्रंदिवस पाण्यावर तरंगत होता. रात्रींच्या वेळीं ते मचवा नांगरून ठेवीत व वरील खोपटांत झोपी जात. असें होतां होतां एक दिवस त्यांनीं तें कुप्रसिद्ध केव्हिन रॉक मागें टाकून आपला मचवा सुखरूपपणें पलीकडे नेला. ह्यापुढें ते मिसिसिपीच्या गढूळ पाण्यांत प्रवेश करण्याच्या मार्गाला लागले.

१८११ सालापासून वाफेवर चालणाऱ्या आगबोटी ह्या भागांत वापरल्या जात. एब दोन वर्षांचा असतांनाची ही गोष्ट. पुढें १८१७ त नदीवरील वाहतुकीस उपयोगी पडतील अशा आठ आगबोटी बांधण्यांत आल्या. पुढील दोन वर्षांत ह्या संख्येंत आणखी साठांची भर पडली. ह्याशिवाय मळेवाल्यांच्या घरगुती उपयोगाचें सामान व शेतीचें उत्पादन, ह्यांनीं भरलेलीं जहाजें, पडाव, मचवे व तराफे, ह्यांच्यासारखीं जुनीं वाहतुकीचीं साधनेंही होतींच. ह्या सगळ्यांच्या जोडीनें उंच चिमणींतून धुराचे लोटच्या लोट निरभ्र आकाशांत सोडणाऱ्या सुबक आकाराच्या व बाजूला चक्रें असलेल्या बोटीहि नदींत एब आणि ॲलेन ह्यांच्या दृष्टीस पडल्या होत्या. कांहीं वर्षांपूर्वींच आपला मचवा घेऊन लिंकन व जेंट्री येथें आले असते, तर त्यांना 'वेस्टर्न इंजिनियर' ही संयुक्त संस्थानांची सैनिकी बोट दिसली असती. त्या बोटीची बांधणी डोळ्यांना दिपविणारी होती. तशी ती अद्‌भुतहि भासे. तिच्या शिडीचा रंग काळा होता त्यामुळें ती पुराणकाळांतील एखाद्या दैत्यासारखी वाटे. नागफण्यांच्या आकाराची तिची नाळ व तिच्या शिटीचा कर्कश आवाज लढाऊ हिंदी माणसालाहि भिववून टाकीत असे. असले भयानक अनुभव ह्या तरुणांना आलेले नसले तरी अटीतटीच्या प्रसंगांना त्यांना तोंड द्यावें लागलें असतें.

'नॅव्हिगेटर' हें ह्या क्षेत्रांत ह्या काळांतलें प्रसिद्ध नियतकालिक. पश्चिम भागांतील खलाश्यांना ह्या नियतकालिकाचा शब्द प्रमाण किंवा विश्वासार्ह मानावा, असें वाटत होतें. किनाऱ्या किनाऱ्यानें जाणाऱ्या जहाजांवर कधीं कधीं मिसिसिपीचे मातीचे तट कोसळून पडत. मळेवाले व सुतार प्रवाहांत लांकडें सोडून देत. तीं व इतर ओंडकें कधीं कधीं जहाजांच्या तळांत घुसत. नदींतून जहाज नेतांना खऱ्याखुऱ्या बेटांपेक्षां हे लांकडी ओंडके व तुटलेले कडे ह्यांच्या गर्दींतून वाट काढतांना व्यवधानी खलाशीहि रडकुंडीला येत. अशी ही ह्या वाहतुकीची उपलब्ध माहिती. खलाश्यांना अशा प्रकारच्या ज्या संकटांना तोंड द्यावें लागत असे, त्यासंबंधींचे इषारे 'नॅव्हिगेटर'नें वारंवार दिले आहेत.

एरव्हीं लिंकनच्या हातांत एखादें पुस्तक किंवा वर्तमानपत्र नाहीं असें क्वचित घडे. म्हणून अनेक प्रश्न मनाला चाटून जातात. आघाडीचा वल्हा सांभाळतांनाहि तो वाचनांत गर्क असे कीं काय? अँड्र्यु जॅक्सन व क्विन्सी ॲडम्स् ह्यांच्यांतील अध्यक्षपदाच्या ह्या वर्षीच्या चुरशीची चर्चा तो ॲलेन जेंट्रीशीं करीत होता कीं काय? मिसिसिपीच्या खोऱ्यांतील संपत्ति त्याच्या मनश्चक्षूंपुढें नाचूं लागली होती कीं काय? मिसिसिपीचे लहान लहान प्रवाह उत्तरेकडे किंवा अज्ञात पश्चिमेकडे अथवा औद्योगिक दृष्ट्या प्रगत अशा पूर्वेकडे वहात गेले असल्याचें एक कल्पनाचित्र त्यानें मन:पटलावर रेखाटलें होतें कीं काय? त्याचा मचवा ज्या दक्षिण दिशेला चालला होता, ती मळेवाल्यांची व त्यांच्या गुलामांची दक्षिण, प्रागतिक विचारसरणीच्या राष्ट्रनिर्मितीला तापदायक होती, ह्याची जाणीव त्याला झाली होती कीं काय? असे अनेक प्रश्न उपस्थित होतात. परमार्थानें घेतलें तर हें सारें असंभनीय होतें. पण एब लिंकन नेहमींच विचारांत गढलेला असे. त्याचे ऐन तारुण्यांतले विचार 'शेखमहंमदी'हि होते. मिसिसिपींतून वाहतूक करणें हें ह्या भागांतल्या प्रत्येक मुलाचें स्वप्न होतें. तेव्हां लिंकनच्या चिकित्सक मनानें ह्या सफरींत काय काय पाहिलें असेल, अनुभवलें असेल, कल्पिलें असेल, तें सांगणें अशक्य आहे. पण त्याच्या अंगीं जी रग होती,

तिला अवसर देणारा केवळ एक उद्योग ह्या दृष्टीनें त्यानें ह्या सफरीकडे पाहिलें असेल, तर ह्या सफरींत फारशीं वांकडीं वळणें किंवा धोके नव्हते.

...एबच्या व ॲलेनच्या मचव्यानें बहुतेक पल्ला गांठला होता. हीं दोन तरुण मुलें लवकरच न्यू ऑर्लिन्सला सुखरूप पोहोंचतील, असें वाटूं लागलें होतें. पण ह्याच सुमाराला त्यांना 'मादाम डचेसन' च्या मळ्याजवळ चांच्यांनीं अडविलें.

ह्या घटनेसंबंधींची हकिकत लिंकननें सांगितली आहे ती अशी : आमच्या जवळचा कांहीं माल विकण्यासाठीं 'शुगरकोस्ट'च्या किनाऱ्या किनाऱ्यानें आम्ही सावकाश चाललों होतों. तसें अवश्यच होतें. अशाच एका रात्रीची गोष्ट. आम्हीं खोपटांत झोपलों होतों. सात निग्रो आमच्या मचव्यावर तुटून पडले. आम्हां दोघांना ठार करून मचव्यावरील मालाची लूट करण्याचा त्यांचा हेतु स्पष्टच होता. ह्या हल्ल्यांत एब व ॲलेन ह्यांना थोडी दुखापत झाली होती. पण काठ्या घेऊन त्यांनीं हल्लेखोरांना परतवलें. कांहीं अंतरापर्यंत त्यांचा पाठलागहि केला. नंतर नांगर ओढून ते किनाऱ्यापासून दूर सरकले व दिवस उगवेपर्यंत सारखें वल्हवीत राहिले. ह्या हल्ल्यांत लिंकनच्या डोक्याच्या वरच्या भागाला झालेल्या जखमेची खूण आयुष्यभर होती. इतक्या सगळ्या गोष्टीनंतरहि ह्या हल्ल्यांतून लिंकनच्या मनांत निग्रोंसंबंधीं कटुता निर्माण झाली नाहीं; किंवा सगळे निग्रो खुनी व लुटारू आहेत असें त्याच्या मनानें घेतलें नाहीं. किती तरी गोरे व हिंदी चांचेगिरीचा हा खुनशी खेळ खेळत हें त्याला माहीत होतें. ह्यानंतर सुमारें पंचवीस वर्षांनीं अब्राहम लिंकननें 'मुक्तता' जाहीरनाम्यावर सही केली होती. संयुक्त संस्थानांतील निग्रोंना व गुलामांना गुलामगिरीच्या शृंखलांतून मुक्त करणाऱ्या तेराव्या सुधारणेची नांदी ह्या जाहीरनाम्यानें गाइली होती.

एब व ॲलेन दोघेहि न्यू ऑर्लिन्सला ह्यावेळीं प्रथमच येत होते. आणि तेहि दक्षिण इंडियानासारख्या वन्यप्रदेशांतून. त्यामुळें ह्या बंदरांतील देखावा त्यांना नवा व अद्‌भुत वाटला. धक्क्याला नांगरून पडलेल्या बोटींची रांग

मैलच्या मैल पसरली होती. अनेक जहाजें आखातांतून डौलानें बंदरांत शिरत होतीं. परदेशी खलाशी श्यामल वर्णाचे होते. त्यांच्या कानांत सुवर्णालंकार डुलत होते. शहरांतील इमारतींनीं इंद्रधनुष्याचा रंग धारण केला होता. त्यांच्या प्रवेशद्वारावरील पोलादी कमानींवर फुलत्या द्राक्षवेली विराजमान झाल्या होत्या. ह्या घमघमाटानें वातावरण भरलें होतें. रस्त्यानें नाना वर्णांच्या व नाना भाषा बोलणाऱ्या लोकांची सारखी ये-जा सुरू होती. ह्यांत क्रिऑल होते, फ्रेंच होते. स्पॅनिआर्डस होते, व मेक्सिकन होते. सतेज तपकिरी रंगापासून कुळकुळीत काळ्या वर्णापर्यंतचे गुलामहि येथें होते. सरहद्दीवरील पीजनक्रीकच्या ह्या दोन तरुणांना कुतुहलजनक वाटतील असे गंध, नाद व देखावे ह्या ठिकाणीं विपुल होते. रस्त्यानें आपल्याच धुंदींत चालतांना आलाप छेडणारे तरुण व रस्त्याच्या कडेला तात्पुरतीं दुकानें थाटून बसलेले विक्रेते ह्यांच्या गडबडाटानें ते निरुंद रस्ते गजबजलै होते. ह्या गजबजाटांत चर्चमधील घंटेचे नाद स्वरसमृद्ध वलयें पसरवीत होते.

एब व ॲलेन ह्यांचें मालाच्या विक्रीचें काम लवकरच संपलें. साहजिकच त्यांना घरीं परतणें आवश्यक होतें. त्यावेळीं त्यांनीं डबल डेकच्या वाफेच्या बोटीनें प्रवास करण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें ते निघाले. किनाऱ्यावरील हिरवी झाडी हळुहळू सरकत होती. अशा वेळीं विजार व सदरा घालून व्यापारी-प्रवाशांसोबत कट्ट्याशेजारून रमतगमत चालणें सुखावह होतें. बोटीचा कॅप्टन हा ह्या 'तरंगत्या दुनियेचा बादशहा' होता. ह्या वेळीं लिंकनला एक नवीन कल्पना सुचून गेली.

इंडियानाचा किनारा सोडल्यापासून दोन महिन्यांनीं एब व ॲलेन दक्षिण इंडियानांतील आपल्या घरीं परतले होते. विल्यम वूड हा एक प्रतिष्ठित गृहस्थ एबचा मित्र होता. एबनें त्याला एक विनंती केली. ह्या विनंतींत एबची महत्त्वाकांक्षा दडलेली होती.

वूड ह्यांनीं हा वृत्तांत पुढीलप्रमाणें लिहून ठेवला आहे.—" एके दिवशीं एब आमच्या घरीं आला. तो संकोचला होता व म्हणून जवळच पण लाजून उभा होता. त्याला कांहीं तरी बोलावयाचें आहे, हें मी ओळखलें. मींहून

त्याला विचारलें, 'एब, कसल्या फिकिरींत आहेस ?" त्यानें उत्तर केलें, 'काका, मला बोटीवर नोकरी करायची आहे. तुमच्या ओळखीच्या एखाद्या बोटवाल्याला मला ठेवायला सांगाल का?' मीं म्हटलें, 'तुला अजून एकवीस वर्षं कुठें झालीं आहेत?' तो म्हणाला, 'तें खरं, पण मला कांहीं तरी उद्योग केलाच पाहिजे."

ह्या मुलाच्या कल्याणासाठी म्हणून वूडनीं त्याची विनंती अव्हेरली. त्यामुळें एबनें आयुष्यांत कधींच वाफेची बोट चालविली नाहीं.

एब निराश झाला होता. केव्हां केव्हां तो कुरकुरतहि असे. आपलें वाचन मात्र त्यानें अधिक अधाशीपणानें चालू ठेवलें. सांगितलेली प्रत्येक गोष्ट तो पार पाडी; पण अस्वस्थ, धरसोड व निराश वृत्तीनें कधीं हंसतखेळत, तर कधीं चिंताग्रस्त, कधीं गोष्टी सांगत तर कधीं गप्पाष्टकें करीत. कधीं कसरतहि करीत तर कधीं साधारण असें विडंबनपर कांहींतरी लिहीत, एबचे दिवस भराभर जाऊं लागले.

...ग्रीग्जबाय घराण्याशीं त्यानें वैर धरल्यासारखें दिसत होतें. कारण, पहिल्या बाळंतपणांत साराहाची म्हणजेच त्याच्या बहिणीची योग्य ती काळजी आरॉन ग्रीब्जबायनें – तिच्या नवऱ्यानें – घेतली नव्हती; म्हणून ती मरण पावली, असें लिंकनला वाटत होतें. असे दिवस काढीत असतां त्याला असें वाटूं लागलें होतें कीं,' इंडियानांतील त्या लहानशा व सामान्य शेतजमिनीवर बापाचाच वारसा चालवीत न राहतां आपण निराळा, आपल्या थोरवीचा कांहीं तरी उद्योग केला पाहिजे. म्हणून एकवीस वर्षं केव्हां होतात, ह्याकडे त्याचें लक्ष लागून राहिलें होतें. हाच त्याच्या स्वतंत्र आयुष्याचा आरंभ ठरणार होता.

आणि म्हणूनच कसेबसे दिवस कंठणारें आपलें कुटुंब पुन्हा एकदां स्थलान्तराचा – नव्या प्रदेशांत जाण्याचा-बेत करूं लागलें हें कळल्यानंतरहि त्याला दुःख झालें नाहीं. ह्या खेपेला हें कुटुंब मध्य इलिनॉयसच्या काळ्या सुपीक जमिनीकडे चाललें होतें.

# ६

## इलिनॉयन्सच्या सरहद्दीवर

' वयाच्या एकविसाव्या वर्षी मी इलिनॉयसला आलों. '

—ए. लिंकन.

ह्या कुटुंबांतील अस्वस्थ आणि असमाधानी माणसांत तरुण वयाचा एब हा कांहीं एकटाच नव्हता. पीजनक्रीकच्या परिसरांत पुन्हा एकदां मेंदूच्या रोगापासून गुरांना त्रास होऊं लागला होता. एका आठवड्याच्या मुदतींतच डेनीस हॅंक्सच्या चार गाई व अकरा वासरें ह्या रोगाच्या कराल दाढेंत सांपडून गतप्राण झालीं होतीं. थॉमस लिंकनला पन्नासावें वर्ष होतें; आणि ह्या वयांतहि तो आयुष्यांत अपेशी ठरला होता. इंडियानांत तो प्रथम आला तेव्हांचें त्याचें दारिद्रय तसेंच कायम होतें. अशा अवस्थेंत असल्यामुळें वाबॅश नदीच्या पैलथडीला सुपीक जमीन असल्याचें ऐकून त्याच्या आशेला नवी पालवी फुटली होती. ह्याची मीमांसा करतांना डेनीस हॅंक्स पुढीलप्रमाणें म्हणतो – मला आठवतें त्याप्रमाणें जॉन हॅंक्स हा सर्वां आधीं दैन्याला विटला व इलिनॉयसला निघून गेला. तेथें त्यानें जमीन खरेदी केली व सगळ्यांना एकत्र राहण्यासाठीं तेथें बोलाविलें. टॉम स्थलान्तराला केव्हांहि तयार होता. त्याच्या जमिनीच्या उत्पन्नाच्या दृष्टीनें विशेष प्रश्न नव्हता. जवळचें धान्य व गुरेंढोरें त्यानें विकून टाकलीं. नंतर होतें नव्हतें तें सारें सामान बैलगाडीवर चढवून लिंकन, हॅंक्स, हॉल व जॉन्स्टन ही सगळी मंडळी सोबतच निघाली. सारखें टोळ्यांनीं राहणाऱ्या इस्रायलांतील वन्य टोळ्यांसारखी आमची स्थिति होती. टॉमची दृष्टि तर सतत ' लॅंड ऑफ कॅनान ' कडे लागली होती.

वाबॅश नदीच्या पलीकडच्या बाजूला मधा-दुधाची समृद्धि होती. हेंच तें ' लॅंड ऑफ कॅनान. ' ह्या ठिकाणच्या हिरव्या कुरणांनीं आमच्यासारख्या किती तरी फाटक्या कुटुंबांना वारंवार आपल्याजवळ बोलाविलें असेल. येईल ती किंमत घेऊन टॉमनें आपली जमीन विकून टाकली होती. मित्रांचा व शेजाऱ्यापाजाऱ्यांचा निरोप त्यानें घेतला होता. घरगुती उपयोगाचें सामान बैलगाडीवर लादलें होतें. बैलगाड्या मार्गाला लागल्या होत्या. रस्त्यानें गचके घेत व रखडत ह्या गाड्यांचा प्रवास चालला होता. दमल्यामुळें शिणलेल्या चालीनें बायका-मुलें आपलीं जडावलेलीं पावलें कशींबशीं उचलीत गाड्यांमागून चाललीं होतीं. ह्या गाड्यांपैकीं एक गाडी एब हांकीत होता. बैलावर बसणाऱ्या एकेका आसुडागणिक एकेक विनोदी चुटका तो ऐकवीत होता. निदान डेनीस हॅंक्सला तरी तसें वाटत होतें. ' कोणत्याहि घटक राज्यानें राष्ट्रीय कायद्याची पायमल्ली करूं नये ' असा इषारा डॅनियल वेब्स्टरनें प्रतिनिधि सभेंतील आपल्या एका भाषणांत दिला होता असल्या गंभीर विषयावर एबचा विचार चालला होता हें निश्चितच. ' आज ह्या क्षणाला आणि सर्व काळीं ऐक्यभाव आणि एकजूट, स्वातंत्र्य आणि संघबुद्धि ' हीं ह्या भाषणांत घोषवाक्यांसारखीं येणारीं वचनें तर एब कधींच विसरला नाहीं.

तेरा जणांचा प्रवास चालू होता. हींव आणि आजूबाजूची निर्जनता ह्यांनीं एकमेकांना साहाय्य केलें होतें. टॉम. साराह बुश जॉन्स्टन लिंकन, अब्राहम, साराहाचा मुलगा जॉन्स्टन, मुलगी एलिझाबेथ व जांवई डेनीस हॅंक्स, डेनीस हॅंक्सचीं चार मुलें, साराहाची दुसरी मुलगी मॅडिल्टा व मॅडिल्टाचा नवरा स्क्वेर हॉल आणि त्याचीं छोटीं मुलें, इतक्या सगळ्यांचा प्रवास अशा स्थितींत चालला होता. ह्या प्रवासाबाबत लिंकननें असें लिहून ठेवलें आहे कीं, ' आम्हांला अतिशय कष्ट पडत होते, आम्हीं खूप दमलों होतों व आमचीं पावलें जड पडत होतीं.'

उत्तरेकडील व्हिन्सेन्नीसच्या दिशेनें हा सगळा घोळका निघाला. व्हिन्सेन्नीस हें शहर वाबॅश नदीच्या किनाऱ्यावर आहे. इंडियानांतील तें सर्वांत

मोठें शहर. ह्या शहरीं पोहोंचल्यानंतर सगळीं तराफ्यावरून नदीपार झालीं. येथून पुढें उजाड प्रदेशांतून इलिनॉयस भागांतील त्यांचा दगदगीचा प्रवास सुरू झाला. अर्धवट वाळलेल्या चिखलांत गाडीचीं चाकें रुतत होतीं. वेड्यावांकड्या वळणांवरून गाडीला योग्य मार्गावर आणावें लागत होतें. नदी कित्येक ठिकाणीं ओलांडावी लागत होती. ओंडक्यांनीं अडलेल्या वाटा मोकळ्या कराव्या लागत होत्या. जागोजागीं तळ ठोकून मुक्काम करावा लागत होता. असें करीत करीत दोन आठवडे हा प्रवास चालला होता. हें सगळें डेनीस हँक्सनें आपल्या आठवणींत सांगितलें आहे.

ज्या प्रदेशांत ही मंडळी आली होती तो प्रदेश वसलेला नव्हता. ओहळ व नाले सर्वत्र पसरले होते. त्यांच्यावर कोठेंच पूल बांधलेले नव्हते. खाडी ओलांडतांना तर कित्येक ठिकाणीं गाडीचे बैल वाटेंतच थबकत. पावला-पावलाला असे ते थबकत. कारण, वाटेवर बर्फाचा पातळ थर होता. एबच्या सोबत एक कुत्रा होता. कधीं धांवत तर कधीं सावकाश रमत गमत तो धन्याच्या मागून निष्ठेनें चालला होता. एकदां तो बराच मागें असावा म्हणून तो कितीसा मागें आहे हें पाहण्यासाठीं एब मागें वळला; तर त्याला असें आढळून आलें कीं, तो कुत्रा एब होता त्या ठिकाणाहून किती तरी दूर थबकून उभाच होता. एब व तो कुत्रा ह्यांच्यामध्यें बर्फाची नदी होती. त्या पाण्यांत स्वतःचें शरीर झोकून देण्याचें धाडस त्या कुत्र्याला होत नव्हतें. ह्या प्रसंगींची एबची आठवण पुढीलप्रमाणें आहे. ' कुत्र्यासारखा प्राणी झाला म्हणून काय झालें ? त्याला तसेंच त्याठिकाणीं सोडून माझ्याच्यानें पुढें जाववेना. पायांतले बूट व मोजे काढून मी बर्फांतून पलीकडे गेलों; आणि त्या कुडकुडणाऱ्या प्राण्याला माझ्या दोन्ही हातांच्या कवेंत घेऊन दिमाखानें प्रवाह ओलांडून आलों. त्यावेळीं त्या कुत्र्यानें आनंदानें मारलेल्या उड्या आणि त्याच्या कृतज्ञतेच्या इतर हालचाली पाहूनच केवळ माझ्या श्रमांची परतफेड झाल्यासारखें मला वाटलें.'

असा प्रवास करीत करीत ही सारी मंडळी सँगॅमॉन नदीच्या उत्तर किनाऱ्यावरील एका भूशिरवजा प्रदेशांत आली. ह्या प्रदेशाच्या पलीकडे

अरण्य होतें. डेकॅटूरच्या पश्चिमेला दहा मैलांवर हें ठिकाण होतें. १८३० मधल्या मार्च महिन्यांतील पहिल्याच आठवड्यांतल्या एका दिवशीं ही मंडळी ह्या ठिकाणीं पोहोंचली. एबच्या वयाला ह्यावेळीं नुकतींच एकवीस वर्षें पुरीं झालीं होतीं.

वस्तीला योग्य अशी एक जागा पाहून त्यांच्यापैकीं पांचजणांनीं लगेच तेथें नेहमींच्याच पद्धतीची झोपडी उभी केली. त्यानंतर सर्वांनीं त्या लांकडी गुहेंत अस्वलांसारखी गर्दी केली. ह्या झोपडींतच ह्या मंडळीनें वसंत ऋतूचे दिवस घालविले. उन्हाळाहि त्यांना तेथेंच काढावा लागला व ह्या ठिकाणीं असतानांच हेमंत ऋतूहि सरून गेला; आणि १८३०–३१ चा हिंवाळा सुरू झाला. कोणाचा विश्वास बसणार नाहीं इतकी थंडी ह्यावेळीं पडली होती. ती सारी ह्या मंडळीनें अंगावर घेतली.

लिंकन येथें लांकडें चिरण्याचें काम करीत होता. भक्कम आकाराची कुऱ्हाड पेलण्याइतका तो मोठा होईपर्यंत असलींच कामें लहानसहान प्रमाणांत करीत होता. त्याच्या ह्या कामामुळें तो येथें 'लांकुडफोड्या' ह्या नांवानें ओळखला जाऊं लागला. संयुक्त संस्थानांचें अध्यक्षपद मिळविण्यास त्याला हीच कीर्ति उपयोगी पडली. हा प्रदेश मॅकॉन परगण्यांतला होता. लिंकन मंडळींच्या येथील वास्तव्यांतला पहिलाच शेतीचा हंगाम आला. ह्या काळांत अब्राहमनें आपली आई व भावंडें आणि जॉन हँक्स ह्यांच्या मदतीनें इतकीं लांकडें चिरलीं कीं, त्यांच्या दहा एकर पेरणीच्या शेताला कुंपणासाठीं तर तीं पुरलींच पण शिवाय चार हजार लांकडें त्यांनीं इतरांना भाड्यानें दिलीं.

१८३० मधल्या वसंत ऋतूंतच लिंकननें येथील खाजण जमीन नांगरून घेतली होती. जमिनींतील गवताच्या मुळ्याहि त्यानें उखळून टाकल्या होत्या. हे त्याचे श्रम सफल झाले होते. चार जुलैपर्यंत त्याचें शेत गुडघ्याएवढें उंच दिसूं लागलें होतें. त्या हिरव्यागार शेतावर टक्टकीत दाणेहि दिसूं लागले. सप्टेंबरपर्यंत हे दाणे चांगलेच भरले व पिकलेले दिसूं लागले. पण हिंवाळा तोंडावर आला असतांना तापसरीनें ह्या कुटुंबाला घेरलें. हिंवाळाहि कडक जाणार अशी चिन्हें दिसूं लागलीं.

१८३० च्या नाताळच्या दिवशीं बर्फ पडूं लागलें. अंगाला बोंचणारा वाराहि सुरू झाला. ह्या वाऱ्यानें त्या खाजण जमिनींत थैमान मांडलें. झोपड्यांपासून अगदीं जवळ असतांनाहि मळेवाल्यांना झोपड्यांकडे जाणाऱ्या वाटा सांपडेनाशा झाल्या. वाऱ्याच्या वेगाबरोबर झगडत एकेक पाऊल पुढें टाकण्याची त्यांच्यावर पाळी आली. कित्येक तर अशा स्थितींत थंडीनें गोठून गेले व मृत्यूच्या दाढेंत सांपडले. त्यांच्या मृतदेहाच्या राशी पुढील वर्षाच्या वसंत ऋतूपर्यंत तशाच पडून होत्या.

ही भयंकर स्थिति इलिनॉयसच्या ह्या सरहद्दीवरील देशांत कित्येक दिवस अशीच टिकून राहिली होती. त्यामुळें ह्या प्रदेशांतील रस्ते आणि पायवाटा बंद झाल्या होत्या. आणखी थोड्या कालावधींत झोपड्यांच्या छपरांवर तीन तीन इंच जाड बर्फाचा थर जमला. कोठें कोठें तर तो ह्याहूनहि अधिक होता. उष्णतामापक यंत्र शून्याखालीं बारा अंश दाखवूं लागलें. नंतर पाऊस पडूं लागला. पण हें पावसाचें पाणीहि ताबडतोब गोठून जाऊं लागलें. बर्फाच्या घातकी आवरणाच्या राशीवर हें पाणी चमकत होतें. अखेर पाऊस थांबायला व घोर थंडी पडायला एकच वेळ झाली.

ह्या थंडींत ज्या घोड्यांना आणि गायींना पुरेसा आसरा नव्हता तीं बर्फाच्या माऱ्यांत सांपडून मेलीं. हीच अवस्था शुभ्रलांगूल हरणांची झाली. संकटांत सांपडलेल्या ह्या असहाय आणि दुर्दैवी जीवांवर कोल्ह्यांनीं कांहीं दिवस आपली भूक भागविली. पण नंतर त्यांच्याहि नशिबीं ह्या जीवांचेंच मरण आलें. सांठवणीचें धान्य व वितळलेल्या बर्फाचें पाणी ह्यावर लिंकनच्या झोपडींतील मंडळींनीं नऊ आठवडे टिकाव धरला; व नंतर उपाशी राहण्याचें ठरविलें. त्यांच्या झोपडीच्या बाहेरील जग मात्र भकास, एकाकी व जीवितशून्य होतें. निसर्गाचा असला जीवघेऊ खेळ ह्यानंतर पुन्हा कधीं इलिनॉयसमध्यें दृष्टीस पडला नाहीं. त्या 'भयाण बर्फाब्दा'बरोबरच त्याचा अंत झाला.

पाठोपाठ सूर्यकिरणें चमकूं लागलीं आणि बर्फाच्या मोठमोठ्या राशी वितळूं लागल्या. दैन्य आणि आजार ह्यांचाच अधिक दुर्धर अनुभव लिंकनच्या

घरांतील मंडळींना ह्या ठिकाणीं आला होता. प्रत्येकालाच वाटत होतें कीं, ह्या ठिकाणाहून आपण निसटावें. तेव्हां लवकरच टॉम आणि साराह कोलस् परगण्यांत आलीं. ह्या ठिकाणीं त्यांनीं कायमचें घर केलें. आतांपर्यंत एबनें आपल्या श्रमांची सारी कमाई बापाच्या स्वाधीन केली होती. कायद्यानें त्याला कधींच स्वातंत्र्य दिलें होतें पण अजून त्यानें तें घेतलें नव्हतें. पण आतां आपण स्वतंत्रपणें ह्या जगांत आपलें नशीब काढावें असें त्याला वाटूं लागलें होतें. आतां त्याला स्वतंत्र उद्योगधंदा हवा होता.

डेंटॉन ऑफट ह्या गृहस्थानें एबची ही अडचण दूर करण्याची संधि त्याला देऊं केली. हा गृहस्थ ' शेखमहंमदी ' वृत्तीचा होता. उद्योगधंद्यांतले अनेक धाडसी बेत तो हातीं घेत असे. तो पक्का घमेंडखोर होता. दारुड्याहि तसाच. माल घेऊन न्यू ऑर्लिन्सला जाणाऱ्या मचव्यावर लिंकन, त्याचा सावत्र भाऊ जॉन जॉन्स्टन व जॉन हँक्स ह्या तिघांना नोकरीला ठेवण्याची तयारी डेंटॉन ऑफटनें दाखविली. ऑफटनें असें सुचविलें होतें कीं ह्या तिघांनीं बर्फ पडण्याचें थांबल्यानंतर आपल्याला स्प्रिंगफील्डमध्यें येऊन मिळावें.

' १ मार्च १८३१ चा सुमार. बर्फ आतां पडत नव्हतें. पण खुष्कीच्या मार्गावर सर्वत्र पाणीच पाणी झालें होतें. त्यामुळें त्या मार्गानें प्रवास करणें व्यवहार्य ठरलें नसतें. ' लिंकनला त्यावेळची परिस्थिति आठवते ती अशी– तेव्हां त्यांनीं एक नाव विकत घेतली व वेगानें वाहणाऱ्या सँगॅमॉन नदीतून आपला प्रवास सुरू केला. ह्या रीतीनें सँगॅमॉन परगण्यांत लिंकनचा प्रथम प्रवेश झाला.

स्प्रिंगफील्डमधील एका हॉटेलांत ह्या तिघांना तो साहसी व्यापारी दारूच्या धुंदींत पडलेला आढळला. न्यू ऑर्लिन्सला न्यावयाचा मचवा मात्र नव्हता. मचवा बांधण्याचें काम ह्या तिघांनाच करावें लागणार होतें. त्यानंतर तो न्यू ऑर्लिन्सला घेऊन जाण्याची जबाबदारीहि त्यांनाच स्वीकारावी लागणार होती. ह्या कामाबद्दल त्या प्रत्येकाला ऑफट हा दरमहा बारा डॉलर देणार होता. मचव्याच्या बांधणीचें काम सँगॅमॉन नदीवरील

जुन्या सॅगॅमॉन शहरीं करावयाचें होतें. त्यासाठीं लांकडें तोडण्यापासून कामाला आरंभ करावयाचा होता. कामावर देखरेख व सैंपाक दोन्ही एबलाच करावीं लागलीं असें दिसतें. एका महिन्यांत त्यांनीं ८० फूट लांब व १८ फूट रुंद मचवा बांधला. ह्या कामीं त्यांना खूप कष्टहि पडले. मचवा तयार झाल्यानंतर त्यांत धान्याच्या गोणी व डुकराच्या मांसाच्या पेटचा चढविण्यांत आल्या. भलेंमोठें जिवंत डुक्करहि मोठ्या मिनतवारीनें मचव्यांत चढवलें. चढवतांना तें धुसफुसत होतें. ह्यांत बराच वेळ गला. नदीचा पूर इतक्यांत ओसरूं लागला होता. त्यामुळें हा सगळा बेत हुकण्याची पाळी आली होती. कारण न्यू ऑर्लिन्सच्या दिशेनें चाललेला हा मचवा वाटेंत रटलेजच्या धरणावर अडकला.

न्यू सालेम ह्या गांवीं हा प्रसंग घडला. ह्याच ठिकाणीं लिंकनला आपल्या आयुष्यांतील सहा संस्मरणीय वर्षे भावी काळांत काढावीं लागणार होतीं. ह्या प्रसंगाचें एक स्पष्ट चित्र चटकन आपल्या नजरेसमोर उभें राहतें. मचवा मालानें भरलेला आहे. तो संकटांत सांपडला आहे व धरणावर झोके घेत आहे. लिंकनचे भावी शेजारी—न्यूसालेमचे लोक हा प्रकार दुरून पहात आहेत. बावीस वर्षांचा एक उंच व सडपातळ गिरिवासी मुलगा ह्या प्रसंगाला तोंड देत आहे. आपल्या निळ्या विजारीचे पाय त्यानें दुमडून वर घेतले होते. सुती कापडाचा सदरा त्याच्या अंगांत होता. डोक्यावर साधीच हॅट होती. उघड्या पायांनीं तो पाण्यांत उतरला आहे. कसाबसा पाण्यांतून इकडे तिकडे हिंडत होता. सुकाणूच्या बाजूनें मचव्यांत पाणी भरत होतें. ह्या संकटांतून मचवा कसा वांचवावा ह्याचा तो विचार करीत होता. मचव्याची नाळीकडची बाजू धरणावरून पलीकडे सरकली होती.

ह्यांतून एबनें जो मार्ग काढला त्यासंबधींची माहिती जॉन हॅंक्सनें आपल्या आठवणींत सांगितली आहे: ' नाळीकडच्या बाजूला मचव्यांतील सगळ्या गोणी व पेटचा आम्हीं सरकवल्या. धरणाकडच्या बाजूनें मचव्याला वरच्या अंगाला एक भोंक पाडलें. ह्या भोंकांतून मचव्यांत येणारें पाणी बाहेर निघून गेलें व आम्हीं बचावलों ' असें हॅंक्सनें सांगितलें आहे.

ह्या अटीतटीच्या प्रसंगांतून निभावण्याचें श्रेय एब लिंकनला होतें. मचव्याला भोंक पाडण्यासाठीं हवें असलेलें हत्यार त्यानें आजूबाजूच्या लोकांच्या मदतीनें मिळविलें. मचव्यांतलें पाणी बाहेर निघून गेल्यानंतर तें पुन्हा भरून काढण्याची व्यवस्था त्यानेंच केली. मचव्यावरचें मालाचें ओझें पुढील भागाकडे सरकवून धरणावरून मचवा पुढें सरकवून घ्यावा ही कल्पनाहि त्याचीच. हें लहानसें नाटच पाहाण्यासाठीं जमलेल्या लोकांत लिंकनच्या पुढील महत्त्वाच्या कार्यास सुरुवातीला मोठा हातभार लावणारे लोक होते.

ज्यांनीं एबला जमिनीची मोजणी कशी करावी हें शिकविलें ते मेंटॉर ग्रॅहॅम ह्या जमावांतच होते. क्लॅरी ग्रव्हच्या तरुणांचा म्होरक्या जॅक आर्मस्ट्राँग ह्यांतच होता. हाच आर्मस्ट्राँग पुढें एबचा निकटचा मित्र व मोठा चाहता बनला. पण त्यापूर्वीं एबनें त्याला एका कुस्तींत लोळविलें होतें. न्यू सालेमच्या ह्या छोटया वसाहीच्या संस्थापकांपैकीं जेम्स रटलेज हा एक गिरणीमालक ह्या जमावांत होता. ॲन रटलेज ही न्यू सालेममधील सर्वांत देखणी आणि विलक्षण मुलगी होती; ती जेम्स रटलेजचीच मुलगी. दारू पिणें, मासे पकडणें व वेळोवेळीं शेक्सपियर व रॉबर्ट बर्न्स ह्यांच्या काव्यांतल्या ओळी म्हणून दाखविणें हा ज्याचा छंद तो जॅक केल्सोसुद्धां ह्या जमावांत होता. ह्यानेंच अनेक मनोरंजक पुस्तकें लिंकनकडून वाचून घेतलीं. दोनशें चाळीस पौंड वजनाचा बाऊलिंग ग्रीन हा जे. पी. ह्या गर्दींतच होता. वास्तविक राजकारणांत हा लिंकनच्या विरोधी पक्षाचा. पण लिंकनला त्याचा सहानुभूतिपूर्ण पाठिंबा होता. एबनें धरणावरून आपली व मचव्याची सुटका करून घेतली तो प्रसंग हे सगळे लोक किनाऱ्यावरून पाहात होते.

ह्या प्रसंगीं एबनें बुद्धीची जी करामत दाखविली तिच्यामुळें डेंटॉन ऑफट हा पुढें लिंकनचा मोठा चाहता बनला. एबवर ऑफटची मर्जी बसली. हिशेब ठिशेब ठेवण्याच्या कामीं त्याचा उपयोग होईल म्हणून डेंटॉन ऑफटनें न्यू सालेम येथील आपल्या दुकानाची देखभाल करणारा कारकून

म्हणून लिंकनची आधींच नेमणूक करून टाकली. न्यू ऑर्लिन्सहून परत आल्यानंतर एबनें ह्या कामगिरीवर रुजू व्हावयाचें होतें.

रटलेजच्या धरणावरील ह्या प्रसंगांतून निभावल्यानंतर जॉन जॉन्स्टन, जॉन हँक्स, एब लिंकन आणि डेंटॉन ऑफट ह्यांनीं मचवा वाऱ्याच्या गतीवर सोडून दिला. सँगॅमॉन् नदींतून इलिनॉयस नदींत व इलिनॉयस नदींतून मिसिसिपींत अशा बिकट मार्गांतून त्यांना मचवा न्यावा लागला. सेंट लुई शहरांत ते आले तेव्हां तेथूनच जॉन हँक्स मागें परतला.

जॉन हँक्स मागें परतला, ह्याला आपल्या कथेंत विशेष अर्थ नाहीं. फक्त एका महत्त्वाच्या मुद्याचा विचार करतांना इकडे लक्ष दिलें पाहिजे. न्यू ऑर्लिन्सला एके ठिकाणीं गुलामांचा लिलांव चालला होता. वर्णसंकराच्या संबंधांतून जन्मास आलेली एक देखणी मुलगी लिलांवाच्या चव्हाटयावर उभी होती. हें दृश्य पाहून लिंकन अस्वस्थ झाला. त्याच क्षणीं त्यानें आपल्या मनाचा असा निर्धार बोलून दाखविला कीं, ' गुलामगिरीच्या ह्या पद्धतीवर हल्ला करण्याची कधीं काळीं मला संधि मिळाली तर त्यावेळीं गुलामगिरीच्या पद्धतीवर मी जो हल्ला करीन तो जबरदस्त असेल. ' जॉन हँक्सचें हें असें म्हणणें आहे. माणसांचा लिलांव पाहून एबला वेदना झाल्या असतील, तो मनांतल्या मनांत संतापलाहि असेल. ह्यांत निःसंशय तथ्य आहे. न्यू आर्लिन्सला बघितलेल्या ह्या प्रसंगानें त्याच्या डोळ्यांत प्रकाश पडला असेल हेंहि खरें असेल. पण ह्या प्रसंगीं जॉन हँक्स एबच्या सोबत न्यू ऑर्लिन्स शहरीं नव्हता. तेव्हां जॉन हँक्सच्या माहितीचा आधार पुरेसा सबळ नाहीं. जॉन हँक्सनें सांगितलेला हा प्रसंग लिंकननें गुलामगिरीच्या पद्धतीवरील आपले विचार जाहीरपणें बोलून दाखविण्याच्या कितीतरी वर्षें अगोदर घडलेला आहे.

न्यू आर्लिन्सची ही आपली दुसरी सफर पुरी करून एब लिंकन घरीं इलिनॉयसला परत आल्यानंतर लवकरच तो न्यू सालेम ह्या किनारपट्टीवरील गांवीं जाण्यास निघाला. ह्यावेळीं जेमतेम शंभर वस्तीच्या एका गांवीं झोपडीवजा दुकानांत कारकुनाची नोकरी मिळाली म्हणून अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांचा हा भावी अध्यक्ष समाधानांत होता.

ग्रंथ ... दा. क्र. २०३९ ... १९६१

## न्यू सालेम आणि ब्लॅक हॉकचें युद्ध

' नंतर मी न्यू सालेमला गेलों... तेथें एका दुकानांत एक साधा कारकून म्हणून मीं काम केलें. ह्याच काळांत ब्लॅक हॉकचें युद्ध उद्‌भवलें. त्यावेळीं युद्ध–स्वयंसेवकांचा प्रमुख म्हणून माझी निवड झाली. पूर्वी कशानेंहि झाला नव्हता इतका आनंद मला ह्या यशानें झाला.

**—ए. लिंकन**

१८३१ सालीं साधारणपणें जुलैच्या तिसऱ्या आठवड्यांत एब लिंकन न्यू सालेमला पोहोंचला. ह्यावेळीं त्याला असें वाटत होतें कीं, आपण एक मूर्ख व प्रवाहपतित माणूस आहोंत. सुतारकाम त्याला साधारण येत होतें. मचव्यावरचें काम कसें करावें हें त्याला माहीत होतें, व शेतीवरचें तर कोणतेंहि काम तो करूं शकत होता. ह्यापेक्षां अधिक कसलेंच ज्ञान त्याला नव्हतें, इतर कसल्या कामाचा अनुभवहि नव्हता, शिक्षणहि नव्हतें. अजून त्याच्यासमोर कसलें ध्येयहि नव्हतें. पाहणाराला साधारणपणें वाटे कीं, ह्या माणसाला कसली महत्त्वाकांक्षाच नाहीं. तीव्र बुद्धीची देणगीहि त्याला नव्हती. पण सहा वर्षांनीं एबनें हें गांव जेव्हां सोडलें, तेव्हां तो आपल्या थोर भवितव्याच्या दिशेनें पावलें टाकीत होता; ह्या गांवांतील एक यशस्वी, तरुण विधिज्ञ म्हणून तो ओळखला जाऊं लागला होता. वकिली व्यवसायाचा स्वीकार करण्यासाठीं एब हें गांव सोडून चालला होता. पण आपल्या कथेंतील ही फार पुढची हकिकत आहे.

न्यू सालमेची वस्ती साधारण अस्थिर होती, त्या काळांतच लिंकन ह्या गांवीं आला होता. लिंकनच्या ह्या आगमनप्रसंगीं ऑगस्टमधील निवडणुकीची

पूर्व तयारी चालू होती. न्यू सालेम येथील शाळामास्तर मेंटॉर ग्रॅहॅम ह्याला ह्या निवडणुकींत एबची कांहींच मदत झाली नाहीं, असें एबच्या बऱ्याच चरित्रकारांनीं सूचित केलें आहे. पण ह्यावेळीं आयुष्यांत प्रथमच एबनें आपलें मत नोंदविलें होतें, ही खरी गोष्ट असावी. ह्याच काळांत रिकाम्या वेळीं गांवांतील आळशी गप्पिष्टांना विनोदी चुटके व कोटया सांगून एब त्यांचें मनोरंजन करीत असे. हा त्याचा एक छंदच होता. 'धर्मगुरूच्या विजारींत शिरलेल्या सरपटणाऱ्या प्राण्याची गोष्ट' ह्यासारख्या गोष्टी तो नेहमीं सांगत असे.

गांवांत एब सर्वांशीं मित्रत्वानें वागे. सुतकी चेहेऱ्याच्या माणसालाहि हंसविण्याचें कौशल्य त्याच्याजवळ होतें. त्याला लिहितां-वाचतांहि येत होतें. ह्या दोनतीन गोष्टींमुळें शेजाऱ्यापाजाऱ्यांना तो भला माणूस आहे असें वाटूं लागलें होतें.

पहिल्या कांहीं दिवसांत त्यानें ह्या गांवाची माहिती मिळविली; येथील लोकांशीं परिचय करून घेतला. डेंटॉननें कबूल केल्याप्रमाणें अजून माल आला नव्हता. त्यामुळें लिंकनला दुसरा उद्योगहि नव्हता. लिंकन ह्या गांवांत आला त्याच्या आधीं दोन वर्षें जेम्स रटलेज व जॉन कॅम्रॉन ह्यांनीं ह्या गांवांत लांकडें कापण्याचा कारखाना सुरू केला होता व धान्य दळण्याची गिरणीहि चालविली होती. ह्यानंतर दोन वर्षांनीं लिंकन येथें आला तेव्हां येथें एका रस्त्यावर सुमारें डझनभर झोपडया दाटीनें उभ्या होत्या. लोहार, गाडयांना चाकें बसविणारा, चांभार, गुत्तेवाला, लोकरीचा एक सधन व्यापारी, औषधपाणी देणारे व निखळलेलीं हाडें बसविणारे एकूण दोन डॉक्टर, इतक्यांनीं ह्या गांवांत आपलें ठाण मांडलें होतें. मेथॉडिस्ट, बॅप्टिस्ट आणि कंबरलँड प्रेस्बिटेरियन ह्यांना धार्मिक विधीच्यावेळीं पसंत पडणारें क्लॅरीचें सभागृहहि सुरू झालें होतें. ह्या सभागृहांत विधि व समारंभ चालले असतांना तारुण्यांतील उच्छृंखलपणामुळें त्यांत कांहीं बिघाड करणारे लोकहि होते.

डेंटॉन ऑफट हा आवश्यक तो माल घेऊन परत न्यू सालेमला येईपर्यंत त्याच्या ह्या दुकानदाराला येथील लोक बरेच नावाजूं लागले होते. ' क्लॅरी

ग्रव्ह 'च्या दांडगटांवर मात्र अजून त्याचा प्रभाव पडलेला नव्हता. क्लॅरी ग्रव्हचे हे लोक दर शनिवारीं टोळधाडीसारखे येत आणि अंदाधुंदी करीत. दंग्याधोप्याला ते नेहमींच तयार असत. त्यांचा गट लढाऊ होता. ते अट्टल दारूबाज होते. घोडयावरून फेरफटका करण्यांतहि ते पटाईत होते. ऑफटच्या दुकानापासून क्लॅरीचें सभागृह अवघ्या पंचवीस पावलांवर होतें. हें ह्या लोकांचें मुख्य ठाणें. घोडयावरून किंवा पायीं चालत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं खेपा घालण्यासाठीं त्यांच्यांत चुरस असे. गदा फेंकणें व उंच उडया मारणें, असल्या शर्यती ते ठेवीत. ते कुस्त्या लावीत आणि बाचाबाचीसाठीं बाचाबाची करून त्यांतच आनंद मानीत. असल्या गोष्टी त्यांच्यांत नेहमींच चालत.

ऑफटला घमेंड होती खरी, पण ह्या लोकांच्या धकाधकींत तो दोन मिनिटेंहि टिकाव धरूं शकला नसता. तरी एब लिंकन हा आपला कारकून क्लॅरी ग्रव्हच्या लोकांपैकीं कोणालाहि कुस्तींत हरवूं शकेल, असल्या वल्गना करावयास त्यानें लवकरच सुरुवात केली. पांच डॉलरची पैज मारून ही लढत घडविण्याची त्याची तयारी होती व लवकरच त्याच्या आव्हानाचा स्वीकार करणारा गृहस्थ त्याला भेटला.

क्लॅरी ग्रव्हच्या तरुणांचा म्होरक्या जॅक आर्मस्ट्रॉंग हा त्या वीस मैलांच्या टापूंत चढाईखोर व कुस्तीगार म्हणून प्रसिद्ध होता. न्यू सालेमच्या लोकांना कळून चुकलें कीं, एब लिंकन नवखा असला तरी ताकदवान आहे आणि त्याची व अजिंक्य ठरलेल्या जॅक आर्मस्ट्रॉंगची लढत होणार आहे. ही बातमी पसरल्याबरोबर कोण जिंकणार, ह्यासंबंधीं लोक आपसांत पैजा मारूं लागले. ही बातमी जसजशी अधिकाधिक पसरूं लागली तसतशी पज मारणारांची संख्या वाढूं लागली. लोकांचा उत्साह वाढूं लागला. साध्या चहापाण्यापासून निरनिराळ्या वस्तूंच्या पैजा लागूं लागल्या.

अखेर एका शनिवारीं दुपारीं ही लढत लागली. लिंकनच्या दृष्टीनें ह्या लढतीचे दूरगामी राजकीय परिणाम झाले. लोक अगदीं डोळ्यांत प्राण सांठवून ही लढत पाहात होते. एब व जॅक दोघेहि कुस्तीच्या रिंगणांत

घिरट्या घालीत होते. दोघेहि स्वतःस अनुकूल अशा योग्य संधीची वाट पाहात होते. एबपेक्षां जॅक ठेंगणा होता, पण त्याची शरीराची ठेवण सौष्ठवपूर्ण होती. पिळदार स्नायूंचे त्याचे दंड व खांदे सूर्यप्रकाशांत चकाकत होते. एबचे स्नायू लांबट आणि सपाट. पण त्यांत विलक्षण ताकद व जोम होता. तरी आपण एका बलवान प्रतिस्पर्ध्याशीं सामना करीत आहों ह्याची एबला पूर्ण जाणीव होती.

ह्या लढतीच्या अंतिम निकालाबद्दल अनेक मतें प्रचलित आहेत. तरी सामना तोडीस तोड असा झाला व जॅकला एबनें लीलेनें लोळविलें ह्याबद्दल दुमत नाहीं. जॅक हरतांच क्लॅरी ग्र्व्हचे त्याचे सगळे साथीदार एकदम येऊन एबला भिडले. एब ताबडतोब उठला व एका भिंतीस टेकून उभा राहिला. अशा पवित्र्यांत तो एकेकाचा समाचार घेण्यासाठीं सिद्ध झाला. आर्मस्ट्रॉंगनें ह्याप्रसंगीं खरीखुरी खिलाडू वृत्ति दाखविली. त्यानें आपल्या साथीदारांस बाजूला सारून एबचें अभिनंदन केलें. लिंकन आणि जॅक व त्याची पत्नी हन्नाह हीं ह्यानंतर अखेरपर्यंत स्नेहभावानें राहिलीं. आर्मस्ट्रॉंग पतिपत्नींनीं पुढें प्रत्येक राजकीय चळवळींत लिंकनलाच पाठिंबा दिला, आणि तसेंच लिंकननें आर्मस्ट्रॉंगला साहाय्य केलें; इतकें कीं, तीं दोघें तें कधीं विसरू नये. पुढें लिंकन इतर कोणाहिपेक्षां परिणामकारकरीत्या गदा वापरू लागला व लांबच्या पल्ल्याला फेंकूं शकला, तसें त्याचें पुढारीपण त्या लोकांनीं मान्य केलें. एबला मात्र आपल्या सामर्थ्याचा कैफ कधींच चढला नाहीं. आपल्या सामर्थ्याचा जुगारहि त्यानें कधीं केला नाहीं; किंवा आपल्या सामर्थ्याची वकवकहि त्यानें कधीं केली नाहीं.

न्यू सालेमच्या लोकांनीं एबच्या बलाचा गौरव केला, तसाच त्याच्या बुद्धीचाहि. आधीच सुशिक्षित लोक तेथें मूठभरच होते. पण त्यांना असें आढळून आलें कीं, लिंकनच्या अंगीं शरीरबलाहून निराळे असे कांहीं गुण होते. मेंटॉर ह्या शाळामास्तरानें त्याला व्याकरण आणि गणित शिकविण्याचें काम आनंदानें स्वीकारलें. निर्वाहासाठीं एरव्हीं फारसे कष्ट करूं नयेत व फक्त मासे पकडणें, ह्यांतच ज्याला समाधान त्या जॅक केल्सोनें एबला शेक्सपियरच्या

नाटकांत व बर्न्सच्या कवितांत रमविलें. स्थानिक ' वाङ्मय आणि वक्तृत्वसभे ' नें आपलें पहिलें अर्थपूर्ण भाषण करण्याची संधि एबला दिली. एबचें प्रासादिक वक्तृत्व ऐकून जेम्स् रटलेज व डॉ. फ्रान्सिस रेनर ह्यांच्यासारखे लोक चकित झाले. बाणेदार वक्ता व्हायला एबला भाषणें करण्याची संवय व भाषणांतील सफाई ह्यांचीच गरज होती, हें त्यांना कळून चुकलें.

एका बाबतींत मात्र एब कर्तृत्व दाखवूं शकला नाहीं. उद्योगधंद्यांत तो यशस्वी झाला नाहीं— ऑफटच्या दुकानांत असतांना किंवा त्यानंतरहि. तरी लोकांना तो आवडत असे. कारण तो अगदीं निर्मळ होता, प्रामाणिक होता आणि सर्वांशीं स्नेहानें वागत असे. दुकानावर चहा, साखर, मीठ, कापड इत्यादि माल विकण्यांत लिंकनचें मन गुंतण्याऐवजीं वाचणें व गोष्टी सांगणें ह्यांतच तें रंगूं लागलें. ऑफट लवकरच येथील धंद्याला कंटाळला व दुसरा धंदा हातीं घेण्यासाठीं न्यू सालेम सोडून गेला. वसंतऋतूच्या आरंभालाच ही गोष्ट घडली व लिंकनची कायम स्वरूपाची ही नोकरी सुटली.

आपल्या वास्तव्याच्या पहिल्या सात महिन्यांत न्यू सालेम येथें लिंकननें आपलें मित्रमंडळ बरेंच वाढविलें होतें. त्यामुळें त्याला स्वतःचा एक प्रकारें विश्वास वाटूं लागला होता. म्हणूनच आगामी निवडणुकींत राज्यांतील विधानसभेची जागा आपण लढविणार, असें त्यानें ९ मार्च १८३२ ला जाहीर केलें. राजकीय जीवनांतील आपला पहिला वहिला जाहीरनामा मेंटॉर ग्रॅहॅम व इतर ह्यांच्या साहाय्यानें एबनें तयार केला. एबनें हा जाहीरनामा अगदीं थोडक्यांत लिहिला होता. पण सँगॅमॉन परगण्यांतील मतें मिळतील अशा मुत्सद्देगिरीनें कांहीं तो तयार केलेला नव्हता.

अँड्र्यु जॅक्सन हा येथील लोकप्रिय पुढारी, व हेन्री क्ले हा त्याचा प्रतिस्पर्धी. ह्या हेन्री क्लेचा लिंकनला स्वच्छ पाठिंबा होता. आपल्या विनंति-पत्रकांत लिंकननें स्थानिक प्रश्नांचा विचार प्रामुख्यानें दृष्टीसमोर ठेवलेला होता. येथील बरेचसे मतदार कर्जबाजारी होते. कर्जाऊ रकमेवरील व्याजाचा दर होता त्यापेक्षां कमी असावा अशी मागणी लिंकननें आपल्या

अनुक्रम २३५२८ वि...
क्रमांक ...८३५... नोंद दि: १३(०७...

विनंति-पत्रकांत नमूद केली होती. ह्या प्रदेशांत म्हणण्यासारख्या शाळा नव्हत्या. तेव्हां ह्या प्रदेशांतील लोकांना शिक्षणाची सोय उपलब्ध करून द्यावी, ही आणखी एक मागणी त्यानें नमूद केली होती; आणि सँगॅमॉन नदीवरील वाहतुकींत सुधारणा करण्याची योजना हातीं घ्यावी, ही त्याची अखेरची मागणी होती. अशी सुधारणा झाल्यास पंचवीस ते तीस टनी जहाजें सँगॅमॉन नदींतून दक्षिण फोर्कपर्यंत जाऊं शकतील अशी त्याची खात्री होती. ह्या संबंधांत आणखी एक लक्षणीय सूचना त्यानें मांडली होती. ती अशी कीं, नदीच्या प्रवाहांतील वळणांवळणांवरून जर सतत रहदारी सुरू राहिली, तर नदीचें पात्र आपोआप मोकळें राहील. लोकांची हमखास सहानुभूति मिळायला उपयोगी पडेल असा एक परिच्छेद ह्या विनंति-पत्रकाच्या शेवटीं लिंकननें जोडला होता. तो परिच्छेद असाः--

'बालपणची माझी परिस्थिति खेदजनक होती...माझी प्रगति होऊं नये असेंच जर शुद्ध बुद्धीच्या व भल्या माणसांना वाटत असेल तर अशा स्थितीचाहि मला चांगलाच परिचय आहे.

तुमचा मित्र व सहवासी– ए. लिंकन !'

ह्याच सुमारास असें जाहीर करण्यांत आलें कीं, कॅ. व्हिन्सेंट बोग हे 'टालिस्मान' ही आगबोट सेंट लुई बंदरांत आणतील. तेथें संबंधित लोकांना त्यांच्या मालाचा ताबा देण्यांत येईल. स्प्रिंगफील्ड शहराच्या सहा मैल उत्तरेला असलेल्या ह्या बंदरांत आपल्या मालाचा ताबा ज्यांना घ्यावयाचा असेल, त्यांना दर शंभर पौंड वजनामागें साडेसदतीस सेंट आकार द्यावा लागेल. हा आकार खुष्कीच्या मार्गानें जाणाऱ्या मालावरील आकाराच्या निमपट होता. व्यापारी व शेतकरी ह्यांना असें आढळून आलें कीं, अशा धर्तीची कायम योजना झाली तर त्यांचे सुबत्तेचे दिवस फार दूर नाहींत. कारण, ह्या मार्गानें इलिनॉयसच्या सरहद्द प्रदेशांतून मालाची ने-आण करणें स्वस्ताईचें होतें. सागरी वाहतुकीची ही कमी खर्चाची योजना पाहून न्यू सालेमचे व त्याच्या आजूबाजूचे लोक उत्साहित झाले

ह्यानंतर लिंकननें–विधान सभेच्या निवडणुकींतील एका उमेदवारानें–बोटीचा मार्ग सुकर करण्याची मोहीम सुरू केली. काठ्या, हूक व लांब पल्ल्याच्या कुऱ्हाडी घेऊन लोकांनीं नदींत एक नाव सोडली. ( ह्या लोकांत लिंकन होता. ) नंतर त्यांनीं नदीच्या प्रवाहांतील फांद्या काढून टाकण्यास सुरुवात केली. तसेंच किनाऱ्यावरील झाडांच्या ज्या फांद्यांमुळें बोटीच्या वाहतुकीस अडथळा होण्याचा संभव होता, त्या फांद्याहि छाटून टाकण्यास आरंभ केला. अशा प्रकारें बोटीचा मार्ग मोकळा करण्याचें काम सुरू झालें. ह्याच वेळीं किनाऱ्यावर कांहीं लोक घोड्यावरून ह्या लोकांना उत्तेजन देत चालले होते. ह्या लोकांत बिली हर्नडन हा तेरा वर्षांचा मुलगा होता. हाच मुलगा पुढें लिंकनच्या वकिली व्यवसायांतला एक भागीदार, त्याचा चरित्रकार व भक्त बनला. ' टालिस्मान ' बोटीचा मार्ग मोकळा करण्याच्या मोहिमेचें हें जें नेतृत्व एबनें स्वीकारलें होतें, तो प्रसंग हर्नडन पुढें कधींच विसरला नाहीं.

' टालिस्मान ' बोटीचें लोकांनीं मोठें स्वागत केलें. बंदरांत माल उतरून बोट माघारी फिरली, तेव्हां नदीचें पाणी ओसरलें होतें. ह्यावेळीं बोट योग्य मार्गानें नेण्याच्या कामीं लिंकननें कॅप्टनला मदत केली. बऱ्याच अडचणींतून लिंकनलाहि हा मार्ग काढावा लागला.

' टालिस्मान ' बोट बंदरांत आली म्हणून निर्माण झालेला उत्साह ओसरतो न ओसरतो तोंच दुसऱ्या एका कासावीस करणाऱ्या बातमीनें ह्या प्रदेशांत भीतीचें व भयाणतेचें वातावरण निर्माण केलें.

सॅक व फॉक्स ह्या नांवांनीं ओळखल्या जाणाऱ्या टोळीवाल्यांचा पराक्रमी युद्ध–प्रमुख ब्लॅक हॉक हा आपल्या लोकांची जमवाजमव करीत होता, अशी ही बातमी होती. सुमारें चारशें सशस्त्र हिंदी लोक सामना देण्याच्या तयारीनें होते. ते मिसिसिपी नदी ओलांडून आले होते. इलिनॉयस व विस्कॉन्सिन येथील शेतांतील व खेड्यांतील गोऱ्या वसाहतवाल्यांना हांकलून देण्याची दमदाटीची भाषा ते बोलूं लागले होते.

ह्या प्रदेशांतील जमीन सुपीक. ती ह्या मूळच्या लोकांकडून हिसकावून घेण्यांत आली होती. ही जमीन हेंच त्यांचें उदरनिर्वाहाचें साधन. अशा लोकांचें नेतृत्व ब्लॅक हॉकनें स्वीकारलें होतें. म्हणून ह्या नेत्याची कुणालाहि कणव यावी अशी स्थिति होती. ' माझी विचार-शक्ति मला अशी ग्वाही देते आहे कीं, कोणतीहि जमीन विकली जाऊं शकत नाहीं. परमेश्वरानें आपल्या लेकरांना जमीन दिली. जोंपर्यंत लोक ती कसताहेत व जोंपर्यंत ती लोकांच्या ताब्यांत आहे, तोंपर्यंत त्या जमिनीवरील हक्क त्यांचाच आहे. ज्या वस्तु एका जागेवरून दुसऱ्या जागीं उचलून नेतां येतात, त्या वस्तु विकतां येतात; दुसऱ्या कोणत्याहि वस्तु विकतां येत नाहींत.' म्हणून जमीन विकली जाऊं शकत नाहीं, असा ब्लॅक हॉकचा युक्तिवाद होता.

पण ह्या नव्या उठावानें पूर्वीं मान्य केलेला तहनामा ब्लॅक हॉककडून उधळला जात होता. त्याची मागणी न्याय्य असली, तरी वसाहतवाले त्याच्या उपक्रमानें भीतिग्रस्त झाले होते. थोडयाच दिवसांनीं ह्या लोकांवर गोळ्या झाडण्यांत आल्या, कुऱ्हाडी चालविण्यांत आल्या, व त्यांचीं डोकींहि फुटलीं.

परिणाम असा झाला कीं, उत्तर इलिनॉयसच्या एकाकी अशा ज्या निरनिराळ्या वसाहती होत्या, त्यांच्याकडून दुसऱ्या वसाहतींकडे ह्या उठावाविरुद्ध मदतीची मागणी येऊं लागली. अनेक ठिकाणांहून मदतीची मागणी करणारे संदेशवाहक गडबडीनें येऊं लागले. इलिनॉयसच्या गव्हर्नरनें जनतेला आवाहन केलें. ह्या हांकेला उत्तर म्हणून अनेक जणांनीं 'स्वयंसेवक' म्हणून आपलीं नांवें नोंदविलीं. ह्यांत क्लॅरी ग्रव्हचे तरुणहि होते. ते लिंकनचे चाहते बनले होते. त्यामुळें त्यांच्या प्रभावानें स्वयंसेवकांच्या एका तुकडीचा प्रमुख म्हणून लिंकनची निवड झाली. ह्या तुकडीचा उपप्रमुख म्हणून जॅक आर्मस्ट्रॉंग ह्याची निवड होणें उचितच होतें, व तशी ती झालीहि.

खुद्द लिकननें व इतरांनींहि लिंकनच्या ह्या बिनलष्करी अधिकाराबाबत बऱ्याच गमतीदार गोष्टी सांगितल्या आहेत. लिंकनच्या तुकडींतील लोक त्यांनीं स्वीकारलेल्या कार्यक्षेत्रांत नवखे होते. ते स्वभावानें तापट होते,

थोडक्यासाठीं ते हातघाईवर येत. अशा लोकांना शिस्तींत ठेवणें वेळप्रसंगीं कठिण जाई. आज्ञा मोडणाराला शिक्षा करण्याची ताकीद देऊन लिंकन सर्वांना एका रांगेंत चालायला लावी. एकदां अशीच त्याची तुकडी एका अरुंद दरवाजापाशीं आली. ह्यावेळीं पलीकडे जाण्यासाठीं कोणती आज्ञा द्यावी तें त्याला सुचेना. कवायतीची परिभाषा लिंकनला विशेष अवगत नव्हती. त्यानें सर्वांना थांबविलें व रांग मोडून पुढें जावयास सांगितलें; व दरवाजांतून बाहेर पडल्यानंतर त्यानें पुन्हा सर्वांकडून रांग करून घेतली.

लिंकननें व त्याच्या तुकडींतील स्वयंसेवकांनीं ब्लॅक हॉकच्या सैनिकांन कधीं पाहिलेंच नव्हतें. तसेंच त्यांचा भयानक गोळीबारहि कधीं ऐकला नव्हता. एकदां एक म्हातारा हिंदी माणूस लिंकनच्या तुकडीच्या राहुटींत आला. त्याच्याजवळ राहुटींत येण्यास आवश्यक तो परवाना होता, तरी स्वयंसेवकांनीं त्याला ठार केलें असतें; पण ह्या संकटांतून लिंकननें त्याची सुटका केली. केल्लॉय ग्रव्हच्या सामन्यांत मृत्युमुखीं पडलेल्या पांच जणांच्या अंत्यसंस्कारांतहि त्यानें मदत केली होती. शवपेटिकेंत त्या सैनिकांचे मृतदेह ठेवले जात असतांनाहि त्यांचे डोळे रागानें लालबुंद झालेले दिसत होते; ही गोष्ट लिंकन विसरणें अशक्य होतें. त्या डोळ्यांच्या रक्ताळलेपणांत उगवत्या सूर्याचा तांबूस प्रकाशहि मिसळला होता. प्रत्येकाच्या कपाळावर मधोमध तांबडा टिळा होता. उरलेलें शरीर जणूं त्यावेळच्या सूर्यप्रकाशानें रंगलें होतें असें वाटत होतें. तें एकंदर दृश्यच भयानक होतें, विचित्र होतें. हरणाच्या कातडीची विजार घातलेल्या एका सैनिकाची सारखी आठवण तर लिंकनला त्या घटनेनंतरहि होत होती.

हा सामना चालू असतांनाच दुसरीकडे युक्तीनें ब्लॅक हॉकचा पराभव करण्यांत आला होता व त्याला कैद केलें होतें; आणि वॉशिंगटनला (डी. सी.) नेण्यांत आलें होतें. तेथें ब्लॅक हॉक अँड्रयु जॅक्सन ह्या गव्हर्नरा समोर निधड्या छातीनें व अभिमानी मुद्रेनें उभा राहिला; आणि म्हणाला— "मी एका वृत्तीचा माणूस आहें,...तुम्हीं दुसऱ्या. माझ्या बांधवांना इतःपर दुःख सहन करणं शक्य नव्हतं. म्हणून त्यांची त्या परिस्थितींतून सुटका

करण्यासाठीं, त्या परिस्थतीला कारणीभूत असे जे तुम्हीं, त्यांच्यवर सूड उगविण्यासाठीं मीं शस्त्र उचललं. माझ्या बांधवांना मी अधिक काळ तें दु:ख भोगायला लावलं असतं, तर त्यांनीं म्हटलं असतं, ब्लॅक हॉक आतां म्हातारा झाला आहे, त्याच्या अंगीं आतां नेतृत्वाचे हवे ते गुण उरलेले नाहींत, सॅक्सन रक्त त्याच्या अंगांत सळसळतच नाहीं."

दक्षिण विस्कॉन्सिनमध्यें लिंकनला आपल्या कामगिरींतून मुक्त करण्यांत आलें. त्याचा घोडा चोरीस गेला होता, त्यामुळें त्याला कधीं पायीं तर कधीं नावेंतून असा प्रवास करीत न्यू सालेमचा-आपल्या घरचा रस्ता सुधारावा लागला होता.

ह्यानंतर कित्येक वर्षांनीं लिंकन अध्यक्षपदाच्या चुरशींत उतरला होता. लेविस कास हा डेमोक्रॅटिक पक्षाचा उमेदवार त्याचा प्रतिस्पर्धी होता. कासला हास्यास्पद ठरवितांना लिंकननें स्वत:च्या व कासच्या लष्करी कामगिरीबद्दल कॉंग्रेसमध्यें उपरोधिक भाषण केलें होतें. ह्या भाषणांतील कांहीं भाग पुढीलप्रमाणें होता—

'असो. सभापति महाशय, मी एक लष्करी नेता आहें हें आपणास माहीत आहे काय ? ब्लॅक हॉकशीं झालेल्या लढाईंत मी लढलों आहें, रक्तबंबाळ झालों आहें व जिवंत परतहि आलों आहें. सेनापति कास ह्यांच्या लष्करी कामगिरीबद्दल बोलतांना मला माझ्या ह्या कर्तबगारीची आठवण होते. लढाईच्या खणाखणींत माझी तरवार कधींच मोडली नाहीं. कारण, माझ्याजवळ तरवार कधींच नव्हती. एकदां मीं बंदुक मोडली आहे, पण ती बंदुकींत गोळी भरण्यासाठीं; आणि तेंहि काम मला नीटसं जमलं नव्हतं... हुकलबेरी निवडण्यांत सेनापति कास मला मागें टाकणें शक्य असलं तरी कांदे निवडण्यांत मी त्यांना हार जाणार नाहीं. त्यांनीं एखादा हिंदी माणूस लढतांनाच पाहिला असेल, पण मी त्यापेक्षां अधिक अनुभवलं आहे.'

न्यू सालेमला लिंकन परत आला. ब्लॅक हॉकच्या युद्धांत देशसेवेसाठीं वेळ द्यावा लागला खरा, पण त्यानें लिंकनच्या विधानसभेच्या निवडणुकीच्या प्रचारमोहिमेंत अडथळा आला नाहीं. तरी स्वत:च्या उमेदवारीचा अर्थ विशद

करून सागावयास आतां पुरेसा वेळ नव्हता. त्यानें खेड्यापाड्यांतून लोकांत मिसळण्यास सुरुवात केली. शेतकऱ्यांशीं तो बातचीत करूं लागला. त्यांना नांगरणींत मदत करूं लागला. प्रसंगविशेषीं खेड्यापाड्यांत तो भाषणें करीत असे. असाच एकदां पॅप्सव्हिले येथें तो भाषण करीत होता. त्याच्या भाषणांत एक दंगलखोर अडथळे आणीत होता. त्यानें थोडावेळ भाषण थांबविलें. तो सरळ सभेंतील श्रोतृसमुदायांत घुसला व दंगलखोराला त्यानें सभेंतून बाहेर हुसकावून लावलें; आणि नंतर व्यासपीठावर येऊन परत उभा राहिला. ह्यावेळीं लिंकननें सुती आंखूड कोट अंगांत घातला होता. त्याची लिननची विजारहि तशीच आंखूड होती; डोक्यावर बिनबंदाची गवती हॅट होती. लिंकनच्या ह्यावेळच्या भाषणांतील मोजकेपणा नमुनेदार होता. सर्व राजकीय पुढाऱ्यांनीं तें भाषण आपल्यापुढें ह्या बाबतींत आदर्श ठेवून त्यावर मेहनत घ्यावी इतक्या पात्रतेचा तो मोजकेपणा होता. लिंकन आपल्या भाषणांत म्हणाला होता—

'मित्रहो, मी कोण ? हें तुम्हांला माहीत आहे, असं मला वाटतं. हा साधाभोळा अब्राहम लिंकन. माझ्या कांहीं मित्रांना असं वाटलं कीं, विधान–सभेच्या निवडणुकींत मी एक उमेदवार म्हणून उभं राहावं. त्याप्रमाणें मी उभा राहिलों आहें. माझे राजकीय विचार मोजके व रम्य आहेत – अगदीं म्हातारीच्या नांवासारखे. माझ्यामतें राष्ट्रीय बँकेची स्थापना सरकारनें करावी; आंतरराष्ट्रीय वाहतुकीच्या नियमांत दुरुस्ती झाली पाहिजे, वाहतुक करणारांना संरक्षण मिळालं पाहिजे. ह्या माझ्या निष्ठा आहेत, हीं माझीं राजकीय तत्त्वं आहेत. मला तुम्हीं निवडून दिलं, तर मी तुमचा कृतज्ञ राहीनच पण जरी निवडून दिलं नाहीं तरीहि—'

जनतेच्या प्रत्यक्ष मतदानानें होणाऱ्या ह्या निवडणुकींत लिंकनचा प्रथमच पराभव झाला. लिंकनच्या आयुष्यांतील त्याचा हा एकुलता एक पराभव. पण ह्या पराभवांतून लिंकनला त्याच्या खास मतदारसंघाचा छडा लागला. न्यू सालेममध्यें त्याला २७७ विरुद्ध ७ अशीं मतें पडलीं होतीं. तेथें तो कोणाहि-पेक्षां अधिक लोकप्रिय होता. त्याच्या बैठकींतील लोकांचा तो नेता होता.

भोळ्याभाबड्या लिंकननें येथील लोकांचें प्रेम संपादन केलें होतें. त्या लोकांनीं त्याच्या लोकमान्यतेची पावतीहि त्याला दिली होती. १८३२ च्या उन्हाळ्यांतील त्याच्या हृदयाच्या आगीला शांत करणारे हे शीतल जलकण होते.

## ८

## धड नाहीं एक, भाराभर चिंध्या

"तें दुकान 'वांकुल्या' दाखवूं लागलें."

—ए. लिंकन

पुढील पांच वर्षांची हकिकत. दुकानदार, पोस्टमास्तर, मोजणीदार, राज्य विधानसभेचा सदस्य व नवीनच सनद काढलेला वकील, इतक्या विविध नात्यांनीं लिंकन समाजांत वावरला. ह्यांपैकीं दुकानदारी वगळली, तर बाकीच्या साऱ्याच व्यवसायांत तो यशस्वी ठरला होता. आधींच आर्थिकदृष्ट्या लिंकन कफल्लक होता. तशांत व्यापारांत तो इतका दुर्दैवी ठरला होता कीं, न्यू सालेमहून तो १८३७ मध्यें स्प्रिंगफील्डला निघाला तेव्हां त्याच्या डोक्यावर हजार डॉलर कर्जाचें ओझें होतें.

व्यापार-धंद्यांतला माणूस म्हणून जीवनांत सुस्थिर होण्याची आकांक्षा लिंकननें कां बरें बाळगली असेल? बहुतेक असें असावें कीं, इंडियानांत दुकान थाटून प्रतिष्ठेला व मानमान्यतेला पोहोंचलेल्या जेम्स जेंट्रीचा कित्ता त्याच्यासमोर असावा. दुकानांत बसल्याबसल्या आजूबाजूच्या लोकांशीं संबंध वाढविण्यांत, मिळेल त्या संधीचा फायदा घेऊन लोकांना गोष्टी सांगण्यांत लिंकन रंगून गेला होता, ह्यांत शंका नाहीं. ह्याशिवाय शरीरश्रम करावे न लागण्याची व स्वस्थपणें दुकानावर बसून व भिंतीला पाय टेकून पडल्या

पडल्या आपल्या मजबूत व काम करून करून राकट बनलेल्या हातांत पडेल त्या पुस्तकाचा फडशा पाडण्याची संधि येथेंच मिळणारी होती.

न्यू सालेमचे लोक लिंकनशीं मोठ्या उदारतेनें वागले होते. ह्या आपल्या मित्रांतच कायमचें राहण्यास लिंकन उत्सुक होता, अशी आपली एक आठवण त्यानें नंतरच्या काळांत सांगितली आहे. एकदां तर लोहाराचा धंदा शिकण्याचाहि त्याचा विचार होता. आपण वकिलीची परीक्षा द्यावी असेंहि त्याला वाटत होतें. पण मुळांत चांगलें शिक्षण नसल्यामुळें हा अभ्यास आपणास झेपेल असें त्याला वाटेना.

बेकारींत एकदां निर्वाहाच्या चिंतेंत असतांना आपणास एका उदार माणसानें उधारीनें माल देण्याची तयारीच केवळ दाखविली नाहीं, तर प्रत्यक्ष माल दिलाहि ह्याचें लिंकनला नवल वाटलें होतें...तरी ह्या मदतीचा लिंकनला कांहींच उपयोग झाला नाहीं; उलट तो कर्जांत अधिकच बुडाला.

न्यू सालेमचें ‘ तें ’ दुकान त्याला ‘ वांकुल्या ’ कसें दाखवूं लागलें ह्याच्या कथा त्यानें इतक्या वेळां सांगितल्या आहेत कीं, त्या दंतकथाच आहेत असें एखाद्याला वाटावें ! पण खरें म्हणजे त्या कथा खऱ्या होत्या. एकदां विल्यम एफ्. बेरी ह्याच्याशीं लिंकननें भागीदारींत धंदा काढला. पण ह्या दोघांच्या दोन तऱ्हा होत्या. एक दारूंत मश्गुल, तर दुसरा पुस्तकांत. धंद्याची दुर्दशा करायला दोघांनींहि आपापल्या परीनें हातभार लावला होता. साहजिकच थोड्याच दिवसांत त्यांचें दिवाळें निघालें. पण मैलच्या मैल चालत जाऊन एखाद्या वेळचा आकस्मिकरीत्या भरावा लागणारा थोड्याशा सेंट्सचा विशेष कर भरणारा एबच अखेर ह्या धंद्यांतील सगळ्या कर्जाचा धनी झाला. एबच्या प्रामाणिकपणाचें त्याला मिळालेलें हें फळ होतें. तें कर्ज फेडण्यासाठीं त्याला पुढें कित्येक वर्षें आपलें रक्त आटवावें लागलें. रटलेजच्या खानावळीचे पैसे चुकते करण्यासाठीं तर लांकडें फोडणें, धान्य पाखडणें किंवा ए. वाय्. एलिसनें सुरू केलेल्या नव्या दुकानांत कारकुनी करणें, असल्या कसल्याहि तात्पुरत्या नोकऱ्या करण्याची लिंकनला तयारी ठेवावी लागली. ७ मे

१८३३ ला न्यू सालेमचा पोस्टमास्तर म्हणून त्याची नेमणूक झाली. ह्या नोकरींत त्याला वर्षाला पन्नास ते पंचाहत्तर डॉलर मिळत. अर्धवेळाची ही नोकरी होती. आर्थिकदृष्टचा ह्यांत फारसा लाभ नसला, तरी ह्या गांवांतील, निरनिराळ्या वृत्तपत्रांच्या वर्गणीदारांचे त्या त्या वृत्तपत्राचे अंक त्याला विनामूल्य वाचावयास मिळत, ही सवलत होती.

इंडियानांत त्यावेळीं एब हा वर्तमानपत्रवाला मुलगा म्हणूनच ओळखला जाई. उत्सुकतेनें वाचलेल्या बातम्या तो घडाघड म्हणून दाखवी. जग, राष्ट्रीय घटना व राजकीय प्रश्न, ह्यांची माहिती मिळावी म्हणून एब उत्सुक असे. ह्यामुळें तो सेंट लुई येथून निघणारें ' मिसुरी रिपब्लिकन ', ' लुई व्हिले ', वाशिंग्टनहून निघणारें ' इंटेलिजन्सर ' व स्प्रिंगफील्डचें ' सँगॅमो जर्नल ' ह्या वृत्तपत्रांतील मजकूर अधाशासारखा वाचून काढी. न्यू सालेमला पुष्कळदां लिंकन गप्पिष्टांच्या घोळक्यांत दिसे. ह्या घोळक्यांत केव्हां केव्हां पोस्टांत पडून राहिलेल्या एखाद्याच्या वर्तमानपत्राचा अंक सर्वांसाठीं म्हणून एक जण मोठ्यानें वाचीत असे.

लहरींत असला म्हणजे लोकांचीं पत्रें घरोघर पोहोंचविण्यांतहि लिंकन मौज मानी. हीं पत्रें तो आपल्या हॅटमध्यें भरीत असे. ह्या हॅटचा डबड्याचा आकार झाला होता. ह्यांतच कायद्याच्या अभ्यासाचीं टिपणें, कोर्टाचे कागदपत्र, खाजगी व इतर पत्रें आणि इतर किती तरी वस्तु, अशा किती तरी गोष्टी मावल्या असत्या. खरें म्हणजे मालकाला चटकन लागणाऱ्या कोणत्याहि वस्तूला त्या हॅटमध्यें जागा होती. कांहीं वर्षें हें असेंच चाललें होतें. एखादी स्त्री भेटली म्हणजे डोक्यांतील हॅट काढून घेऊन तिला नमस्कार करतांना एबला फार जपून राहावें लागे; नाहीं तर हॅट काढून घेतांना कागदाचीं भेंडोळीं खालीं पडावयाचीं !

मिळकतीच्या दृष्टीनें न्यू सालेममध्यें अब्राहम लिंकनची भरभराट होत नव्हती, असेंच म्हणावें लागेल. पण दुसऱ्या एका दृष्टीनें मात्र त्याची भरभराट होत होती. त्याच्याजवळ आर्थिक संपत्तीचा सांठा होत नव्हता;

पण व्याकरण, गणित, मोजणी पद्धति, व कायद्यांत अंतर्भूत असलेलीं तत्त्वें किंवा सिद्धांत ह्यांच्या ज्ञानसंपत्तीचा सांठा त्याच्याजवळ होत होता.

लिंकनच्या पुढील आयुष्यांत अब्राहम लिंकननें ज्या प्रतीच्या व्यक्तिमत्वाचें दर्शन आपणास घडविलें, त्या प्रतीच्या व्यक्तिमत्वाचा विकास त्याच्या अंगीं व्हावा म्हणूनच न्यू सालेम ही जादुनगरी एखाद्या यक्षिणीनें निर्माण केली होती कीं काय, असेंच कोणालाहि वाटावें ! लिंकन न्यू सालेमला येण्याआधीं दोनच वर्षें हें गांव वसलें. आणि लिंकननें हें गांव सोडल्यानंतर दोनच वर्षांनीं खरें म्हणजे ह्या गांवाच्या खाणाखुणा नकाशावरून पुसल्या गेल्या. जणूं काय एखाद्या जादुगरिणीनें चुटकीसरशीं सँगमॉन नदीच्या ह्या किनाऱ्यावर झोपड्या निर्माण केल्या होत्या व दुसऱ्या चुटकीसरशीं अंतराळांतून परीपात्रें आणून येथें सोडलीं होतीं. ( शेक्सपियरच्या 'टॅपेस्ट' नाटकांत होतें तसें हें नाटक एखाद्या वेळीं जॅक केल्सोनें लिंकनला वाचून दाखविलें असेलहि. )

पण न्यू सालेमच्या झोपड्यांतून वावरतांना हीं पात्रें लिंकनच्या जीवन-नाट्यांतील हाडामांसाचीं पात्रें म्हणून वावरलीं होतीं, व त्यांनीं एबच्या विकासाला महत्त्वपूर्ण हातभार लावला होता. उदाहरणार्थ पाहा : जॉन कॅल्हाउन हा सँगमॉन परगण्याचा मोजणी अधिकारी होता. एकदां नव्या रस्त्यासाठीं प्रदेशाची पाहणी करणें, गांवांची आंखणी करणें व शेतसीमा ठरविणें, हीं कामें निघालीं. ह्यावेळीं आपला साहाय्यक म्हणून कॅल्हाउननें एबला बोलाविलें. एबला तर ह्या व्यवसायाची तिळमात्र माहिती नव्हती. तेव्हां तो मेंटॉर ग्रॅहॅम ह्या शाळामास्तराकडे गेला. रोज रात्रीं बसून 'फ्लिटचे मोजणी विचार व त्रिकोणमिति' आणि गिब्सनचे 'मोजणीच्या कामासंबंधीं विचार' हीं पुस्तकें ग्रॅहॅम लिंकनला समजावून देऊं लागला. हे दोघे शेकोटीजवळ बसले म्हणजे मध्यरात्र उलटून गेली, तरी त्यांचा अभ्यास संपत नसे; आणि तितका वेळ आपल्याला जागत बसावें लागे, अशी आपली आठवण ग्रॅहॅमची पत्नी साराह हिनें सांगितली आहे.

ह्यानंतर कित्येक वर्षांनीं ग्रॅहॅमनें आपला अनुभव सांगितला: ' लिंकनच्या इतक्या उत्सुकतेनें व तयारीनें शिकणारा आपल्या शिक्षकीपेशाच्या दीर्घकाळांत कोणीच भेटला नाहीं. पांच हजार विद्यार्थांना आपण शिकविलें असेल, पण पायाशुद्ध प्रयत्न व सरळमार्गीपणा ह्यांच्यांतून ज्ञानाची व साहित्याची ओढ आणि अभ्यासी वृत्ति व्यक्त करण्यांत लिंकनची बरोबरी करणारा कोणीच नव्हता. ' हा ग्रॅहॅमचा अनुभव.

लवकरच लिंकन मोजणीचें यंत्र व टेप घेऊन मध्य इलिनॉयसमधील शेतें, रस्ते व गांवें ह्यांची आंखणी करण्यासाठीं निघाला. हें काम करतांना त्याला नाना जातीचें गवत, विषारी वनस्पति व शेवाळ ह्यांनीं व्यापलेली भूमि तुडवावी लागली व अनेक ठिकाणीं लांकडी ओंडक्यांतून मार्ग काढावा लागला. एकशेंआठ एकर प्रदेशांतलें काम पुरें केलें कीं लिंकनला अडीच डॉलर व ह्यांशिवाय रोजच्या खर्चासाठीं दोन डॉलर द्यावे असें ठरलें होतें. पण नेहमींच कांहीं त्याला रोख पैसे मिळत नव्हते. पहिल्या प्रथम त्याला हरणाचें कातडें मिळालें. कांटे व शरीरांत रुतणारीं झुडपें ह्यांच्यापासून लिंकनचें रक्षण व्हावें म्हणून जॅकची पत्नी हन्नाह आर्मस्ट्रॉंग हिनें लिंकनला ह्या कातडयाच्या विजारी बनवून दिल्या.

ही नोकरी व इतर कामें मिळून लिंकनला जी मिळकत होई त्यांतून पोट व कर्ज दोन्ही भागविणें शक्य झालें नाहीं. अशांतहि दुर्दैवाचा आणखी फेरा असा कीं, ज्यांचें तो देणें होता, त्यांनीं त्याचा घोडा, घोड्याचें खोगीर व लगाम आणि मोजणीचें यंत्र सर्व कांहीं त्याच्याकडून हिरावून घेतलें व लिलांवांत विकून टाकलें. एवढ्या सुदैवानें त्याच्या एका मित्रानेंच ह्या साऱ्या चीजवस्तु लिलांवांत विकत घेतल्या व लिंकनला परत दिल्या. धडपड करणाऱ्या ह्या तरुण मोजणी अधिकाऱ्यावरील निष्ठेमुळेंच त्या मित्रानें हा उपक्रम केला.

पुन्हा एकदां राज्यांतील विधानसभेची निवडणूक लढविण्याचा निर्णय १८३४ मध्यें लिंकननें घेतला. ह्या निवडणुकींत लोकशाहीवादी व परंपरावादी ह्यांच्या मदतीनें लिंकन निवडून आला. लोकशाहीवाद्यांपैकीं

बाउलिंग ग्रीन हा लिंकनला मोठा आधार होता. ह्या निवडणुकींत कांहीं पेंचप्रसंग निर्माण झाला होता. पण साधारण विधानसभेचा परंपरावादी उमेदवार जॉन टी. स्टुअर्ट ह्या स्प्रिंगफील्डच्या प्रमुख वकिलानें तो पेंचप्रसंग मिटविला. आणखी कांहीं महत्त्वाच्या मार्गांनींहि स्टुअर्टनें लिंकनला साहाय्य केलें. डिसेंबरांत व्हँडालिया येथें विधानसभेचें अधिवेशन भरलें. ह्यावेळीं राज्यांतील बिकट राजकारणांतून वाट कशी काढावी, ह्याचें मार्गदर्शन लिंकनला स्टुअर्टनेंच केलें. त्यासाठीं आवश्यक तो कायद्याचा भाग त्यानें लिंकनला वाचायला लावला; आवश्यक तीं कांहीं पुस्तकें सुद्धां त्यानें एबला दिलीं व पुढें त्यानें लिंकनला आपल्या व्यवसायांत भागीदारहि केलें.

तेव्हां, इतर अभ्यासाच्या जोडीनें आतां लिंकन आपल्या कायद्याच्या अभ्यासाचा पाया भक्कम करण्यासाठीं ब्लॅक स्टोनचें ' कॉमेंटरी ' व चिट्टीचें ' प्लीडिंगज् ' हीं पुस्तकें वाचूं लागला होता.

१८३४ सालच्या हिंवाळ्यापर्यंत एब मोजणीचें काम व इतर लहान-सहान कामें करीतच होता. त्यानंतर त्यानें कोलमन स्मूट ह्या आपल्या एका मित्राकडून दोनशें डॉलर कर्जाऊ घेतले; आणि शिंप्याकडून शिवून आणलेला आयुष्यांतला पहिलाच पोषाख केला. ह्यासाठीं त्याला साठ डॉलर खर्च आला. इलिनॉयसची राजधानी ह्यावेळीं व्हँडालिया ही होती. तेथील साधारण विधानसभेच्या लोकसभेंत बसण्याची त्याची ही पूर्वतयारी होती.

ह्या दिवसांत येथील रस्त्यांवर धूळ फार असे; विशेषतः नोव्हेंबर महिन्यांत. व्हँडालियासारख्या उजाड भासणाऱ्या शहरांत उतारूंनीं भरलेली मोटार अर्ध्याकच्चा स्थितींतील कंबरलँड रस्त्यावरून धावूं लागे. अशा वेळीं व्हँडालियामध्यें पाहण्यासारखें कांहींच नव्हतें – राजगृहाची दुमजली व विटांनीं बांधलेली इमारत, अधिवेशनासाठीं येणारे आमदार आणि त्यांच्या सोबत आलेलीं त्यांचीं कुटुंबें हेंच पाहण्यासारखें! स्टुअर्टबरोबर एका हॉटेलांत उतरण्यास जातांना सहाशें वस्तीची ही नगरी लिंकनला सर्वत्र सुवर्णसंधींनीं युक्त अशी वाटली.

सँगमॉन परगण्यांतला हा नवा प्रतिनिधि इलिनॉयसच्या विधानसभेंत दोन वर्षे काय काय करीत होता, हें तपशिलानें पाहण्याची गरज नाहीं. राजकारणांतील प्राथमिक गोष्टीच ह्या काळांत एब शिकत होता. ह्या काळांतील त्याच्या राजकीय प्रगतीबद्दल त्याच्याबद्दल सहानुभूति बाळगणाऱ्या एखाद्या निरीक्षकानेंहि म्हटलें असतें कीं, 'कोणत्याहि कामासाठीं लांकूड तोडल्यानंतर तें दुसऱ्या स्थळीं नेण्यांत जितकी प्रगति असेल, तितकी लिंकननें केली होती.' असला साधारण राजकारणी, एखाद्यानें आपल्याला अनुकूल असें कांहीं केलें, तर त्या बदल्यांत त्यालाहि अनुकूल असेल तेंच आपल्याकडून होईल असें पाहत असतो; एखाद्याला विधानसभेंत पाठिंबा देत असतो व ज्याला ह्यानें पाठिंबा दिला असेल तो प्रसंगीं ह्याला पाठिंबा देतो. दुर्दैवानें ह्या प्रकारच्या तडजोडी करणारे लोक ह्या काळांतील राजकारणांत बरेच होते.

\+ + +

विधानसभेंतील आठ वर्षांच्या काळांत लिंकन अल्पसंख्याकांचा नेता बनला. त्या काळांत ह्या स्थानाला महत्त्व होतें. ह्या स्थानामुळें एखादें विधेय त्याला पुढें रेटावयाचें असेल तेव्हां इतर सभासदांवर त्यासाठीं वारंवार दडपण आणणें, लिंकनला शक्य होई.

इतर राज्यांप्रमाणें इलिनॉयसचें राज्यहि ह्या काळांत अंतर्गत सुधारणां-बाबत निष्काळजी होतें. सरकारकडून साधा समजुतदारपणाहि दाखविला जात नसे. रस्ते, पाटबंधारे, रेल्वेरस्ता, ह्यांची राज्यांत निकड होती. पण सरकार इकडे लक्ष द्यावयास तयार नसे. इलिनॉयसच्या राज्याची ह्या काळांतील वार्षिक शिल्लक २००० डॉलर होती. अशा स्थितींत लाखों रुपये खर्चाच्या पाटबंधाऱ्याच्या व वाहतुकीच्या योजना सरकारनें हातीं घेणें मूर्खपणाचेंच ठरलें असतें, हें आपणास आज विचार करतांना वाटतें.

पण इलिनॉयसमधील प्रत्येक परगण्यांतून नवे रस्ते, पाटबंधारे व रेल्वे रस्ते ह्यांची जोरदार मागणी होत होती. आणि ह्या मागणीचा पुरेपूर फायदा मिळविण्यासाठीं लिंकननें विधानसभेंतील त्याच्या तिसऱ्या वर्षी शक्य

तितकी मुत्सद्देगिरी अवलंबिली. सँगॅमॉनचे 'लाँग नाइन' हा एक गट विधानसभेंत होता. ह्या गटांत सात सामान्य सभासद व दोन सिनेटर होते. सर्वांचीच उंची सहा फुटांहून अधिक होती. ह्या गटाचा नेता ह्या नात्यानें विधानसभेंत आपलें वर्चस्व गाजविण्यासाठीं ह्या सर्वांच्या शक्तिबुद्धीचा उपयोग लिंकननें केला. लोकशाहीवादी गटांतील लोकांना नवी वाहतूक-व्यवस्था हवी होती, तर लिंकनला आणि त्याच्या साथीदारांना राजधानीची जागाच बदलायची होती. व्हँडालियाहून स्प्रिंगफील्डला राजधानी न्यावी अशी त्यांची मागणी होती. ह्या प्रकरणीं अनेक प्रकारच्या हिकमती लढवून लिंकननें विजय मिळविला. वाहतुकीची नवी योजना विधानसभेंत नामंजूर झाली व राजधानींत बदल करणाऱ्या विधेयाला मान्यता मिळाली. व्हँडालियावर मिळविलेल्या ह्या विजयाबद्दल स्प्रिंगफील्डला उत्सव करण्यांत आले. राजधानींतला हा बदल घडवून आणण्यांत लिंकनचा बराच हात होता, म्हणून तो स्प्रिंगफील्डमधील लोकांच्या गळ्यांतला ताईत बनला.

व्हँडालिया येथें असतांनाच जेम्स शील्ड व स्टीफन ए. डग्लस ह्या दोन गृहस्थांशीं लिंकनचा परिचय झाला. हे दोघेहि पुढें लिंकनचे प्रतिस्पर्धि बनले. शील्डनें तर एकदां लिंकनला द्वंद्वाचें आव्हानहि दिलें. डग्लस हा ठेंगणा, धट्टाकट्टा, धडाडीचा व चतुर होता. सर्वच बाबतींत त्याच्याविषयीं आदर बाळगण्यासारखें मात्र नाहीं. ह्याच डग्लसशीं १८५० मध्यें झालेले लिंकनचे अनेक सुप्रसिद्ध वादप्रसंग आहेत. ह्या वादाचे प्रतिध्वनि त्यावेळीं सबंध देशभर उमटले होते. विधानसभेंतील सभासदांना एकदां मेजवानी देण्यांत आली होती. त्या प्रसंगीं हॉटेलांतील एका लांबट आकाराच्या टेबलावरच शील्ड आणि डग्लस ह्यांनीं जर्मन पद्धतीचा 'वाल्ट्झ' नाच सुरू केला, व राजकीय पुढाऱ्यांच्या ह्या उत्सवप्रसंगीं बहार उडवून दिला. ह्या नाचांत त्या हॉटेलांतील कांहीं कपबशा व इतर कांचसामान फुटलें. त्याची भरपाई म्हणून दुसऱ्या दिवशीं सहाशें डॉलर शील्डनें भरले. क्षणाच्या घटनेसाठीं भराव्या लागणाऱ्या ह्या रकमेंत एक मोठी व सुपीक जमीन खरेदितां आली असती.

लिंकन व्यावहारिक राजकारणाचे डाव खेळला हें खरें. पण आपल्या स्वप्नांना व ध्येयांना तो चिकटून राहिला नाहीं, असें मात्र नाहीं. देशांतर्गत सुधारणा व राजधानीचा प्रश्न, ह्या निमित्तानें गुलामगिरीच्या पद्धतीवरील आपले विचार जाहीरपणें मांडण्याची संधि त्याला मिळाली. ह्या विचारांत पुढील चोवीस वर्षांत फार थोडें परिवर्तन झालें. अन्याय आणि चुकीचें धोरण ह्यांवरच गुलामगिरीच्या पद्धतीची उभारणी झाली होती, हें त्यानें विधानसभेच्या निदर्शनास आणून दिलें. पण गुलामगिरीच्या पद्धतीचें सर्वस्वीं उच्चाटन करण्याची मोहीम विधानसभेनें हातीं घ्यावी असें त्याला वाटत नव्हतें हेंहि सांगून टाकलें. ज्या राज्यांत गुलामगिरीची पद्धत चालू आहे, त्या राज्याच्या एतद्विषयक कारभारांत हस्तक्षेप करण्याचा अधिकार संघ सरकारला नाहीं, असें त्याला वाटत होतें. पण इतकें निश्चितच कीं, कोलंबिया जिल्ह्यांतील गुलामगिरीच्या पद्धतीचें उच्चाटन करण्याचा अधिकार कॉंग्रेसला होता असें त्याचें मत होतें.

अशा रीतीनें, गुलामगिरी पद्धतीचें संकट कधींच पसरू देतां कामा नये, असें म्हणावयास लिंकननें तरुण वयांतच आरंभ केला होता.

विधानसभेचें अधिवेशन चालू नसेल त्या काळांत लिंकन सालेमला राहात असे. जेम्स रटलेजची, निळ्या डोळ्यांची व तांबूस तपकिरी केसांची मुलगी ॲन ही सुद्धां येथेंच राहात होती. जॉन मॅकनेल ह्या गृहस्थाशीं तिचें लग्न ठरलें होतें. ह्या गृहस्थाचें मूळचें नांव मॅकनामर असें होतें. १८३२ मध्यें कांहीं कौटुंबिक भांडणें मिटविण्यासाठीं मॅकनामर पूर्वप्रदेशांत गेला. तेथील काम संपतांच मॅकनामरनें परत यावयाचें व नंतर हें लग्न धरावयाचें असें निश्चित झालें होतें. पण मॅकनामर पूर्व प्रदेशांत गेल्यानंतर तीन वर्षें उलटलीं. ह्या कालावधींत मॅकनामरनें आपल्या भावी पत्नीला एकहि पत्र लिहिलें नाहीं. ॲननें व एबनें ह्याचा अर्थ, मॅकनामरनें आपला बेत बदलला होता असा घेतला, तर त्यांत त्यांचा कांहींच दोष नाहीं, हें कोणालाहि पटण्यासारखें होतें. पण खरोखरीच लिंकननें ॲनला मागणी घातली होती का, तिनें ती मान्य केली होती का, आणि १८३५ मध्यें ती निधन

पावल्यामुळें लिंकननें भ्रमिष्ट व्हावें इतका धक्का त्याला बसला होता का, हे पेंचदार प्रश्न होत.

अॅन व एब ह्यांचा प्रेमसंबंध होता ह्यावर विश्वास ठेवायला फार थोडा आधार सांपडतो. आणि लिंकनचा असा प्रेमसंबंध होता हें मान्य करायला लिंकनच्या आधुनिक चरित्रकारांपैकीं बहुतेक कोणीच तयार नाहीं. पण लोक मात्र हा प्रेमसंबंध ही सारी भाकड कथा आहे असें मानीत नव्हते. लिंकनच्या परिचयाच्या व अगदीं तरुण वयांत मरण पावलेल्या त्या मुलीचें म्हणून ओळखल्या जाणाऱ्या थडग्यावर एडगर ली मास्टर्स ह्यानें पुढील अर्थाची कविता खोदली आहे.

माझ्या — एका अज्ञात व अपात्र माणसाच्या
चिरंतन जीवन संगीताचे झंकार
‘ सर्वांप्रति निर्द्वेष – सर्वांप्रति उदारधी ’ हे स्वर गावोत.
असंख्य, असंख्यांना क्षमा करोत व
राष्ट्राचें हितकारी रूप, सत्य, सत्त्व आणि न्याय
ह्यांच्यांतून प्रकाशमान होवो.
मी —·अॅन रटलेज ह्या स्मृतिवृक्षाच्या छायेंत
चिरनिद्रा घेत आहें.
मी — अब्राहम लिंकनची जीवन प्रेयसी
माझें नातें संयोगानें नव्हे –
वियोगानें त्याच्याशीं जोडलें गेलें आहे.
माझ्या देहाच्या मातींतून
प्रजासत्ताक निरंतरासाठीं उमलो.

कित्येक वर्षांपूर्वी ह्या दोघांचीं अंतःकरणें प्रातःकालीन धुक्याप्रमाणें विरून गेलेल्या त्या गांवांत काय बोलत होतीं, तें आज कोणाला कसें उमजणार ? जी घडावी असें सारखें वाटतें, अशी एक कोमल परीकथा म्हणजे

रटलेजची ही कथा असावी; असेंहि वाटतें. कसेंहि असो, पण कित्येक प्रेमविषयक शोककथांप्रमाणें ह्या प्रेमकथेनेंहि आपल्या मागें एका परीनें एक इतिहास घडविला आहे.

कांहीं असो, पण ह्यानंतर थोड्याच दिवसांत अब्राहम लिंकनची न्यू सालेमबद्दलची ओढ कमी होऊं लागली. १८३७च्या एप्रिलमध्यें वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षी ( आपल्या आयुष्याचीं आणखी अठ्ठावीस वर्षेंच उरलीं असतांना ) एब वकिली करण्यासाठीं स्प्रिंगफील्डला गेला.

मागें त्याच्या अनेक स्मृति रेंगाळत होत्या. ‘ वांकुल्या ’ दाखविणारें तें दुकान; मनोज्ञ अशीं वर्तमानपत्रें वाचण्याची संधि जिनें त्याला दिली, ती पोस्टमास्तरकी; लांकडें फोडण्याचा धंदा; शेतांतलें काम; जमिनीची मोजणी; शेकोटीशेजारीं बसून मित्रांशीं केलेल्या गप्पा; वाचलेलीं पुस्तकें; शेजाऱ्यांनीं निवडणुकींत त्याला दिलेलीं मतें; अरण्यानजिकच्या त्या जमिनीच्या गालिच्यावर चिरशांत निद्रा घेणारी त्याच्या परिचयाची ती तरुणी; अशा कितीतरी गोष्टी त्याच्या ह्या रेंगाळणाऱ्या स्मृतींत आहेत. लिंकन गेल्यानंतर दोनच वर्षांनीं न्यू सालेम ह्या गांवाचा भूतखाना बनला. शेक्सपियरच्या प्रॉस्पेरोच्या वाणीनें सांगावयाचें तर—

हे आमचे नट —
तीं भुतें होतीं – पूर्वींच सांगितलें आहे तें मी तुला.
तीं वायूंत विलीन झालीं आहेत – अदृश्य वायूंत विलीन झालीं आहेत.
हें आमचें दैव –
स्वप्नें आकार घेतात आणि जीवन गति घेतें.
तेव्हां आम्हीं निद्रेच्या आधीन असतों.

# ९

## स्प्रिंगफील्डमधले पहिले दिवस

‘ मीं कायद्याचा अभ्यास केला आणि नंतर वकिली करण्यासाठीं स्प्रिंगफील्डला आलों. ’

—ए. लिंकन.

जोशुआ एफ्. स्पीड हा एक श्रीमंत आणि देखणा तरुण होता. केंटकींत तो लहानाचा मोठा झाला होता. तो एक व्यापारी-पेशांतला माणूस होता. स्प्रिंगफील्डला ह्याची आणि एबची गाढ मैत्री जमली. एबनें – अमेरिकेच्या ह्या भावी अध्यक्षानें पुढील चोवीस वर्षें स्प्रिंगफील्डला काढलीं. पण सुरुवातीला ज्या दयनीय स्थितींत तो ह्या शहरांत आला, त्यासंबंधीं स्पीडनें आपली आठवण सांगितली आहे. उसन्या घोड्यावरून एब स्प्रिंगफील्डला आला. त्याची सारी चीजवस्तु दोन पिशव्यांत मावली होती. स्पीडच्या दुकानांत तो प्रथम गेला. एका माणसाला पुरेशा पलंगाची चौकशी त्यानें केली होती. स्पीडनें तशा पलंगाची किंमत सतरा पौंड सांगितली होती. ह्यावर लिंकन म्हणाला होता – ‘आपण सांगितलेली किंमत कमींत कमीहि असेल. ह्या किंमतींत पलंग मिळणं म्हणजे तो स्वस्तांत पडणंहि असेल. पण आज माझ्याजवळ तितकेहि पैसे नाहींत. नाताळपर्यंत आपण थांबत असाल व मला हा पलंग उधार देत असाल, तर मी वकिलींत स्थिरस्थावर होऊन आपले पैसे देईन. पण धंद्यांत माझा जम बसला नाहीं तर मात्र आपले पैसे मला कधींच फेडतां येणार नाहींत. ’

उंच आणि अगतिक अशा ह्या कोणालाहि दुःखीकष्टी दिसणाऱ्या तरुणाकडे क्षणभर पाहून स्पीडनें काय विचार करायचा तो चटकन केला, व तो ह्या निराश तरुणाला म्हणाला –

'उसन्या घेतलेल्या इतक्या लहान रकमेबद्दलहि आपण इतके हताश असाल, तर मी आपणाला दुसरा एक मार्ग सुचवितों; आपलं काम होईल व कर्जहि काढावं लागणार नाहीं. माझी खोली मोठी आहे, दोघांना चालेल इतका मोठा पलंग आहे. आपल्याला पसंत असेल तर आपण माझ्या सोबत राहा.'

'कुठें आहे ती जागा?' लिंकन चटकन म्हणाला.

'वरच्या बाजूला.' वरच्या मजल्यावर जाणाऱ्या जिन्याकडे बोट दाखवीत स्पीड म्हणाला. लिंकननें आपलें सामान उचललें व जणूं धांवतच तो जिना चढून वर गेला. तो परत आला तेव्हां त्याचा चेहेरा समाधानी दिसत होता. तो म्हणाला, 'ठीक आहे. माझं हृदय भरून आलं आहे, स्पीड.'

स्प्रिंगफील्डला आल्यानंतर लिंकननें लिहिलेलें जें एक पत्र आहे, त्यांत आपल्या एकाकीपणाबद्दल त्यानें कळवळून लिहिलें आहे. पण बऱ्याच बाबतींत त्याला सुदैवी म्हटलें पाहिजे. जोशिआच्या औदार्यानें त्याला राहायला जागा मिळाली होती. इतकेंच नव्हे तर जेथें अनेकांच्या बैठकींत बसतां येईल व आपले विचार व्यक्त करतां येतील, अशा जागेंत तो आला होता. राजकारण व साहित्य ह्या विषयांवर तेथें वारंवार चर्चा चाले. प्रत्येकजण कांहींना कांहीं अभिप्राय व्यक्त करी. त्यासाठीं दुकानाच्या मागील बाजूच्या खोलींत शहरांतील अनेक चपलबुद्धि तरुण जमत. स्वतः स्पीड बहुधा लिंकनइतकाच बहुश्रुत होता. आणि लिंकनच्या मानानें त्याची तयारी व सफाईहि अधिक होती. 'बिली' हर्नडन हा चलाख होता. तो व्यवस्थित व नीटनेटका राही. स्पीडच्या दुकानांत हा कारकून होता. हे दोघे तर ह्या बैठकांना नेहमींच असत. कधीं कधीं स्टीफन ए. डग्लस् हा तरुण आणि यशस्वी राजकीय पुढारी ह्या बैठकींत येत असे. डग्लस वामनावतार होता, तर लिंकन उंच. डग्लस आक्रमणशील, तर लिंकन समजुतदार. डग्लस डेमॉक्रॅटिक पक्षाचा व लिंकन व्हिग पक्षाचा. पुष्कळ वेळां येथें जमणारे सगळे लोक कथा–विनोदांतच वेळ घालवीत; कधीं कोणी कविता म्हणून दाखवी. असें रात्रीं कितीतरी उशीरापर्यंत चाले. इतर वेळीं लिंकन व डग्लस राजकीय

प्रश्नांबाबत गंभीरपणें चर्चा करीत. ही जोडगोळी एकमेकांच्या तोलाची होती; तशीच वादकुशल.

आणखी कांहीं बाबतींतहि लिंकन सुदैवी ठरला. ह्या काळांतच जॉन टी· स्टुअर्ट ह्यानें लिंकनला आपला भागीदार म्हणून घेतलें. स्टुअर्टनें लिंकनला कायद्याचा चांगला अभ्यास करायला प्रोत्साहन दिलें. स्टुअर्ट–लिंकन फर्म जरी पांच डॉलर्सच फी आकारीत असे तरी धंदा ह्या दृष्टीनें त्यांना प्रतिष्ठा होती. पुन्हा, लिंकन स्प्रिंगफील्डमध्यें लोकप्रिय होता. कारण पूर्वींच सांगितल्याप्रमाणें त्यानें मोठ्या मुत्सद्देगिरीनें इलिनॉयसची राजधानी व्हँडालियाहून स्प्रिंगफील्डला आणली होती.

लिंकन स्प्रिंगफील्डला येण्याआधीं दोन वर्षेंच राज्यांतील लोकसंख्येची चांचणी झाली होती. त्यामुळें लिंकन आला तेव्हांच्या १५०० वस्तीच्या ह्या शहराचें ठळक चित्र आपणास दिसेल. येथें धार्मिक समारंभासाठीं जितकीं सभागृहें होतीं, तितकींच देवळें होतीं. ह्याप्रमाणें देवळें सहा व सभागृहें सहा होतीं. शहराची लोकसंख्या वाढत होती, त्या प्रमाणांत ते परतहि जात होते. किराणामालाचीं एकंदर एकोणीस केंद्रें येथें होतीं; चार हॉटेलें, चार औषध विक्रेत्यांचीं दुकानें व चार विश्रांतिगृहें. येथील परस्पर विरोधी मताचीं दोन वर्तमानपत्रें होतीं. पुढें तीं अब्राहम लिंकन आणि स्टीफन्स ए. डग्लस ह्या दोन राजकीय प्रतिस्पर्ध्यांचीं जवळ जवळ वैयक्तिक मुखपत्रें झालीं. लिंकनला प्रामाणिक निष्ठेनें पाठिंबा देणारा सीमियोन फ्रान्सिस हा ‘ सँगॅमो जर्नल ’चा संपादक होता, तर ‘ इलिनॉयस रिपब्लिकन ’चा (नंतर हेंच वर्तमानपत्र इलिनॉयस स्टेट रजिस्टर ह्या नांवानें निघूं लागलें.) संपादकीय पाठिंबा डग्लसला मिळत होता. ‘ इलिनॉयस रिपब्लिकन ’ चा संपादक जॉर्ज आर्. वेबर हा डग्लसचा मित्र होता.

येथील बहुतेक दुकानें व कचेऱ्या एकतर शहरांतील मध्यवर्ती चौकांत होत्या किंवा त्या आजूबाजूच्या रस्त्यांना होत्या. ह्या मध्यवर्ती स्थानापासून दूरवर वस्ती पसरत गेली होती; व झोपड्या, चौकीवजा घरें व विटांनीं बांधलेल्या इमारती तेथून दिसत होत्या.

शहरांतील लोकसंख्या सारखी वाढत होती, तसें हें शहर दूरवर पसरत चाललें होतें. शहरांतले सगळे रस्ते धुळीचे होते. उन्हाळ्यांत रस्त्यावर धुळीचे लोट उसळत व पावसाळ्यांत काळसर रंगाचा रपरपीत चिखल होई. चौकांत केव्हां केव्हां डुकरांचा सुळसुळाटहि आढळे. त्यामुळें रस्ता ओलांडतांना लोकांना कसरतच करावी लागे. ह्या नव्या राजधानींतील बऱ्याच गोष्टी सुधारणेच्या प्राथमिक अवस्थेंतच होत्या शहरांत मागासलेपणा व असंस्कृतपणा दृष्टीस पडे.

अशी परिस्थिती असूनहि तें नवें गांव आणि तो तरुण वकील ह्यांच्यांत निराळेंच वैशिष्टय होतें. अब्राहमनें नुकतीच वकिली सुरू केली होती. पुस्तकविक्रेत्यांचीं दुकानें तर ह्या शहरांत इतकीं होतीं कीं, त्याबद्दल शहरवासीयांनीं अभिमान बाळगावा. येथील शाळांतला अभ्यासक्रम आंखीव असे व तो नियमित चाले. कांहीं शाळा खाजगीरीत्या चालविल्या जात. कविमंडळ ( Thespian Society ), वृत्तिनेमस्त मंडळ ( Temperance Society ) आणि तरुणांचे अभ्यास मंडळ ( Yong Men's Lyceum ) ह्या संस्थाहि येथें होत्या. डॅनियल वेब्स्टरसारख्या सुप्रसिद्ध व्यक्तीचीं व्याख्यानें येथें होत. जीवनांतील ज्ञान आणि विचार ह्यांच्या प्रगतीसाठीं जितकें लक्ष स्प्रिंगफील्डसारख्या सरहद्दीवरील प्रदेशांत दिलें जात होतें, तितकें अमेरिकेंतील अगदीं थोडया शहरांत दिलें जात होतें; आणि असल्या सांस्कृतिक बाबींत विशेष लक्ष घालणारीं अब्राहम लिंकनसारखीं माणसेंहि त्या समाजांत फार थोडीं होतीं.

स्प्रिंगफील्डचे लोक पाहुण्यांचें आदरातिथ्य भरपूर करीत आणि तेंहि मोठें प्रसन्न. केंटकींतले जे सुखवस्तु व ऐटबाज लोक ह्या शहरांत होते, त्यांचें सामाजिक नेतृत्व नीनियन डब्ल्यु. एडवर्ड व त्याची पत्नी एलिझाबेथ (टॉड) ह्यांच्यासारख्यांकडे होतें. ह्या वर्गांत लिंकनला अगदीं सहज प्रवेश मिळाला होता. वास्तविक पोषाखाबाबत लिंकन निष्काळजी असे. त्याचे उच्चारहि ग्रामीण होते. रस्त्यानें खिदळत जाणाऱ्या व येतां जातां तरुण मुलींना आपणासीबत नाचतां का म्हणून विचारणाऱ्या तरुणांचें लक्ष हटकून आपणाकडे

वेधून घेणारा लिंकन. तरी जॉन स्टुअर्टचा वकिलींतील भागीदार व विधान सभेंतील व्हिग पक्षाचा नेता ह्या नात्यांनीं कोणत्याहि सभा–समारंभाला तो हजर असणें हाच मुळीं त्या सभासमारंभाचा थोर लौकिक समजला जाई.

परंपरागत माहिती अशी आहे कीं, विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनाच्या निमित्तानें झालेल्या फ्रेंच पद्धतीच्या एका नृत्यप्रसंगीं लिंकनची व मेरी टॉडची प्रथम भेट झाली. मेरी टॉड ही सौ. एडवर्डची धाकटी बहीण. ती निळ्या डोळ्यांची व किंचित् स्थूल होती. ती सुशिक्षित होती व तिचे संस्कारहि बऱ्यापैकीं होते. 'स्वत्वा'बद्दल ती जागरूकहि होती. ह्या प्रसंगीं तिनें लांब झगा अंगांत घातला होता. असें सांगतात कीं, नृत्य प्रसंगीं, फुलांनीं सजवलेल्या त्या सभागृहांत व पेटत्या मेणबत्त्यांच्या प्रकाशांत तिच्याइतकी आकर्षक दिसणारी दुसरी मुलगी तेथें नव्हती.

ह्या मुलीमुळें उंचीनें पुऱ्या आणि वेषानें गबाळ्या अब्राहम लिंकनचें मन तो सांगत होता त्या चटकदार गोष्टींतहि लागेना. घडींत स्टीफन्स डग्लसशीं, तर घडींत जेम्स शील्डशीं किंवा अशाच तिच्या दुसऱ्या एखाद्या चाहत्याशीं नृत्य करणाऱ्या ह्या मुलीवरून लिंकन आपली दृष्टि दुसरीकडे वळवूं शकत नव्हता. अखेर धीर करून चमकदार व्यक्तित्वाच्या कु. टॉडकडे तो गेला व तिला म्हणाला, ' जमेल तसं, पण तुमच्याशीं मला नाचायचं आहे. ' आणि मेरी टॉडनें सांगितलेल्या आठवणीप्रमाणें ' तसंच घडलं. '

अमेरिकेच्या इतिहासांत सर्वांत मोठें वादळ निर्माण करणारा प्रेमसंबंध आणि सर्वांस चकित करणारा लग्नसंबंध ह्यांतूनच निर्माण झाला.

अब्राहम आणि मेरी ह्यांच्याइतकें विसंवादी जोडपें दुसरें सांपडणार नाहीं. लिंकन शाळेंत गेला, तो जेमतेम एक वर्ष व तोहि सरहद्द प्रदेशांतील सामान्य शाळेंत. मेरी टॉडही दोन खाजगी विद्यालयांत शिकली होती. तिनें शाळेंत फ्रेंच, नाटक, नृत्य, संगीत व साहित्य ह्यांच्या जोडीनें, समाजांत ऐटीनें वागावें कसें ह्याचेहि धडे घेतले होते. लिंकन पिढीजात दरिद्री होता; इतकेंच नव्हे तर हँक्सच्या बाजूनें त्याचें घराणें कमी दर्जाचें मानलें जात

अनुक्रम ..२३५२... दि: ..५।८।७...
क्रमांक ...३... नों: दि: २३।५।७५

होतें व त्याबद्दल कांहीं प्रसंगीं लिंकनहि ओशाळत असे. उलट टॉड कुटुंब हें केंटकींतील एक 'बडें प्रस्थ' होतें. लिंकन निष्काळजी, विनम्र, उदार, सहनशील व क्षमाशील होता; तर मेरी नीटनेटकेपणानें वागणारी, चटकन भाववश होऊन अद्वातद्वा करणारी, दिखाऊपणा अंगीं असलेली, उथळ वृत्तीची, ताठ्यांत वागणारी व स्वतःच्या वृत्ति काबूंत ठेवूं न शकणारी, अशी होती. लिंकनच्या महत्त्वाकांक्षा नेमस्त होत्या. पण स्प्रिंगफील्डच्या लोकांनीं मेरीइतकी महत्त्वाकांक्षी स्त्री पाहिली नव्हती.

लिंकन, डग्लस व जेम्स शील्डस् ह्यांच्याशीं आळी पाळीनें मेरीला फिरतांना पाहून ह्यांपैकीं कोणाशीं लग्न करावेंसें तिला वाटतें, असें कोणी तरी तिला विचारी; आणि अनेकदां मेरीनें ह्या प्रश्नाला असें उत्तर दिलें होतें कीं, 'जो अमेरिकेचा अध्यक्ष होण्याची सर्वांत अधिक शक्यता असेला त्याच्याशीं.' आणि ह्या सन्मानाला पात्र असे लिंकन व डग्लस हे दोघे तिच्या नजरेंत होते. कदाचित मेरीच्या प्रवाही महत्त्वाकांक्षेनें कुणालाहि अमेरिकेचा अध्यक्ष केलें असतें.

पण मेरी टॉडच्या ह्या निरतिशय वास्तव व्यक्तिचित्रानें तिच्या व्यक्तित्वाची पुरी कल्पना येणार नाहीं. अलीकडील कांहीं इतिहासज्ञांनीं व ऐतिहासिक कादंबरीकारांनीं रेखाटलेल्या तिच्या गौरवपूर्ण कल्पनाचित्राचें कांहींसें समर्थन करण्याइतकी प्रसन्नता, जातिवंत सूक्ष्म दृष्टि आणि बुद्धिमत्ता मेरी टॉडच्या अंगीं होती; आणि लिंकनच्या स्वभावजात खेदजनकतेच्या तळाशीं त्यानें कधीं जाऊं नये, इतकें लिंकनला तिनें मंत्रमुग्ध केलें होतें. राजकारण व साहित्य ह्या त्यांच्या आवडत्या विषयांवर तीं दोघें एकत्र बसून बोलत. पण मेरीची बहीण सांगते—ज्या ज्या वेळीं मेरी व लिंकन तिच्याकडे येत तेव्हां कोणत्याहि विषयावर बोलण्यांत मेरी अग्रभागीं असे. लिंकन तिच्या शेजारीं बसून केवळ ऐकत बसे. क्वचितच एखाददुसरा शब्द तो बोलत असे; व मेरीकडे सारखा टक लावून बघत बसे. जणूं काय कोणती तरी श्रेष्ठ आणि अदृश्य शक्ति लिंकनला मेरीकडे खेंचून नेत होती.

पहिल्या भेटीनंतर एका वर्षांच्या अवधींत मेरी व अब्राहम ह्यांचा प्रेमसंबंध दृढ होत गेला. ह्या प्रेमसंबंधांच्या उत्साहांतच त्यांचे दिवस जात होते. एडवर्ड पतिपत्नींचा मेरी व अब्राहम ह्यांच्या लग्नाला विरोध होता. कारण त्यांच्या मतें अब्राहम मेरीला साजेसा वर नव्हता. तरी १८४० मध्यें केव्हां तरी त्यांचें लग्न ठरलें. पण त्यानंतर लवकरच काय घडलें कुणास ठाऊक ? चांगले चांगले माहीतगार चरित्रकारहि ह्या बाबत संभ्रमांत आहेत असें दिसतें. निळसर धुक्यामुळें सॅंगॅमॉन नदीच्या कांठाकांठाच्या हिंदी प्रदेशांत जसे सर्व धूसर अंधक दिसावें, ती गत ह्या प्रकरणाची आहे. हिंवाळयाचे दिवस होते. लिंकनच्या आधींच त्रासलेल्या मनाला तीव्र दुःख देणारें कांहीं तरी घडलें आणि त्यानें हें लग्न मोडलें. १ जानेवारी १८४१ हा तो दिवस होता. लिंकननें असें कां करावें हें नीटसें कळत नाहीं.

ह्यानंतरचीं दोन वर्षे दोघांचींहि दुःखांत गेलीं. विशेषतः लिंकनला हे दिवस कठिण गेले. तो इतका निराश झाला होता कीं, पहिले कित्येक दिवस तो घराबाहेर पडला नव्हता. पूर्वीच्या एका प्रेमप्रसंगांत त्याचें असेंच झालें होतें; मेरी ओव्हेन ही कांहीं फारशी आकर्षक बाई नव्हती. पण तिच्याशीं झालेल्या प्रेमसंबंधांतहि लिंकन असाच खंतावला होता. त्याचा स्वतःवरचाच विश्वास उडाला होता. तो कोणत्याहि बाबतींत नीटसा विचार करूं शकत नव्हता व कोणतीच गोष्ट धड करूं शकत नव्हता. त्याच गोष्टीची पुनरावृत्ति ह्या वेळींहि झाली.

ह्या अवस्थेंतून लिंकन मनानें सांवरला तो केंटकीला जोशुआ स्पीडला भेटायला गेला तेव्हां. ह्या भेटीनें त्याच्या प्रकृतींत व मनःस्थितींत सुधारणा घडून आली. स्पीड मायदेशीं गेल्यानंतर तेथील एका देखण्या मुलीशीं त्याचें लग्न ठरलें होतें. फॅनी हेनिंग हें त्या मुलीचें नांव. लिंकन आपल्या लग्नप्रकरणीं जसा नाराज होता तसा स्पीडहि स्वतःबाबत. स्पीडची ही नाराजी निरर्थक कशी आहे, हें त्याला समजावून देतां देतां लिंकन स्वतः सांवरला. स्पीडचा ठरलेला विवाह झाला. नंतर त्याचें लिंकनला पत्र आलें. त्या पत्रांत आपण सुखी असल्याचें त्यानें लिहिलें होतें. तें वाचून तर लिंकनचा

आनंद द्विगुणित झाला. १ जानेवारी १८४१ पासून त्यानें जें भोगलें होतें त्या भीषणतेची सारी भरपाई ह्या आनंदानें केली.

ह्यानंतर, 'सँगॅमो' ह्या वृत्तपत्राचा संपादक सीमियो फ्रान्सिस ह्याच्या पत्नीच्या मध्यस्थीनें मेरी टॉड व अब्राहम ह्यांच्या पुन्हा गुप्त गांठीभेटी होऊं लागल्या. त्यासाठीं ह्या बाईनें आपलें घर दोघांनाहि मोकळें ठेवलें होतें. 'हरवलेलें नागरिकत्व' (Lost Township) ह्या पत्रसंग्रहांतील पत्रांच्या निर्मितीचीं खलबतें ह्या ठिकाणच्या भेटींतच झालीं असलीं पाहिजेत ह्यांत शंका नाहीं. ह्या पत्रांनींच लिंकनवर जिवावरचा प्रसंग आणला होता.

सुरुवातीपासूनच उपहासगर्भ व बोंचरें विनोदी लेखन करण्याचा लिंकनला छंद होता. ह्या आपल्या लेखनविशेषाचा उपयोग आतां त्यानें राजकीय संघर्षांत करण्यास सुरुवात केली. 'सँगॅमो जर्नल' त्याला केव्हांहि मोकळें असल्यामुळें आपल्या कांहीं शत्रूंवर कोटिक्रमात्मक हल्ला करण्याचा मोह त्याला आवरतां आला नाहीं. असे हल्ले तो नेहमीं टोपण नांवानें करीत असे. ह्यासाठीं त्यानें अनेक टोपण नांवें घेतलीं होतीं. 'सॅम्प्सनचें भूत' हें अशाच टोपण नांवांपैकीं एक नांव होतें.

'हरवलेलें नागरिकत्व' मध्यें मेरी व लिंकन यांनीं 'आँट बेक्का' ही एक काल्पनिक कृषिवल स्त्री निर्माण केली. तिच्या सहीनें कांहीं पत्रें प्रसिद्ध करण्याचा एक स्वप्नरंजक घाट त्यांनीं घातला. ह्या कामीं मेरीची जीवश्च-कंठश्च मैत्रीण ज्यूलिया जेने हिची फार मदत झाली. ह्या 'आँट बेक्का' ची लेखणी मोठी तिखट व धारदार होती. ह्या लेखणीचा बळी अर्थातच जेम्स शील्डस् हा होता. शील्डस् हा ह्यावेळीं अर्थमंत्री होता. तो जन्मानें आयरिश होता, आणि राजकारणांत (व कांहींसा प्रेमप्रकरणांतहि) लिंकनचा प्रतिस्पर्धि होता.

सरकारी कर्ज वाढलें होतें. ह्याला जबाबदार लिंकन व त्याचे व्हीगपक्षीय साथीदार हेच होते. सरकारी अर्थव्यवस्थेंत ह्या कर्जामुळें बांका प्रसंग निर्माण झाला; आणि राजकारणांतील नेहमींच्या रीतीप्रमाणें ह्या दोषाचें

खापर शील्डस् व त्याचा पक्ष ह्यांच्यावर फोडण्यांत आलें. घडलेल्या प्रकारांत शील्डस्पेक्षां लिंकनचाच दोष अधिक होता.

ह्या सगळ्या कारस्थानांत प्रतिष्ठितपणा उरला नाहीं. लिंकनच्या गैर-हजेरींत मेरी टॉड व ज्यूलिया जेने ह्यांनीं 'आँट बेक्का' च्या सहीनें शील्डस्चा उपमर्द करणारें पत्र लिहिलें नसतें, तर माफी कीं लढतीचें आव्हान, ह्यांपैकीं एक निवडण्याचा प्रसंग लिंकनवर येताच ना. आव्हानाचा सरळ स्वीकार झाला असता तर तितकासा अटीतटीचा प्रसंग उद्भवला नसता. पण 'आँट बेक्का'नें जाहीर केलें कीं, 'लढतच करायची तर ती समान व न्याय्य भूमिकेवरून झाली पाहिजे; व त्यासाठीं एक तर शील्डस्नें बायकी पोषाख अंगावर चढविला पाहिजे किंवा तिला तरी विजार कसून तयार झालें पाहिजे.'

ह्या प्रकरणानें शील्डस् मनस्वी चिडला, आणि त्यानें आग्रहच धरला कीं, संपादकांनीं 'आँट बेक्का' चें खरें नांव जाहीर केलें पाहिजे. जाहीर माफी मागितल्यावांचून हें प्रकरण निकालांत निघावें म्हणून लिंकननें सगळ्या पत्रांची जबाबदारी आपल्या अंगावर घेतली. पण हा उपक्रम सफल न झाल्यानें मोठ्या नाखुषीनेंच त्यानें शील्डस्चें लढतीचें आव्हान स्वीकारलें. ह्या लढतींत वापरावयाचें शस्त्र म्हणून घोडेस्वार वापरीत तसली बांकदार तरवार वापरण्याचें ठरविण्यांत आलें. शील्डस् पूर्वीं द्वंद्व शिक्षक होता. त्यामुळें लिंकनची ही निवड म्हणजे आत्मनाशाला आवाहनच होतें. दुसऱ्या एका अटीनें मात्र हें द्वंद्व हास्यास्पद ठरविलें. द्वंद्वाच्या स्थानीं समोर एक लांकडी पट्टी ठेवायची; दोघांपैकीं कोणीच ह्या पट्टीच्या पुढें यावयाचें नाहीं; तसेंच ह्या पट्टीपासून मागें तरवारीच्या लांबीपेक्षां तीन फूट अधिक अंतरावर एक रेषा आंखावयाची; ह्या रेषेबाहेर कोणींहि जावयाचें नाहीं; अशी ही दुसरीहि अट लिंकनच्या मागणीप्रमाणें मान्य करण्यांत आली होती. साहजिकच शील्डस् ह्या शास्त्रांत कितीहि ज्ञानी व प्रवीण असला, तरी त्याची तरवार लांब हाताच्या लिंकनपर्यंत पोहोंचणेंच शक्य नव्हतें. आणि लिंकनला नियमभंग न करतां थोडें मागें सरकून शील्डस्चा प्राणघाती वार चुकविणें शक्य होतें. हें द्वंद्व प्रत्यक्ष सुरू होण्याआधींच्या कांहीं काळांत संघर्षांतील मुख्य

मुद्दे बाजूला पडले व बारीक सारीक क्षुल्लक गोष्टींनींच दोघांच्या वैराच्या आगींत तेल ओतणें सुरू ठेवलें होतें. ठरल्याप्रमाणें एका ठराविक दिवशीं दोघे मिसुरीला एकत्र आले. हें ठिकाण इलिनॉयसमधील ॲल्टनच्या पलीकडे मिसिसिपीच्या किनाऱ्यावर आहे. पण तेथें द्वंद्व न होतांच त्यांची दिलजमाई झाली.

ह्या प्रसंगाचे लक्षणीय असे दोन परिणाम मात्र निश्चितपणें दिसून आले. ह्यापुढें लिंकननें विरोधकांवर टोपणनांवी हल्ला कधींच केला नाहीं. मेरी टॉडला वांचविण्यासाठीं लिंकननें जी माणुसकी दाखविली होती तिनें मेरी सुखावली होती व तिचें हृदय भरून आलें होतें. परिणाम असा झाला कीं, लिंकनबरोबर शक्य तितक्या लवकर लग्न करायला तिनें संमति दिली; हा दुसरा परिणाम.

एलिझाबेथ व नीनियन ह्यांच्या घरीं हें लग्न लागलें. ह्या समारंभाला त्यांचे अगदीं निकटचे कांहीं मित्र हजर होते. आयुष्याचे जोडीदार म्हणून आम्ही एकमेकांचा स्वीकार करीत आहोंत, अशा शपथा मेरी व अब्राहम ह्यांनीं घेतल्या; व अशा प्रकारें, बऱ्यावाईट कोणत्याहि परिस्थितींतून, श्रीमंतींत किंवा गरिबींत, व्यथेंत किंवा सुखात कोणत्याहि स्थितींत मेरीच्या थोर महत्त्वाकांक्षेच्या साधनेच्या मार्गानें—अब्राहमसाठीं, अमेरिकेचें अध्यक्षपद मिळविण्यासाठीं व मेरीला अमेरिकेंतील अग्रमानाची महिला म्हणून सन्मानाचें स्थान मिळविण्यासाठीं—करावयाच्या संघर्षमय प्रयत्नांत त्यांनीं बरोबरीनें वाटचाल करण्यासाठीं तीं सिद्ध झालीं.

# १०

## काँग्रेसचें सदस्यत्व आणि वकिली

'काँग्रेसच्या कनिष्ठ सभागृहाचा सदस्य म्हणून १८४६ मध्यें मी निवडून आलों.'

—ए. लिंकन

वकिली व्यवसायांत लिंकनला तीन भागीदार लाभले. त्यांपैकीं जॉन टी. स्टुअर्टचा उल्लेख पूर्वींच केला आहे. दुसरा स्टीफन टी. लोगन व तिसरा विल्यम एच्. हर्नडन. १८४१ मध्यें स्टुअर्ट व लिंकन ह्यांनीं आपली भागीदारी संपविली. त्यानंतर लिंकन लोगनबरोबर काम करूं लागला. इलिनॉयसमधला एक सूक्ष्मबुद्धि वकील म्हणून लोगनची ख्याति होती. बुटक्या आणि सडपातळ अशा ह्या गृहस्थाचे केंस तांबूस रंगाचे होते. ह्यानें केसांचीं झुलपें ठेवलीं होतीं. हाहि लिंकनप्रमाणेंच पोषाखाबाबत निष्काळजी होता. पण हातीं घेतलेल्या दाव्याची तो कसून तयारी करीत असे. लिंकन आपल्याकडील दाव्यांची तयारी व्यवस्थित व काळजीपूर्वक करींत नसे; दाव्याची तयारी करतांना कायद्याच्या ज्ञानाचा उपयोग चांगल्याप्रकारें कसा करावा व तयारींत अनुशासन व मार्मिकपणा कसा दाखवावा, हें लिंकनला लोगननेंच शिकविलें. त्यामुळें लिंकन वकिली युक्तिवाद पूर्वींपेक्षां चांगल्या तऱ्हेनें करूं लागला. लोगननें तर लिंकनच्या वकिली ज्ञानाविषयीं असें म्हटलें आहे कीं, 'तो एक बऱ्यापैकीं वकील असला, तरी त्याच्या ह्या क्षेत्रांतील ज्ञानाबद्दल थोडी सावधगिरीच बाळगली पाहिजे.'

१८४४ मध्यें लोगननें आपल्या मुलालाच हाताखालचा वकील म्हणून जवळ केलें. त्यामुळें लिंकन पुन्हां एकटा पडला. ह्यावेळीं सव्वीस वर्षांच्या 'बिली' हर्नडनला हाताखालीं घेऊन लिंकननें बिलीलाच आश्चर्यचकित

केलें. हर्नंडननें असें म्हटलें आहे कीं, "मीं नुकतीच वकिली सुरू केली होती; माझी पात्रता व अनुभव ह्यांबाबतच्या माझ्या उणिवेबद्दल मला खेद वाटत होता; पण लिंकननें जेव्हां 'बिली, तुझा माझ्यावर विश्वास असेल तर माझा विश्वास बाळग;' असें त्याच्या नेहमींच्या प्रामाणिकपणानें व मनापासून मला म्हटलें, तेव्हां माझी सुटका झाल्यासारखं मला वाटलं व लिंकनची ती उदार सूचना मीं मान्य केली."

लिंकननें केलेली सूचना उदारपणाची होती हें खरेंच. पण दिसायला ती जितकी निष्काळजीपणाची व गैरहिशेबी दिसते, तितकी ती तशी नव्हती. शहराच्या आसपासच्या मतलबी व बेदरकार तरुणांवर हर्नंडनचें चांगलें वजन होतें. त्यांच्या मताचा परिणाम कोणत्याहि राजकीय निवडणुकीच्या निकालावर होण्यासारखा होता. ह्याचा लिंकनला उपयोग करून घेतां येण्यासारखा होता. हर्नंडनचें शिक्षण लिंकनपेक्षां चांगलें पद्धतशीररीत्या झालेलें होतें. अनेक विषयांची व विशेषत: तत्त्वज्ञानाची त्याला चांगली समज होती. लिंकन ह्या वेळपावेतों कोणाच्या ना कोणाच्या हाताखालीं काम करीत होता; आतां त्याला आपल्या हाताखालीं काम करणाराहि कोणीतरी असावा, असें वाटलें असेल. केवळ बदल व्हावा म्हणूनहि त्याला असें वाटलें असेल. त्यासाठीं त्यानें बिली हर्नंडन ह्या तरुण माणसाची निवड केली होती. असें करण्यांत आपल्याविषयींच्या ज्याच्या आदराचें रूपान्तर हळुहळू निष्ठेंत झालें होतें, अशा तरुणाचीच आपल्या सोबतचा दुय्यम वकील म्हणून त्यानें निवड केली होती. बिली हा लिंकनचा निष्ठावंत सहकारी असला तरी त्याच्या अंतर्मनांत ह्या निष्ठेंत कांहीं हेव्याच्या छटाहि निर्माण व्हायला आरंभ झाला असावा.

लिंकनचे कपडे नेहमीं चुरगाळलेले असत; ते त्याला नीट बसतहि नसत. हर्नंडनचे कपडे मात्र भडक असत, खेळाडू वापरीत तसले कातड्याचे खास बूट तो वापरीत असे, तसेंच नीटनेटके लहानसे हातमोजेहि. कमी उंचीची रेशमी हॅट दोघेहि वापरीत. पण हर्नंडनची हॅट स्वच्छ व चकचकीत असे, तर लिंकनची धुळीनें माखलेली व बेढब होती आणि त्यांत नेहमीं कोर्टाचे कागदपत्र भरलेले असत.

ही विलक्षण जोडी निष्ठेनें राहिली. लिंकनच्या मृत्यूपर्यंत हें चाललें. आपल्या भागीदारीचा कायदेशीर लेखी करार त्यांनीं कधींच केला नाहीं. मिळालेले पैसे दोघेहि सारख्या प्रमाणांत वांटून घेत. हर्नडन आणि लिंकनची पत्नी मेरी ह्यांचें मात्र कधींच पटलें नाहीं. पण त्यांच्यांतील धुमसणाऱ्या ह्या गोष्टीनें 'बिली' आणि 'लिंकन' ह्यांचे संबंध कधी बिघडविले नाहीत.

लिंकनला हा मनमिळावू सहकारी मिळाला, हें त्याचें भाग्य होतें. कारण, त्याचें घरगुती जीवन नेहमीच कांहीं सुखाचें नव्हतें. लिंकन व मेरी ह्यांनीं एकमेकांना लिहिलेलीं पत्रें व तारा उपलब्ध आहेत. त्यांवरून बोलायचें तर दोघांचें एकमेकांवर निरतिशय प्रेम होतें. आयुष्यांतले विजय व पराजय दोघांनीं एकदिलानें भोगले व सोसले. परस्परांशीं होणारें त्यांचें वर्तन नांव ठेवण्यासारखें मुळींच नव्हतें. राजकीय धकाधकींतहि तीं एकमेकांना पूरक अशीं वागलीं आणि दोघांनाहि एकमेकाबद्दल कौतुक होतें.

पण मेरीची डोकेंदुखी, तिचा बोचरेपणा व तिची तिखट जीभ ह्यांमुळें घरांत शांततेपेक्षां ओकेपणाच दिसून येई. आरामांत सगळें कांहीं करण्याची नवऱ्याची वृत्ति, त्याच्या आचारांतली अनागरिकता, त्याचा ढोबळ विनोद आणि जमिनीवर पडून भिंतीला उंच पाय टेकून वाचण्याची तऱ्हेवाईक पद्धत ह्यांबद्दल ती सारखी तक्रार करीत असे. दुसऱ्या बाजूनें मेरी सुद्धां कांही बाबतींत तऱ्हेवाईक होती. ढगाचा गडगडाट ऐकला कीं, ती घाबरी होत असे. म्हणून दुरून कोठून ढगांचें गाजणें ऐकलें कीं, बावरलेल्या मेरीला धीर देण्यासाठीं लिंकनला घरीं धांव घ्यावी लागत असे.

लग्नानंतर सुरुवातीचे कांहीं दिवस ती स्प्रिंगफील्डमधील 'ग्लोब' ह्या हॉटेलांत राहिली होती. तेथें जागेचे व जेवण्याखाण्याचे मिळून आठवड्याला चार डॉलर पडत. रॉबर्ट टॉड लिंकन ह्या त्यांच्या पहिल्या मुलाचा जन्म येथेंच १८४३ मध्यें झाला. १८४४ च्या जानेवारींत त्यांनीं १५०० डॉलर खर्च करून एक लहानसें घर घेतलें. नंतर ह्या घरांत त्यांनीं कांहीं थोडी वाढहि केली. १८६१ मध्यें 'व्हाइट हाऊस' मध्यें राहण्यास जाईपर्यंत तीं ह्याच घरांत सुखासमाधानानें राहात होतीं. ह्याच घरांत आणखी तीन मुलांचा

जन्म झाला. ज्याला तीं ' एडी ' म्हणून हांक मारीत, तो एडवर्ड १८४६ मध्यें जन्मला. ' विली ' म्हणजेच विल्यम वॉलेस ह्याचा जन्म १८५० मध्यें झाला व लाडांत तीं ज्याला ' टॅड ' म्हणत तो थॉमस १८५३ मध्यें जन्मास आला. ह्या चार मुलांपैकीं रॉबर्ट टॉड लिंकन हाच काय तो जगला.

मेरी व लिंकन ह्यांचें ह्या मुलांवर प्रेम होतें. त्यांच्या प्रकृतीची तीं काळजी वाहत. मुलें आजारी पडलीं की, तीं दोघें त्यांच्या बिछान्याशेजारीं सारखीं बसून राहत. मुलांबद्दलच्या ह्या मायेंतून तीं दोघें मनानें एकमेकांच्या अधिक जवळ आलीं. तीं मुलांचे अति लाड करीत. मुलांना शिस्त लावणें त्या दोघांनाहि जड गेलें. लिंकनचें ज्यावर प्रेम असे, त्याबाबत बिली हर्नडन पूर्व-ग्रहदूषितच असे. तो तर ह्या मुलांना ' नतद्रष्ट ' च म्हणे. दर रविवारीं सकाळीं लिंकन मुलांना आपल्या कचेरींत आणीत असे. तेव्हां तीं बिलीला भंडावून सोडीत. त्याच ठिकाणीं मोठ्यानें वाचीत बसलेल्या लिंकनला आपलीं मुलें काय करताहेत ह्याची दादफिर्यादहि नसे. खोलींत तीं इकडे तिकडे धांवत सुटत, पुस्तकें विस्कटीत, टेबलाचे खण उपसून टाकीत, इतर वस्तूंची उधळण करीत, झरणीच्या निबांचीं सोनेरी टोकें घाशीत बसत, शाई सांडीत, कागदपत्रें खोलीभर करीत व त्यांवरून नाचत; अशी त्यांची अंदाधुंदी चाले. ह्या मुलांना बदडून काढावें असें हर्नडनला वाटे. पण लिंकन केव्हां केव्हां ह्या मुलांतच सामील होऊन त्यांच्याबरोबर खेळूं लागे; आणि मेरीप्रमाणेंच त्यांच्या खोडकर संवयी घालविण्याचा कधीं प्रयत्न करीत नसे. रागाच्या भरांत लिंकनचे वडील त्याला वाटेल तेव्हां काठीनें झोडपून काढीत; तारुण्यांतहि लिंकननें कठिण परिस्थितींत दिवस काढले होते; ह्या सगळ्याची वाजवीपेक्षां अधिक भरपाईच जणूं तो मुलांशीं ढिलेपणानें वागून त्यांना धाक न दाखवितां करीत होता.

मुलांशीं लिंकन कसा वागत असे, ह्यासंबंधीं अनेक आख्यायिका उपलब्ध आहेत. त्या सर्वांवरून इतकें सिद्ध होतें कीं, तो मुलांशीं नेहमीं सहिष्णुतेनें वागे आणि त्याचें मुलांवर अमर्याद प्रेम होतें. लिंकनची उंची सहा फूट चार इंच; तशांत तो उंच आकाराची हॅट वापरीत असे. तेव्हां रस्त्याच्या

दुतर्फाच्या झाडांना सात फुटांवर कोणालाहि सहज तिच्या खालून जातां येईल अशी एखादी दोरी जर बांधली, तर लिंकनची हॅट त्या दोरीला हटकून अडके. त्यामुळें ती हॅट खालीं पडे व त्यांतील कागदपत्रें रस्त्यावर पसरत. असें झालें म्हणजे ह्या प्रसंगाची वाटच पाहात आजूबाजूच्या झुडपांत लपून, श्वास रोखून बसलेलीं मुलें हंसतखिदळत बाहेर येत, आणि रस्त्यावर नाचूं बागडूं लागत. ह्या निरुपद्रवी थट्टामस्करींत मुलांबरोबर लिंकनहि आनंद मानीत असे.

वकिली हा लिंकनचा पेशा होता, तर राजकारण हा त्याचा आवडीचा उद्योग. व्हिग पक्षांतील आपल्या सहकाऱ्यांनीं काँग्रेसवर आपली निवड करावी, इतकी आपली योग्यता आहे, असें लिंकनला वाटत होतें. पण अशा निवडणुकींत तो दोनदां हरला. शेवटीं १८४६ मध्यें पक्षांतील इतर जिल्हा-पुढाऱ्यांशीं संगनमत करून त्यानें ही संधि साधली. ह्यावेळीं व्हिगपक्षानें त्याची निवड केली. डेमॉक्रॅटिक पक्षाच्या आपल्या प्रतिस्पर्ध्यावर मात करून तो निवडून आला. ह्या विजयाची कल्पना त्याला होतीच. त्यामुळें निवडून आल्याच्या आनंदानें तो बेहोष झाला नाहीं; व १८४७ च्या डिसेंबरांत प्रतिनिधि सभेंत हजर राहण्याच्या तयारींत राहिला.

जिच्याशीं साधें वागणें हेंहि एक दिव्य होतें, त्या आपल्या कांहींशा स्थूल पत्नीसह ह्या नव्या व इलिनॉयसमधल्या एकुलत्या एका काँग्रेस सदस्यानें वॉशिंग्टनपर्यंतचा लांब पल्ल्याचा प्रवास आगबोटीनें व रेल्वेनें केला. ह्या काळांत राजधानींतील वस्ती विखुरलेली होती. सुमारें चाळीस हजार लोकसंख्येचें हें शहर. त्यापैकीं तीस हजार गोरे व दहा हजार निग्रो होते. ह्या दहा हजारांपैकीं एक पंचमांश निग्रो गुलाम होते. राजधानींतल्या सरकारी इमारतींतून ठळकपणें दिसणाऱ्या गुलामांच्या सर्वांत मोठ्या बाजाराला गुलामांचा पुरवठा ह्या शहरांतून होत असे.

१८४७ मध्यें काँग्रेसची इमारत वर गोलाकार असलेली, तात्पुरत्या बांधणीची व लांकडी होती. पुढील काळांत दोन बाजूंनीं तिची वाढ करण्यांत आली. दर बुधवारीं व रविवारीं दुपारीं ‘ व्हाइट हाऊस ’च्या

हिरवळीवर लोकांच्या मनोरंजनासाठीं सैनिकी बँड वाजविण्यांत येई. मात्र नदी व सचिवालय ह्यांच्यामधील अंतरांत हिंवतापाच्या डांसांचीं बरींच डबकीं होतीं. 'पेन्सिल्व्हानिया ॲव्हेन्यु' हा रस्ता दगडी कोब्याचा होता· त्यावरून धनिकांच्या गाड्या खडखडाट करीत धांवत. एरवीं बाकीचे रस्ते स्प्रिंगफील्डमधील रस्त्यांप्रमाणें ऋतुमानानुसार धुळीनें व चिखलानें भरलेले होते. ह्या शहरांतहि गल्लीबोळांतून डुकरें, बदकें व कोंबड्या उकिरडे हुंगत फिरतांना दिसत. इमारती आणि झोपड्या ह्यांची सरमिसळ वस्ती होती.

निवडणुकींतील विजयाबद्दल लिंकनला थोडासा आनंद झाला होताच. पण मेरीला वॉशिंग्टन हें शहर मुळींच आवडलें नव्हतें. टॉड वंशांतील म्हणून तिचा वारसा केंटकींतलाच होता. पण राजधानीच्या शहरीं तिला फार थोडी सामाजिक प्रतिष्ठा होती. कांहीं समारंभाचीं निमंत्रणें तिला येत; पण तसे समारंभ फार थोडे असत व ते वारंवार ोत नसत. ज्या इमारतीच्या एका भागांत आतां कॉंग्रेसचें ग्रंथालय आहे, त्या इमारतींतील हॉटेलांतच लिंकननें जागा घेतली होती. तेथील शेजाऱ्यांत व बोर्डिंग हाऊसमधील साथीदारांत एब लवकरच मिसळून गेला. लिंकनच्या चटकदार गोष्टी त्यांना आवडत व त्याच्या मनमिळावू स्वभावावर ते खूष होते. पण मेरी मात्र एक जेवणाची वेळ सोडली, तर इतर वेळीं सारखी आपल्या खोलींतच असे. तेथील फारच थोड्या लोकांशीं तिनें संबंध ठेवला होता. तीन महिने ती हें कंटाळवाणें जीवन जगली; आणि नंतर लहानपणीं ती ज्या घरांत वाढली होती, त्या केंटकींतील आपल्या घरीं राहावयास गेली. कॉंग्रेसचें हें अधिवेशन संपेपर्यंत ती तेथेंच नवऱ्याची वाट पाहत राहिली.

अब्राहम व मेरी ह्यांचें परस्परांवर किती प्रेम होतें, हें विशद करणारा पुरावा ह्या विरहकालानें आपणास दिला आहे. कित्येक वेळां त्यांचें एकमेकांशीं पटत नव्हतें. पण ह्या विरहकालांतील लिंकनचीं चार व मेरीचें एक अशीं जीं पांच पत्रें उपलब्ध आहेत, त्यांतून असें स्पष्ट होतें कीं एकमेकांच्या सहवासांत नसलीं म्हणजे त्यांना आपण एकाकी आहोंत असें वाटे.

मुलांवर दोघांचीहि माया सारखीच असल्याचेंहि ह्या पत्रांतून दिसून आलें आहे.

लिंकननें आपल्या बायकोला लिहिलेलीं हीं पत्रें म्हणजे केवळ प्रेममय भावनाप्रधान पत्रें होत, असें म्हणणें जड जाईल. पण 'मेरीशिवाय त्या खोलींत एकटें राहणें मला तिरस्काराचें वाटतें' असें लिंकननें लिहिलें आहे, इतकें खरें, 'एडी'च्या पायाचे लहान मोजे त्यानें खरेदी केले होते, व त्याचीच तो सोबत मानीत होता. कसेंहि करून मेरीनें आपल्याजवळ राहावें असें त्याला वाटत होतें. तिची डोकेंदुखी थांबली असेल अशी तो आशा करीत होता. मेरीला दुसरें लग्न करावेंसें वाटेल, इतकी ती चांगली, स्थूल व रसरशीत तर होणार नाहीं ना; हीच त्याला भीति वाटे. म्हणून नेहमीं तिनें आपलें वजन करून घ्यावें व तें आपल्याला कळवावें; असें तिला तो कळवीत असे. मुलांसंबंधीं तो असें लिही कीं, 'ते गुलाम मला विसरणार तर नाहींत ना?' आणि अखेर तो पत्रावर सही करी ती 'तुझा सर्वांत लाडका' अशी असे. ही सही विशेष रोमांचकारी नसली, तरी कोणतीहि पत्नी आपल्या नवऱ्याकडून साधारणपणें असल्या नाजुक भावनांची अपेक्षा करतेच.

एक नवा प्रतिनिधि म्हणून लिंकन काँग्रेसच्या तिसाव्या अधिवेशनाला प्रथम हजर राहिला तेव्हां सभागृहांत तो अगदीं मागच्या बाजूला बसला होता. विशेष कोणाला त्याची माहितीहि नव्हती. ज्यांनीं इतिहास घडविला होता, किंवा घडविण्याच्या मार्गांत होते असे किती तरी प्रतिनिधि त्या सभागृहांत होते.

ह्या सगळयांत विशेष लक्षांत ठेवण्याच्या योग्यतेचा जॉन क्विन्सी ॲडॅम्स हा होय. संयुक्त संस्थानांचा हा माजी अध्यक्ष होता. ऐंशीं वर्षांचा हा व्हिगपक्षीय सभासद होता. तो तसा मतलबी होता व त्यानें देशाला आपलें कर्तृत्व वाहिलें होतें. गुलामगिरीच्या पद्धतीवर तो लिंकनपेक्षां अधिक तीव्र व उघड टीका करीत असे. आजूबाजूला मान वळवून लिंकननें पाहिलें असतें, तर त्याला तेथेंच जॉर्जियाचा ॲलेक्झांडर एच्. स्टीफन्स, व टेनेसीचा

अँड्र्यु जॉन्सन, पेन्सिल्व्हानियाचा डेव्हिड विलमॉट, ही मंडळी दिसली असती. स्टीफन्स पुढें विभक्त संस्थानांच्या सांघिक सरकारचा उपाध्यक्ष झाला; अँड्र्यु जॉन्सननें नंतर लिंकनच्या हाताखालीं संयुक्त संस्थानांचें उपाध्यक्षपद भूषविलें; व विलमॉट तर गुलामगिरी विरोधी योजनेच्या कर्त्यांपैकीं एक. ह्याच्याबद्दल काँग्रेसमध्यें खूप चर्चा चालत असे. लिंकनला आपल्या उंचीचा कधीं पोंचच नव्हता; आणि इलिनॉयसमधून नव्यानें आलेला व गबाळा दिसणारा हा प्रतिनिधि त्या सर्वांत श्रेष्ठ होता; ह्यावर वरीलपैकीं कोणत्याच प्रतिनिधीनें विश्वास ठेवला नसता.

वादग्रस्त असे बरेच विषय ह्या तिसाव्या काँग्रेससमोर होते. ह्यांपैकीं सर्वांत संघर्षपूर्ण व त्रासदायक दोन : एक, मेक्सिकन युद्ध व दुसरा, गुलामगिरीच्या पद्धतीवरून निर्माण झालेला कांहीं गटांतला वाढता तंटा. कांहीं वेळां तर चर्चेत ह्या दोन्ही विषयांची सरमिसळ होत असे.

१८४७ मध्यें लिंकननें काँग्रेसच्या सभागृहांत प्रवेश केला त्या वेळेपावेतों मेक्सिकोशीं चाललेलें युद्ध जवळजवळ संपल्यांत जमा होतें; आणि जरी विजय आमचा झाला होता, तरी युद्धाविषयींच्या कांहीं कटकटी उरल्या होत्या. अशांत अध्यक्ष पोल्क लोकशाहीवादी (डेमॉक्रॅट) होता; त्यामुळें साहजिकच परंपरावादी ( व्हिग ) पक्षांत तो लोकप्रिय नव्हता. काँग्रेसमधल्या ह्या पहिल्याच खेपेला लिंकन तेन समित्यांच्या कामांत व्यग्र होता. ' रक्तपातावरील ठरावां 'चा (स्पॉट रेझोल्यूशन्स) पुरस्कार लिंकननें केला होता. मेक्सिकन युद्धांत रक्ताचा पहिला थेंब मेक्सिकन भूमीवर सांडला होता; त्यामुळें मेक्सिकोशीं झालेल्या अन्याय्य संघर्षांत अमेरिका आक्रमक होती, असा कबुलीजबाब अध्यक्ष पोल्क ह्यांच्याकडून घेणें, हाच ह्या ठरावांचा उद्देश होता. ह्याच एका उपक्रमाविरुद्ध लिंकनला इलिनॉयसच्या वृत्तपत्रांकडूनहि ताकीद मिळाली होती. ह्या मुद्यावर इतिहासांत अजून वाद चालू आहेत. पण युद्ध सुरू झालें तेव्हां मेक्सिकन उद्धटपणाला मान्यता देण्याची लिंकनची किंवा ' सँगॅमो जर्नल 'ची इच्छा नव्हती, हेंहि येथें जातां जातां सांगितलें पाहिजे. आणि आयुष्यांत नेहमींच लिंकननें युद्धाचा तिरस्कार

केला आहे. मेक्सिकन प्रकरणांतील त्याच्या जुळवाजुळवीनें व्हिगपक्षाचें महत्त्व वाढविण्याला इतकी मदत झाली कीं, अध्यक्ष पोल्क व लोकशाहीवादी ह्यांची लोकप्रियता विलक्षण रीतीनें उतारास लागली व पुढील अध्यक्षीय निवडणुकींत व्हिगपक्षाचा उमेदवार निवडून येण्याची शक्यता निर्माण झाली.

रक्तपातावरील ठरावांचा एक तात्कालिक परिणाम असा कीं, काँग्रेस-मधील, स्वतःच्या राज्यांतील व मतदार संघांतील लिंकनच्या लोकप्रियतेला शह देण्याचा प्रयत्न झाला. एबचे बरेच मित्र आणि शेजारी युद्धांत एकतर मारले गेले होते, किंवा जखमी झाले होते. लिंकनच्या हल्ल्याची धार सौम्य करण्याचा शिकस्तीचा प्रयत्न बिली हर्नडननें आपल्या सहकाऱ्यांसह केला. पण लिंकननें आपला युद्धविरोधी, पोल्कविरोधी व डेमॉक्रॅटिक पक्षविरोधी प्रचार जारीनें चालूच ठेवला.

पुन्हा एकदां सिद्ध झालें कीं व्यावहारिक राजकारणाला सर्वस्वी वाहून घेणारा लिंकन नव्हता. कोलंबिया जिल्ह्यांतील गुलामांना हळुहळू मुक्त करावें, म्हणून एक विधेयक लिंकननें तयार केलें. गुलागिरी पद्धतीच्या प्रथेंतील दुष्टता पारंपरिक व अनत्याचारी मार्गांनीं दूर करण्याच्या लिंकनच्या इच्छेचा राष्ट्रीय पुरावा म्हणजे हें विधेयक. त्याच्या ह्या प्रयत्नाला यश मात्र आलें नाहीं.

दुसऱ्या अधिवेशनानंतर पुन्हा एकदां लिंकन स्प्रिंगफील्डला आला. मेरी-सह व मुलांबरोबर तो तेथें पुन्हा सुखांत राहिला. ह्यावेळीं आपली नेमणूक एखाद्या महत्त्वाच्या सार्वजनिक पदावर होईल असें त्याला वाटलें होतें. त्या-प्रमाणें ओरिगॉन प्रदेशाचा कार्यवाह म्हणून त्याची नेमणूक झाली. हें स्थान तसें फारसें गौरवाचें नव्हतें. पण पश्चिमेकडल्या निर्जन प्रदेशांत राहण्याची मेरीची इच्छा नव्हती, ह्या गोष्टीची मदत तो नेमणूक न स्वीकारण्याचा निर्णय घेतांना लिंकनला झाली. ही नेमणूक नाकारल्यामुळें राजकीय क्षेत्रांत कर्तबगारी दाखविण्याची संधि आपण कायमची गमावली, असें लिंकनला वाटलें.

लिंकन निराश मनानें परतला, तो वकिलीचें वैचारिक व अनुभवानें समृद्ध करणारें जीवन कित्येक वर्षें जगण्यासाठीं. इलिनॉयसच्या जंगलालगतचा बारा हजार चौरस मैलांचा प्रदेश आठव्या फिरत्या जिल्हा न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रांत येत होता. ह्या प्रदेशांत दाव्यांनिमित्त एका परगण्याहून दुसऱ्या परगण्यांत, असें फिरतां फिरतां लिंकनला कित्येक आठवडेच नव्हत तर कधीं कधीं कित्येक महिने घराबाहेर काढावे लागत. कधीं बर्फा-वाऱ्याच्या वादळांतून, तर कधीं मुसळधार पावसांतून; कधीं हवामान स्वच्छ असतांना, तर कधीं धुक्यांतून तो न्यायालयाच्या अधिकारकक्षेंतील क्षेत्रमर्यादेंत हिंडत होता.

कधीं कधीं तो घोड्यावरून संथपणें प्रवास करी. बऱ्याच वेळां मात्र करकरणाऱ्या गाडींतून कसाबसा पुढें जात असे; अशा वेळीं पांघरलेली शाल त्याच्या निमुळत्या खांद्यांवरून घसरत असे. कसाहि प्रवास चालो, पुस्तक हें त्याच्या हातांत नेहमींच होतें. १८५० मध्यें केव्हां केव्हां त्यानें आगगाडीनें प्रवास केला. ह्या प्रवासाच्या कालावधींत त्यानें युक्लिडच्या भूमितीच्या पुस्तकांतील बहुतेक भागांत प्रावीण्य मिळविलें. भूमितीच्या अभ्यासानें मनाला शिस्त लावण्यास मदत होते, ह्या विश्वासानें लिंकननें हा अभ्यास केला. कांहीं कविताहि त्यानें वाचल्या व पाठ केल्या.

निरनिराळ्या शहरांत व खेडेगांवांत हें फिरतें न्यायालय भरत असे. ह्या त्या ठिकाणीं लिंकन इतर वकील व न्यायाधीश ह्यांच्यासह मध्यरात्रीपर्यंत गप्पागोष्टी, राजकारणावर वाद व थट्टामस्करी करीत असे. त्या सर्व मंडळींत लिंकन हा जिवंतपणाचा झरा होता. आपला हताशपणा झटकून टाकून तो चटकदार गोष्टी सांगे, विनोदी आख्यायिका सांगे व मनाला प्रफुल्लित करणाऱ्या आठवणीहि सांगत असे. अगदीं सरळ सोप्या पद्धतीनें व हटकून पटणाऱ्या युक्तिवादानें तो आपले दावे मांडीत असे. तो अटीतटीचे जितके दावे हरला होता, त्यापेक्षां कितीतरी अधिक दावे जिंकला होता. तरी सुद्धां सतत तीन महिने तो जवळ जवळ प्रत्येक प्रसंगीं हरला होता.

आपल्या वकिली व्यवसायांत मिळकतीचा उच्चांक लिंकननें ह्यानंतर किती तरी वर्षांनीं गांठला. त्यावेळीं त्याला इलिनॉयसच्या मध्यवर्ती रेल्वेकडून पांच

हजार डॉलर फी म्हणून मिळाली होती. हीच त्यानें घेतलेली सर्वांत अधिक फी. पण ह्यापेक्षां त्याला अधिक समाधान मिळालें होतें तें एका विधवेचा दावा मोफत चालविण्यांत. एका तत्त्वहीन मध्यस्थानें ह्या बाईकडून तिला सरकारकडून मिळणाऱ्या निवृत्तिवेतनापैकीं अर्धी रक्कम लुबाडली होती.

ज्या दाव्यांत फी म्हणून एक पैहि घेण्याचें त्यानें नाकारलें असा आणखी एक दावा आहे. खुनाच्या आरोपावरून डफ आर्मस्ट्रॉंगची चौकशी झाली तेव्हांचा हा दावा होय. हा तरुण माणूस जॅक व हन्नाल आर्मस्ट्रॉंगचा मुलगा होय. लिंकन न्यू सालेमला होता, तेव्हांपासून जॅक आर्मस्ट्रॉंगची व त्याची मैत्री होती. साक्षीदारांनीं अगदीं शपथेवर सांगितलें होतें कीं, एका स्वच्छ चांदण्यारात्रीं डफनें जेम्स मेट्झ्कवर गोफणीचा मारा केला होता हें त्यांनीं प्रत्यक्ष पाहिलें होतें. अशी शपथ घेणारा मुख्य साक्षीदार घरचा रंगारी ॲलेन हा होता.

अशा प्रसंगीं लिंकन एखाद्या हुशार वकिलाहून अधिक बुद्धिचापल्य दाखवीत असे. ह्यावेळीं त्याची तीक्ष्ण बुद्धि काम देई.

ॲलेनची साक्ष बनावट होती असें लिंकनला वाटत होतें. त्याचें सर्व म्हणणें ऐकून घेतल्यानंतर पंचांकडे वळून लिंकन म्हणाला – ' ॲलेननें सांगितलेली माहिती खोटी कशी आहे तें मी आतां तुम्हांला दाखवून देतों. आर्मस्ट्रॉंग मेट्झ्करवर गोफणीचा मारा करतांना ॲलेननें मुळींच पाहिलेलं नाहीं. पौर्णिमेच्या स्वच्छ चांदण्यांत त्यानें हा हल्ला पाहिलेलाच नाहीं. कारण त्यादिवशीं रात्रीं आकाशांत चंद्रच नव्हता–'

लिंकननें पंचांग सादर करून आपला मुद्दा सर्व संबंधितांना समाधान-कारकरीत्या पटवून दिला. तो तंटा झाला त्या दिवशीं आकाशांत चंद्र प्रकाशत नव्हता; तेव्हां ॲलेनला स्वच्छ चांदण्यांत तो प्रकार पाहतां येणें शक्यच नव्हतें.

दाव्याचा समारोप करतांना आपल्या अशिलाचें निरपराधीपण सिद्ध करणारा सर्व पुरावा लिंकननें साक्षेपानें मांडला व अखेरच्या त्याच्या अभिप्रायानें तर त्या ठिकाणीं हजर असलेल्या सगळ्यांचींच हृदयें भारावून गेलीं. तो भाग पुढीलप्रमाणें होता.

अश्रु ढाळीत असलेल्या हन्नाह आर्मस्ट्रॉंगकडे – डफच्या आईकडे बोट दाखवून लिंकन म्हणाला, ‘सभ्यगृहस्थहो, त्या बाईच्या कल्याणासाठीं मी तुमच्यासमोर उभा आहें. ह्याबद्दल मी कांहींसुद्धां फी घेणार नाहीं. माझ्या-जवळ पैसे नव्हते, तेव्हां तिनें माझे मळके कपडे धुतले आहेत.’ न्यू सालेमला असतांनाची हकिकत येथें लिंकननें सांगितली. लिंकन कफल्लक असतांनाहि डफ आर्मस्ट्रॉंगच्या आईवडिलांनीं त्याचें कसें भरघोंस आदरातिथ्य केलें होतें, तें त्यानें सांगितलें. अन्न आणि निवारा ह्यांची गरज असतांना आपणास ह्यांचाच आधार कसा होता तें लिंकननें सांगितलें. आणि नंतर लिंकन म्हणाला, ‘अशा आईबापांच्या पोटीं जन्म घेणारा मुलगा खून करणारा निपजेल ह्यावर आपला विश्वासच बसू शकत नाहीं.’

स्वतः लिंकनप्रमाणें हन्नाह आर्मस्ट्रॉंगच्याहि भावना उचंबळून आल्या होत्या. पंचांनीं आरोपी निर्दोप असल्याचें जाहीर केलें. अशाप्रकारें डफ निर्दोष असल्याच्या लिंकनच्या दृढ विश्वासावर शिक्कामोर्तब झालें. आरोपी निर्दोष असल्याचा निकाल जेव्हां जाहीर झाला, तेव्हां लिंकननें परमेश्वराची प्रार्थना केली कीं, झाल्या प्रकारापासून त्याला आणि इतर सर्वांनाहि कांहीं धडा शिकायला मिळो.

पण १८५० च्या सुरुवातीला न्यायालयाबरोबर उन्हापावसांतून व धुक्यांतून फिरतांना पुढें कांहीं दिवस हें खूनप्रकरण त्याला विसरतां आलें नाहीं.

लिंकनची दृष्टि शोधक होती; तो विचारमग्न असे; पोषाखाबद्दल निष्काळजी. त्याची विजार इतकी तोकडी असे कीं ती क्वचित् बुटांपर्यंत पोहोंचे, आणि हॉटेलांत किंवा खानावळींत रात्रीच्यावेळीं पिवळ्या रंगाचा तोकडा लोकरी झगा जेव्हां तो घाली, तेव्हां तर तो गबाळ्यासारखा दिसे; अशा स्थितींतच त्याचा अभ्यास, विचार व त्याचें मनन चालू होतें. ह्यांतूनच पुढें लवकरच अविस्मरणीय असा राजकारणी पुरुष व मानवतावादी निर्माण झाला.

# ११

## भाऊबंदकी

" राजकारणांतून माझं लक्ष उडत चाललं होतं, पण इतक्यांत ' मिसुरीची तडजोड ' रद्द करण्यांत आली. त्यामुळें मला पुन्हा चेव आला. "

—ए. लिंकन

दक्षिणेकडील संस्थानांत गुलामगिरीची प्रथा चालू होती व उत्तरेकडील संस्थानांत गुलामगिरीला बंदी होती. तेव्हां ह्या दोन बाजूच्या संस्थानांत यादवी युद्धाच्या अगोदर चाळीस वर्षांआधींपासूनच विरोधभाव धुमसत होता. १८२० मध्यें संघ-राज्यांत एकूण बावीस संस्थानें सामील होतीं. त्यांपैकीं अकरा संस्थानांत गुलामगिरी-पद्धत चालू होती व अकरा संस्थानांत ती बंद झालेली होती. हा समतोल कायम राखण्यासाठीं त्या सालीं तडजोड करण्यांत आली होती. गुलामगिरीपासून मुक्त असें संस्थान म्हणून मेन संस्थानाला संघराज्यांत प्रवेश दिला होता व गुलामगिरीची प्रथा ज्यांत चालू आहे, असें संस्थान म्हणून मिसुरीला सामील करून घेण्यांत आलें होतें.

पण ह्या सुप्रसिद्ध अशा ' मिसुरी तडजोडी ' त एक महत्त्वाची गोष्ट व ' पवित्र शपथ ' होती. ती अशी कीं, राज्य म्हणून त्यावेळपर्यंत विकसित न झालेल्या लुइसियाना परचेसमध्यें व ३६ रेखांश व ३० अक्षांश ह्यापलीकडच्या उत्तरेंतील भूमींत गुलामगिरीच्या प्रथेला कायमची मूठमाती द्यावयाची.

१८५४ च्या जानेवारीत सिनेटर स्टीफन ए. डग्लस ह्यानें सिनेटमध्यें एक विधेयक आणलें. ह्या विधेयकानें सबंध राष्ट्रावर आघात केला व उत्तर आणि दक्षिण ह्यांच्यांतील दुजाभाव वाढविला. कॅन्सास-नेब्रास्का कायद्यानें

' मिसुरीची तडजोड ' रद्द करण्यांत आली; व गुलामगिरीच्या पद्धतीवर किती प्रमाणांत नियंत्रण ठेवावें हा कटु प्रश्न पुन्हा उपस्थित झाला.

डग्लसच्या सूचनेवर काँग्रेसच्या दोन्ही गृहांत कित्येक महिने वादंग माजलें. पण अखेर डग्लसची सूचना मंजूर झाली. ह्या सूचनेप्रमाणें कॅन्सास व नेब्रास्का हीं संस्थानें संघराज्यांत सामील होतांना संस्थानांत गुलामगिरी पद्धत चालू ठेवावी कीं नाहींशी करावी, हें त्या संथानांनींच ठरवावें असें ठरलें. हीं दोन्हीं संस्थानें वरील ' मिसुरी तडजोडींत ' मान्य झालेल्या रेषेच्या उत्तरेला होतीं. गुलामगिरीची पद्धत वाढीस लागणें धोक्याचें आहे, असें लिंकनसारख्यांना वाटत होतें. त्यांना असें वाटलें कीं, संबंधित राज्यांत स्वातंत्र्यच असेल, ह्या ' पवित्र शपथे 'चा नव्या कायद्यानें भंग केला आहे.

कॅन्सासमध्यें तर गुलामगिरीचे पुरस्कर्ते व गुलामगिरीचे विरोधक ह्यांच्यांत ताबडतोब संघर्षाला आरंभ झाला. गुलामगिरी हवी कीं नको, ह्याची चांचणी घेण्यासाठीं जेथें जेथें म्हणून निवडणूक असेल, तेथें दोन्ही पक्ष परस्परांवर मात करण्यासाठीं धांवून जाऊं लागले. अशा वेळीं ते घोड्यावरून प्रवास करीत व त्यांच्या सोबत मालाच्या वाघिणी असत. त्यांत बंदुकीबरोबर बारा इंच लांब पात्यांचे खंजीर भरलेले असत.

लुटालूट, गोळीबार, आगी, ह्यांनीं कॅन्सास ' रक्तभूमि ' बनण्याआधींच नव्या कायद्यावर सबंध राष्ट्रांत शाब्दिक युद्ध सुरू झालें होतें. इतक्या मूलभूत महत्त्वाचा हा लढा केवळ दुरून पाहत बसणें लिंकनला शक्यच नव्हतें. त्यानें आपली वाणी आणि आपली बुद्धि ह्या वादांत कामीं लावणें साहजिकच होतें. ह्या संघर्षांत आपल्या जुन्या समजुतदार व्हिगपक्षांत दुफळी माजली होती व तो पक्ष नष्ट झाला होता, असें लिंकनला दिसून आलें. आणि गुलामगिरीच्या वाढीला उघड उघड विरोध करणाऱ्या नव्यानेंच स्थापन झालेल्या ' रिपब्लिकन ' पक्षाला उत्तरोत्तर अधिक अनुयायी मिळत आहेत इकडे त्याचें लक्ष गेलें.

ह्या क्रांतिकारक प्रजासत्ताकवाद्यांना लिंकन तसा सावकाशीनें जाऊन मिळाला असला, तरी कॅन्सास-नेब्रास्का कायद्यावर आघात करण्याबाबत

त्याला सबुरी नव्हती. ताबडतोब त्यानें संयुक्त संस्थानांच्या सीनेटवर निवडून येण्याचा प्रयत्न केला. पण ८ फेब्रुवारी १८५५ रोजीं इलिनॉयसच्या विधानसभेंत त्याचा पराभव झाला. गुलामगिरीच्या वाढत्या संकटाला परिणामकारकरीत्या तोंड द्यावयाचें असेल, तर रिपब्लिकन पक्षाला मिळण्यावांचून गत्यंतर नव्हतें, हें लिंकनला लगेच पुढील वर्षीं कळून चुकलें. राष्ट्राला उध्वस्त करणाऱ्या प्रश्नावर २९ मे १८५६ रोजीं व तत्पूर्वीं लिंकननें जी भूमिका घेतली होती, त्या भूमिकेबद्दल कुशंकेला मुळींच जागा नव्हती. २९ मे हा इलिनॉयसच्या रिपब्लिकन पक्षाचा अधिकृत स्थापना-दिन होता. त्या दिवशीं लिंकननें ब्लूमिंग्टन येथें प्रभावी भाषण केलें कीं, कसलें तरी गारूड झाल्यासारखे सगळे श्रोते खरोखरीच भारावून गेले. एकालाहि–वृत्तपत्राच्या एखाद्या वार्ताहरालाहि ह्या भाषणाचीं टिपणें घेण्याचें भान राहिलें नाहीं. त्यामुळें अद्भुतरीत्या भावना उचंबळून टाकणारें तें भाषण पुढच्या पिढीला लाभलें नाहीं.

ह्या भाषणाच्या वेळीं बिली हर्नडन तर समाधी लागल्यासारखा बसला होता. नंतर ह्या भाषणासंबंधीं त्यानें पुढीलप्रमाणें लिहिलें आहे:—

लिंकनचीं महत्त्वाचीं किंवा श्रेष्ठ दर्जाचीं सगळींच भाषणें मीं ऐकलीं आहेत, निदान वाचलीं आहेत. पण ब्लूमिंग्टनमध्यें त्यानें दिलेलें भाषण त्याच्या आयुष्यांतलें भव्य भाषण होतें, असें मला वाटतें. ह्यापूर्वीं गुलामगिरीवरील धोरण कसें असावें – राजकारणी पुरुषाचें धोरण कसें असावें, ह्यासंबंधीं साधा सोपा युक्तिवाद तो करीत होता. एक अनंत काळपर्यंतचा मूलभूत हक्क म्हणून ह्या प्रश्नाकडे त्यानें पूर्वीं कधींच पाहिलें नव्हतें; पण ह्या वेळीं त्यानें नवी दीक्षा घेतली होती, त्याचा पुनर्जन्म झाला होता; नव्यानेंच एखादा धर्म स्वीकारलेल्या माणसाचा चेव त्याला आला होता; धुमसलेल्या ज्योतीनें पेट घेतला होता; लिंकनच्या बाबतींत अघटित असें घडलें होतें — त्याच उत्साह ओसंडू लागला होता, अंतःस्फूर्तीचें तेज त्याच्या डोळ्यांत चमकूं लागलें होतें.

ह्या काळांत हर्नडन नेहमीं लिंकनच्या भाषणाचीं टिपणें घेत असे, पण ह्यावेळीं भाषण सुरू झाल्यानंतर थोड्याच वेळांत त्यानें लेखणी व कागद बाजूला सारले व त्या 'स्फूर्तिक्षणाचें जीवनच प्रत्यक्ष तो जगला.' लिंकनच्या ह्या श्रेष्ठ भाषणांतील ज्वलंतपणा, उत्साह आणि ओज ह्यांनीं इतरांप्रमाणें हर्नडनवरहि गारूड केलें. त्वेषाच्या भरांत त्याचे शब्द कठोर, असह्य पिळवटलेले व कणखर असले तरी त्या शब्दांच्या पंखांवरून रांगडें सत्य गतिमय झालें होतें. लिंकन आपल्या शत्रूला कुस्तीगीराच्या पेंचांनीं घट्ट पकडून ठेवीत होता. हर्नडनच्याच शब्दांत सांगावयाचें तर—'एरव्हीं लिंकनची उंची सहा फूट चार इंच असली, तरी त्या दिवशीं ब्लूमिंग्टनला त्याला सात फूट उंची लाभली होती; आणि त्या उंचीवरून तो उत्स्फुरित होऊन बोलत होता.

ह्या भाषणाचा अधिकृत वृत्तांत नसला, तरी इलिनॉयसमधील रिपब्लिकनच्या सभेवर ह्या भाषणानें केलेला परिणाम वाऱ्याच्या गतीनें पूर्वेकडे वाहत गेला असला पाहिजे. ह्यानंतर तीनच आठवड्यांनीं फिलाडेल्फिया येथें रिपब्लिकनांची राष्ट्रीय परिषद भरली. अध्यक्षपदाच्या निवडणुकींत आपला कोणता उमेदवार उभा करावा, ह्याची निवड करण्यासाठीं सगळे प्रतिनिधि येथें जमले होते. पहिल्या चांचणींत उपाध्यक्षपदाच्या उमेदवारीसाठीं लिंकनला एकशें दहा मतें मिळालीं. अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठीं जॉन सी. फ्रेमॉंट ह्यांची निवड झाली होती व अशाप्रकारें फ्रेमॉंटचा सहकारी म्हणून काम करण्याची उघड संधि लिंकनला मिळत होती. पुढील मतदानांत लिंकनचें नांव वगळलें गेलें व न्यू जेर्सीमधील विल्यम एल्. डेटॉन ह्याची निवड झाली.

त्याला एकशें दहा मतें मिळाल्याचें लिंकनला कोणीं तरी सांगितलें तेव्हां त्याला तें खरेंच वाटलें नाहीं. कांहींसा चकित होऊन तो म्हणाला, "हा लिंकन मी नव्हे; मॅसॅच्युसेट्समध्यें लिंकन म्हणून एक थोर माणूस आहे; त्याला मिळालेलीं हीं मतें असतील."

रिपब्लिकनांच्या त्या पहिल्या दुबळ्या पाठिंब्यावर उपाध्यक्षपदाच्या निवडणुकींतील उमेदवार म्हणून लिंकनची निवड झाली नाहीं हें एक सुदैवच

होतें. पुढें घडलेला इतिहास पाहतां ही गोष्ट अधिकच भाग्याची वाटते. जेम्स बुचॅनन ह्या दुबळ्या इच्छाशक्तीच्या डेमॉक्रॅटिक पक्षाच्या उमेदवारासमोर फ्रेमाँटचा पराभव झाला. 'व्हाइट हाऊस'मध्यें फ्रेमाँटनें प्रवेश केला, तेव्हांच दक्षिणेचे प्रतिनिधि सभात्यागाची धमकी देत होते. तसें झालें असतें तर राष्ट्रावरचें तें एक घोर संकट ठरलें असतें. कारण ह्या सभात्यागाला खंबीरपणें तोंड देण्याइतके उत्तरेंतील प्रतिनिधि १८५६ मध्यें संघटित नव्हते.

बुचॅननने अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर दोनच दिवसांनीं संयुक्त संस्थानांच्या सर्वोच्च न्यायालयानें 'ड्रेड स्कॉट' निर्णय असा जाहीर केला कीं, 'गोऱ्या लोकांच्या मानानें निग्रो हे अजूनपर्यंत कमी दर्जाचे आहेत; कायद्याच्या दृष्टीनें त्यांना नागरिक म्हणून ओळखतां येणार नाहीं.' हा निर्णय मुख्य न्यायाधीश रॉजर बी. टॅनी ह्यांनीं दिला होता. ह्या निर्णयामुळें दोन्ही पक्षांमधील शीत युद्धांत ऊब निर्माण झाली, व उत्तरेंतील गुलामगिरीविरोधी गट अधिकच भडकला.

१८५८ मध्यें लिंकननें सीनेटचें सभासदत्व मिळविण्याचा प्रयत्न केला. चार वर्षांपूर्वी त्यानें केलेल्या प्रयत्नांपेक्षां हा प्रयत्न अधिक मूलगामी होता. सीनेटर डग्लसचा दुसऱ्यांदाचा अधिकारकाल संपत आला होता. हाच लिंकनचा आतां प्रतिस्पर्धि होता. डग्लससारख्या सुप्रसिद्ध आणि बलाढ्य प्रतिस्पर्ध्याशीं लिंकन सामना देत होता, म्हणून ह्या लढतीला महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें.

१६ जून १८५८ रोजीं स्प्रिंगफील्ड येथें रिपब्लिकन पक्षाच्या राज्य परिषदेंत लिंकननें आपली उमेदवारी जाहीर केली. त्याचीं इतर सगळीं भाषणें कालाच्या वृत्तांतपटावरून पुसलीं गेलीं, तरी हें भाषण संस्मरणीय राहील असें लिंकनला वाटत होतें. 'आपसांतील दुफळी' वरील भाषण म्हणून गाजलेलें हें भाषण. तें इतकें निर्भय आणि सडेतोड होतें कीं हर्नडनशिवाय इतर सर्व मित्रांनीं विनविलें कीं, 'लिंकननें तें भाषण करूं नये.' हर्नडनची भविष्यवाणी मात्र असें उद्गारली कीं, 'लिंकन, आहे तसेंच हें भाषण तूं कर; ह्या भाषणामुळेंच तूं संयुक्त संस्थानांचा अध्यक्ष होशील.'

2352 दि: नों. दि: 2.3.75

गंभीर घंटेप्रमाणें निनादत इषारा देणारा त्या भाषणांतील कांहीं भाग पुढीलप्रमाणें होता–

'आपसांत दुभंगलेलं सभागृह खंबीरपणें उभं राहूं शकत नाहीं. अर्धवट गुलामगिरी व अर्धवट स्वातंत्र्य, असली स्थिति फार काळ हें सरकार राखूं शकणार नाहीं, असा मला विश्वास वाटतो. संघराज्य मोडावं असं मला वाटत नाहीं – सभागृह कोलमडून पडावं असंहि मला वाटत नाहीं – पण मला इतकं मात्र वाटतं कीं सभागृहांतली दुफळी संपुष्टांत यावी.'

ह्या भाषणानें उत्तरेंत अनेकांना धीर दिला, तर दक्षिणेंत अनेकांचा राग उसळला. लिंकनला यादवी युद्धाची ठिणगी टाकायची आहे, असें दाखविण्याचा प्रयत्न करतांना स्टीफन ए. डग्लसनें लवकरच ह्या भाषणाचा विकृत उपयोग केला. राजकीय वादांत क्लृप्तीचा उपयोग करण्यांत डग्लस हुशार होता. ह्या नाजुक प्रश्नांत लिंकनच्या भूमिकेबद्दल लोकांचें मत कलुषित करणें हाच त्याचा हेतु होता. आणि आपल्या उंच व लांब पल्ल्याच्या प्रतिस्पर्ध्याचा पराभव करावयाचा असेल तर असला दारूगोळा आपल्या संग्रही असला पाहिजे, ही चांगली जाणीव लिंकनला होती. आपल्या प्रतिस्पर्ध्याच्या सामर्थ्याची उपेक्षा त्यानें केली नाहीं. सीनेटच्या उमेदवारीसाठीं लिंकननें आपला अर्ज सादर केला आहे, हें डग्लसला प्रथम कळलें तेव्हां तो म्हणाला होता, 'स्प्रिंगफील्डच्या आसपास असणाऱ्या सर्व व्हिगपक्षीयांत एब लिंकन हा एकटाच सर्वांत लायक व अत्यंत प्रामाणिक आहे.'

आपली पुन्हा निवड व्हावी म्हणून डग्लसनें इलिनॉयसचें राज्य भारून टाकण्यासाठीं जो दौरा काढला तो भव्य होता. श्रीमंत, वजनदार व ऐटबाज असा हा 'छोटा सिंह' सामान्यतः नियमाप्रमाणें खाजगी गाडींतून शहरोशहरीं हिंडत होता. ॲडेली कट्स डग्लस ही त्याची दुसरेपणची बायको त्याच्या सोबत होती. ती सुंदर व मिळूनमिसळून वागणारी होती. तिचें वागणें रेखीव होतें. तिचे कपडे हा राजधानींतील चर्चेचा विषय होता. मग ग्रामीण अवस्थेंतील इलिनॉयसची काय कथा? डग्लसच्या सोबत एक उघडी गाडी

होती. त्या गाडींत एक चकचकीत पितळी तोफ ठेवलेली होती. तिच्या संरक्षणासाठीं गणवेषधारी लोक होते. डग्लसची गाडी कोणत्याहि शहरीं आली, म्हणजे ही तोफ डागली जाई व अशाप्रकारें थोर दर्जाचा स्टीफन ए. डग्लस भाषण करण्यासाठीं येत आहे, असें जाहीर केलें जात होतें. उलट, उतारूंनीं भरलेल्या एखाद्या अंधाऱ्या डब्यांतून एब लिंकन फिरत होता. आपल्या प्रतिस्पर्ध्याच्या ह्या नजरेंत भरणाऱ्या देखाव्याला तोडीस तोड उभी करायला त्याचें तितकें आर्थिक बळहि नव्हतें व तशी त्याची इच्छाहि नव्हती. लोकांना आवाहन करण्याच्या प्रत्येक उमेदवाराच्या पद्धतीचा कांहींना कांहीं फायदा असतोच. पण लिंकनचा अभिप्राय सांगतात त्याप्रमाणें– 'तुम्हीं सर्वांना कांहीं काळ फसवूं शकाल, आणि कांहीं लोकांना सदासर्वकाळ फसवूं शकाल; पण सर्वांनाच सदासर्वकाळ फसवणें तुम्हांला जमणार नाहीं.'

सुरवाती सुरुवातीला लिंकन सीनेटर डग्लसच्या मागोमाग एखाद्या शहरीं जाई व डग्लसचें म्हणणें खोडून काढी किंवा स्वतंत्रपणें व्याख्यानें देत असे. पण नंतर एकाच व्यासपीठावरून दोघांनींहि बोलणें अधिक सोयीचें व परिणामकारक असें त्याला वाटलें. त्यामुळें त्यानें अशीं व्याख्यानें देण्याचें डग्लसला आव्हान दिलें. अशा व्याख्यानांतून डग्लसचा कांहींच फायदा नव्हता, उलट तोटाच अधिक होता. पण तरीहि डग्लसनें हें आव्हान स्वीकारलें.

अशाप्रकारें, इलिनॉयसमधल्या ओट्टावा, फ्रीपोर्ट, जोन्सबरो, आल्संटन, गेल्सबर्ग, क्वीन्सी व ॲल्टन ह्या सात शहरीं लिंकन व डग्लस ह्यांच्यांतले वादप्रसंग झाले. आमेरिकेच्या इतिहासाला विशिष्ट वळण लावण्यांत ह्या वादप्रसंगांचें स्थान महत्त्वपूर्ण आहे. हे वादप्रसंग ऐकण्यासाठीं लोकांची गर्दी होई. कोणी बोटींतून येत, कोणी बैलगाडींतून, कोणी घोड्यावरून कोणी घोडागाडींतून, कोणी खास सफरीच्या गाडींतून, तर कोणी पायीं. ह्या लोकांनीं विजेरीच्या मिरवणुका पाहिल्या, गणवेषांतल्या वादकांचें वादन ऐकलें, झेंडे, सजावटी व घोषणा ह्यांनीं त्यांचे डोळे विस्फारले, त्यांनीं भरपूर दारू घेतली व अल्पोपाहारहि. ओट्टावोत त्यांनीं उन्हाचा

क्रा. क्र. ८८३८

कडाका सहन केला, फ्रीपोर्टमध्यें पावसाचा शिडकाव अंगावर घेतला, आणि गेल्सबर्गमध्यें बोंचऱ्या थंड वाऱ्यांना तोंड दिलें. ह्या वादप्रसंगांत ते गुंग झाले, धुंद झाले. ह्या प्रसंगीं कधीं त्यांची करमणूक झाली, कधीं ते दुखावले गेले तर कधीं सुखावले. ते हंसले, खिदळले व वक्त्यांना त्यांनीं उत्तेजनहि दिलें. बर्नमहि त्यांना ह्यापेक्षां चांगला देखावा दाखवूं शकला नसता.

डग्लस नीटनेटका होता. निळ्या किंवा पांढऱ्या रंगाचा कोट, पिंजारलेले दिसणाऱ्या कापडाचे शर्ट, लेंवलचक जाकीट, व्यवस्थित शिवलेली विजार आणि चांगले चकचकीत बूट, ह्या पोषाखांत डग्लस नेहमीं असे. तो एक प्रभावी, आक्रमक, आत्मविश्वासाचा व अस्खलित वादपटु होता. त्याची वाणी कोल्ह्यासारखी फसवी आणि ईलमाशासारखी चकवी होती. डग्लसपेक्षां लिंकन पुरा बारा इंच उंच होता. धुळीनें माखलेला काळा कोट तो अंगांत घालीत असे. त्याचे हात जेमतेम मनगटापर्यंत येत. त्याचा सदरा नेहमींच चुरगळलेला असे व त्याची नेकटाय नीट कधींच बांधलेली नसे. त्याच्या सोबत एक जुनी करड्या रंगाची शाल होती व फुगीर आकाराची छत्री. पण ह्या दोघांपैकीं कोणीहि बोलायला लागला कीं, व्यासपीठाच्या भोंवतीं गर्दी करणारे ह्या वक्त्यांचें शारीरिक अस्तित्व विसरूनच जात. ह्या युगांतले हे दोन थोर वादपटु आपल्या प्रसन्नमनाच्या पुरेपूर सामर्थ्याची पकड आपल्या विषयावर बसवूं लागले म्हणजे लोकांना आगीसारखी उष्णता व शरीर कापणारी थंडी, ह्यांचें भानच उरत नसे.

डग्लस कोल्ह्यासारखा होता, तर लिंकन त्या कोल्ह्याला पकडणाऱ्या पारध्यासारखा होता. फ्रीपोर्टला अतिशय कौशल्यानें एक कल्पक प्रश्न लिंकननें टाकला. राज्याला घटनाच नसेल, तर एखाद्या राज्यांतील लोक कायदेशीर-रीत्या गुलामगिरीचा अंत कसा काय करणार ? असा लिंकनचा प्रश्न होता. ह्या प्रश्नाला डग्लस काय उत्तर देणार, हें लिंकन समजून होता; आणि ह्या उत्तरामुळेंच ह्या निवडणुकींत नाहीं, तरी १८६० मधल्या अधिक महत्त्वाच्या निवडणुकींत डग्लसचा पराभव होण्यासारखी परिस्थिति अखेर निर्माण होईल, असा त्याचा अर्थपूर्ण कयास होता.

डग्लसनें सहजगत्या उत्तर दिलें, "ज्या प्रदेशांतील लोकांना गुलामगिरी नष्ट करायची असेल त्यांनीं त्या राज्य संस्थेची मुर्वत न ठेवतां तसे कायदे मंजूर करून घ्यावेत." दिसायला चलाखीनें हा मुद्दा लिंकनवर असा उलटवलेला पाहून श्रोते आनंदानें बेहोष झाले. पण बुद्धिमत्तेची एक महत्त्वाची लढत आपण जिंकली आहे, हें लिंकन समजून चुकला. 'फ्रीपोर्टचा सिद्धान्त' म्हणून हें सुप्रसिद्ध उत्तर सगळीकडे पसरलें. ह्यामुळें दक्षिणेकडील बरेच डेमॉक्रॅट उसळले, व डग्लसला राजकीय जीवनांतल्या एकतृतीयांश पाठिंब्याला मुकावें लागलें. अखेर डेमॉक्रॅटिक पक्षांत ह्यामुळें दुफळी झाली व १८६० मधील रिपब्लिकन पक्षाचा विजय जवळ जवळ निश्चित झाला.

सात शहरांत अशा सात सभा झाल्या. ह्या प्रत्येक सभेचा वृत्तान्त वर्तमानपत्रांच्या वार्ताहरांनीं लघुलिपींत शब्दशः लिहून घेतला. त्यामुळें ह्या वादांतील प्रत्येक शब्द त्या त्या वादसभेंतील उत्सुक श्रोत्यांच्याच कानी गेला असें नव्हे, तर संयुक्त संस्थानांत सर्वत्र हा प्रत्येक शब्द पोहोंचला. तात्काळ लिंकनला प्रसिद्धि मिळाली व राष्ट्रीय राजकारणांत त्याच्या शब्दाची दखल घ्यावी लागेल इतकें सामर्थ्य त्याच्या पाठीशीं उभें झालें.

सभेंत स्वतःची शक्ति पणाला लावून झाल्यानंतर हॉटेलमधील आपल्या खोलींत लिंकन आला कीं, नेकटाय सोडून ठेवल्यानंतर व पायांतले बूट काढून झाल्यानंतर तो कांहीं वेगळ्याच मनोवृत्तींत असे. स्वतः एकटाच तो विचार करीत बसे. डेव्हिड आर्. लॉक हा विनोदी लेखक पेट्रोलियम व्ही. नॅस्बी ह्या त्याच्या टोपण नांवानेंच अधिक प्रसिद्ध होता. क्वीन्सी शहरांत असतांना एक दिवस संध्याकाळीं लिंकन असाच विश्रांति घेत असतांना नॅस्बीचें लिंकनशीं कांहीं बोलणें झालें. लिंकनबाबत क्वीन्सीनें असें म्हटलें आहे कीं, "ह्याच्यापेक्षां अधिक विचारमग्न माणूस मीं पाहिला नाहीं; ह्याच्यापेक्षां सुप्रतिष्ठित माणूसहि मीं पाहिला नाहीं आणि ह्याच्याइतका दुःखीकष्टी माणूसहि मीं पाहिला नाहीं."

लिंकननें लॉकला सांगितलें कीं, लोकमत त्याच्या बाजूनें राहील असें त्याला वाटत होतें. पण विधानसभेंतील निवडणुकींत डग्लसचा पराभव

होईल अशी त्याची अपेक्षा नव्हती. ( ह्या दिवसांत सर्व सीनेटरांची निवड हीच सभा करीत होती. ) मतदार संघांची योजनाच अशी करण्यांत आली होती कीं, त्याचे विरोधक डेमॉक्रॅट ह्यांना अयोग्य फायदा मिळावा. ही गोष्ट लिंकननें लॉकला स्पष्ट करून सांगितली.

लिंकनची भविष्यवाणी पुन्हा एकदां खरी ठरली. पावसाळ्यांत २ नोव्हेंबर १८५८ रोजीं ही निवडणूक झाली. जनतेचीं १२५,२७५ मतें लिंकनला मिळालीं, तर डग्लसला १२१,०९०. पण सीनेटरांची निवड करण्यासाठीं विधानसभेची बैठक झाली, तेव्हां ५४ सभासदांनीं डग्लसला मत दिलें व लिंकनला फक्त ४६ जणांनीं.

ह्या पराभवासंबंधीं आपणास काय वाटतें, असें कोणीतरी लिंकनला विचारलें. तेव्हां त्यानें एका मुलाची गोष्ट सांगितली. तो अनवाणी फिरत होता, तेव्हां त्याचा पाय कशाला तरी अडकून दुखवला. त्याला विचारलें 'कसं काय ? ' तर त्यानें उत्तर दिलें, 'दुखलं तर इतकं आहे की हंसतां येत नाहीं; आणि रडावं तर आपण तितके लहान नाहीं.'

लिंकनचा पराभव झाला तरी लिंकननें देशांतील नागरिकांच्या मनांत अविस्मरणीय स्थान मिळविलें होतें. खेदाची गोष्ट म्हणजे १८५८ मध्यें सबंध वर्षांत त्यानें आपल्या व्यवसायाकडे दुर्लक्ष केलें होतें. ह्या पराभवानंतर दीड वर्ष त्यानें आपली वकिली सांभाळण्यांत खूप श्रम घेतले. तो ह्या काळांतहि भाषणें करीत असे. पण तीं नेहमींच राजकीय नसत. अध्यक्ष-पदासाठीं त्याचें नांव घेतलें जात होतें. आपण इतक्या थोर सन्मानाच्या जागीं जाऊं, अशा स्वप्नाची सुद्धां कल्पना करायला तो राजी नव्हता. त्याला उत्साहानें पाठिंबा देणाऱ्या एका वृत्तपत्रकाराला त्यानें उत्तर दिलें होतें कीं, 'अगदीं मनापासून सांगायचं तर अध्यक्षपदाला मी लायक नाहीं असं मला वाटतं.'

पण १८५९ च्या हिवाळ्यांत ह्या विषयावरील त्याचे विचार हळुहळू बदलूं लागले. २९ एप्रिल १८६० रोजीं लीमन ट्रम्बलला लिहिलेल्या पत्रांत

लिंकननें लिहिलें आहे कीं, ' अपेक्षित राजकीय सन्मानाच्या फळाची चव माझ्या तोंडाला थोडीशी आहे.' पण हें पत्र दुसऱ्या कोणालाहि दाखवूं नकोस, असें लिंकननें ट्रम्बलला लिहिलें होतें.

लिंकनमध्यें हा जो बदल झाला, त्याला दोन कारणें घडलीं. न्यूयॉर्क शहरांतील कूपर युनियनच्या लिंकनच्या एका महत्त्वाच्या भाषणाला लोकांनीं फार चांगली साथ दिली. सहजगत्या न्यू इंग्लंडमध्यें त्यानें जो दौरा काढला, त्यावेळीं सुद्धां लोकांनीं त्याचें फार चांगलें स्वागत केलें. ह्याचा बराच परिणाम लिंकनच्या मनावर झाला. अध्यक्षपदासाठीं रिपब्लिकन पक्षाचे आणखी कोण उमेदवार असूं शकतील, ह्याचाहि अंदाज लिंकन काळजीपूर्वक घेत होता; तसेंच ह्यांपैकीं कोणाच्या मंजुरीला कोणत्या महत्त्वाच्या अडचणी येतील हेंहि त्याला दिसत होतें हें सगळें पाहत असतांना न्यूयॉर्कचा विल्यम एच्. स्यूवर्ड, ओहिओचा सॅल्मॉन पी. चेस, पेन्सिल्व्हानियाचा सायमन कॅमेरॉन, आणि ओहिओंतला संयुक्त संस्थानांच्या सर्वोच्च न्यायालयाचा एक न्यायाशीध जॉन मॅक्लीन व मिसुरीचा एडवर्ड बेट्स, ह्या व्यक्ति लिंकनच्या डोळ्यांसमोर येत होत्या. ह्यांपैकीं विल्यम एच्. स्यूवर्ड सर्वांचा लाडका. पण त्याच्यासह सर्वांनाच एक तर उत्तरेकडील कांहीं महत्त्वाच्या प्रदेशांतून पाठिंबा नव्हता, किंवा कांही क्रांतिकारक विधानांनीं अथवा अव्यवहार्य अशा सडेतोडपणानें त्यांनीं रिपब्लिकन पक्षाला मत देऊं शकतील, अशा मतदारांना नाखूष केलें होतें.

गुलामगिरीविषयींच्या लिंकनच्या नेमस्त भूमिकेला लोकांचा अधिक पाठिंबा होता. डग्लस व इतर कांहीं नेते, ह्यांनीं केलेले निराधार आरोप लक्षांत घेतले, तरी गुलामगिरीच्या प्रश्नावरून संघ-राज्यांतून फुटून निघावें, असें लिंकनला वाटत नव्हतें; आणि लिंकन खरोखरीच गुलामगिरीच्या पद्धतीचा 'नायनाट' करण्याची भाषा बोलत नव्हता. रिपब्लिकनांच्या राष्ट्रीय परिषदेंत आपलें भाग्य उजळेल, ही गोष्ट त्याच्या मुत्सद्दी मनानें जाणली होती. लिंकन ज्या भूमींतून आला होता, त्या राज्याचा तो एक 'लाडका पुत्र' होता, ह्याबद्दल तर शंकाच नाहीं. आणि प्रत्येकानें आपलें मत लिंकनच्या बाजूनें दिल्यानें ही गोष्ट इलिनॉयसच्या रिपब्लिकन परिषदेंत

केव्हांच सिद्ध झाली होती. तीस वर्षांपूर्वी लिंकन मॅकॉन परगण्यांत आला; तेव्हां त्यानें चिरलेल्या लांकडाच्या दोन फळचा घेऊन हँक्स आणि त्याचा एक मित्र ह्यांनीं मिरवणूक काढली, तेव्हांच ह्या सभेच्या उत्साहपूर्ण वातावरणानें उच्चांक गांठला. प्रतिनिधि तर वेडावून गेले. उत्तरेकडील व पश्चिमेकडील संस्थानांतील सगळींच्या सगळीं मतें 'लांकूडफोडचा' एबला मिळण्याचीच दाट शक्यता निर्माण झाली होती.

१६ मे १८६० ला रिपब्लिकनांची परिषद शिकागो येथें होती. ह्यासाठीं शिकागो शहरांत प्रजासत्ताकवाद्यांची रीघ लागली तेव्हां भावनेचा भर वाढत चालला. चमकदार पोपाखांतले 'वाद्यें वाजविणारे लोक स्यूवर्डनें आणले होते.' 'पूर्ण जागरूक' ह्या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या लोकांचा उमेदवार एब लिंकन हा होता. हे लोक सगळीकडून आले व त्यामुळें मिचिगन अॅव्हेन्यु गजबजून गेला. स्यूवर्डच्या लोकांचा जितका गोंगाट, तितकाच ह्यांचाहि. तैलवस्त्रापासून तयार केलेल्या ऐटदार टोप्या व शाली ह्या लोकांनीं परिधान केल्या होत्या. त्या दिवसा सूर्यप्रकाशांत तळपत होत्या व रात्रीं ते लोक वापरीत असलेल्या घासलेट तेलाच्या दिव्यांत चमकत होत्या.

गाण्याबजावण्यानें, बँडच्या वादनानें व प्रोत्साहनात्मक उत्साह घोषणांनीं शिकागो लेक फ्रंट गजबजून गेलें. जवळपासचीं हॉटेलें धुराच्या फवाऱ्यानीं भरलीं होतीं. तेथें गंभीर वाद चालले होते. हितसंबंधी लोक भल्याबुऱ्या सगळ्या मार्गांनीं राजकीय डाव टाकून आपापल्या उमेदवाराच्या विजयाचा मार्ग आंखीत होते. त्यांच्यांत थर्लो वीड–न्यूयॉर्कच्या राजकारणांतील बडें प्रस्थ–व पेन्सिल्व्हानियाचा राजकीय पुढारी सायमान कॅमेरॉन, हे दोघे मोठे क्लृप्तिबाज होते. थर्लो वीड स्यूवर्डसाठीं प्रचार करीत होता, तर सायमन कॅमेरॉन स्वतःचाच.

खास स्वतःच्या आवडीनें लिंकन स्प्रिंगफील्डमध्येंच राहिला होता. पण लिंकनच्या बरोबर फिरत्या न्यायालयांत असलेल्या डेव्हिड डेव्हिस ह्या थोराड व सदा आनंदी न्यायाधीशाच्या पुढारीपणाखालील त्याचे पुरस्कर्ते त्यांच्या विरोधकांच्याइतकेंच कार्यमग्न किंवा आत्मविश्वास धारण करणारे होते.

आपल्या पुरस्कर्त्यांना लिंकननें असा निरोप पाठविला होता कीं, ‘ मला बंधनांत टाकतील असे करार करूं नका.’

‘ प्रामाणिक एब ’ शांतपणें स्प्रिंगफील्डला बसला होता. आपले पुरस्कर्ते आपल्या वतीनें काय धडपड करताहेत हें त्याला समजलेंच नाहीं. करार निश्चितच झाले होते; त्यांत नव्या मंत्रिमंडळांत घेण्याच्या महत्त्वाच्या कबुल्याहि होत्या. पण ह्या राजकीय जुळवाजुळवीचा शेवट अखेर चांगला झाला. लिंकनचा पराभव झाला असता, तर न भरून निघणारें नुकसान कसें झालें असतें हें अमेरिकन नागरिकांनीं ओळखलें असावें. अतिशय संकटग्रस्त व अटीतटीच्या काळांतील अमेरिकेच्या अध्यक्षपदासाठीं शक्य तितक्या उत्तम पुढाऱ्याची निवड होत होती.

परिषदेच्या कामकाजासाठीं उभारलेल्या ‘ व्हिगव्हाम ’ ह्या तात्पुरत्या लांकडी इमारतीकडे सर्व प्रतिनिधींचें लक्ष लागलें होतें. कोणत्याहि राजकीय परिषदेंत आढळणाऱ्या चमत्कारिक गजबजाटाची रणधुमाळी माणसांनीं गच्च भरलेल्या ह्या इमारतींत चालू होती. ह्या काळांत पहिलीं उमेदवारीचीं भाषणें फारच त्रोटक असत. तेव्हां लवकरच प्रतिनिधींची मतनोंदणी सुरू झाली.

पहिल्या फेरीचें मतदान पुढीलप्रमाणें होतें—स्यूवर्ड १७३$\frac{१}{२}$, लिंकन १०२, कॅमेरॉन ५०$\frac{१}{२}$, चेस ४९, बेट्स ४८. आणि ४२ मतें इतर उमेदवारांत विभागलीं गेलीं होतीं.

ह्यावर प्रतिनिधींनीं मतविभागणीची मागणी केली.

दुसऱ्या फेरींत लिंकनला १८१ मतें मिळालीं. तरी स्यूवर्डला लिंकनपेक्षां साडेतीन मतें अधिक होतीं.

पुन्हा मतविभागणीची मागणी झाली.

एखाद्या उमेदवाराची उमेदवारी निश्चित व्हायला २३३ मतांची गरज होती. तिसऱ्या फेरींत लिंकनला २३१$\frac{१}{२}$ मतें मिळालीं. विजयासाठीं फक्त दीड मताची गरज होती.

इतक्यांत ओहिओचा एक प्रतिनिधि बोलण्यासाठीं उभा राहिला. सभाध्यक्षांनीं त्याला परवानगी दिली.

त्यानें जाहीर केलें कीं, ओहिओच्या प्रतिनिधींनीं श्री. चेस ह्यांना दिलेलीं चार मतें लिंकनच्या बाजूनें बदलून घ्यावीत हें जाहीर करण्यासाठीं मी उभा राहिलों आहें.

ह्यावेळीं उत्साहभरित घोषणा, शिटचा, टोप्यांची व कागदी फुलांची हवेंत फेंकाफेंक, ह्यांनीं सभागृह दणाणून गेलें; व विजयी उमेदवाराच्या नांवानें तोफ उडविण्यासाठीं खोळंबलेल्या माणसाला तोफेची दोरी ओढण्याचा इषारा करण्यांत आला.

स्प्रिंगफील्डला ' इलिनॉयस स्टेट जर्नल 'च्या कचेरींत लिंकन आणि त्याचे मित्र ठेववेल तितका संयम ठेवून निकालाची प्रतिक्षा करीत होते. अचानक तेथें तार आली – ' आपली जीत झाली. परमेश्वराला धन्यवाद. '

ही बातमी ऐकतांच आजूबाजूचे लोक नाचूं–बागडूं लागले, उत्साहभरित झाले व एकमेकाची पाठ थोपटूं लागले. लिंकन त्यांना शांतपणें म्हणाला— " मित्रहो, आमच्या घरांत एक ठेंगणीशी बाई आहे. ही तार पाहायला माझ्यापेक्षां तीच अधिक उत्सुक असेल. आपली हरकत नसेल तर मी जाऊन तिला ही तार दाखवतों. "

\+ + +

अगदीं शंभर टक्के खात्री असतांना सुद्धां एखाद्या निवडणुकीच्या निकालाचा अंदाज आपणास करतां येत नाहीं. पण डेमॉक्रॅटिक पक्षांतील दुफळीमुळें (ह्याचें श्रेय फ्रीपोर्टला लिंकननें दाखविलेल्या चातुर्याला आहे.) रिपब्लिकनांना यश मिळण्याचा चांगला संभव होता. स्टीफन ए. डग्लस हा डेमॉक्रॅटिक पक्षाच्या उत्तरेकडील अनुयायांनीं निवडलेला उमेदवार होता, तर दक्षिणेकडील लोकशाहीवाद्यांनीं जॉन सी. ब्रेकिनरिज ह्याला उभें केलें होतें. ' कॉन्स्टिटच्यूशनल युनियन ' ह्या पक्षाचा पुरस्कार मिळवून उभ्या राहिलेल्या जॉन बेलची कोणीच दखल घेत नव्हतें.

६ नोव्हेंबर १८६० रोजीं ती ऐतिहासिक महत्त्वाची निवडणूक झाली. दक्षिणेकडून संघराज्यांतून फुटून जाण्याच्या धमक्या येतच होत्या. लोकांची रीघ मतदान केंद्राकडे लागली होती. तंग वातावरण निर्माण झालें होतें. ही साधीसुधी निवडणूक नव्हे हें सगळ्यांच्याच लक्षांत येऊन चुकलें होतें.

बहुसंख्य मतांनीं नसलें तरी निवडणुकीस उभ्या असलेल्या उमेदवारांत सर्वांत अधिक मतें मिळवून लिंकन विजयी झाला. मतदानाचे आंकडे पुढील-प्रमाणें होते—लिंकन–१,८६६,४५२; डग्लस – १,३७६,९५७; व बेल–८४९, ७८१. अशाप्रकारें डग्लसबरोबरच्या दीर्घकालीन स्पर्धेत लिंकन विजयी झाला.

अमेरिका ही कोणालाहि उत्कर्षाची संधि देणारी भूमि आहे, हें लांकडी झोपडींत जन्मास आलेल्या लिंकनच्या प्रकरणानें पुन्हा एकदां सिद्ध केलें. ह्याच्यापुढें, फारच थोड्या माणसांना पेलाव्या लागलेल्या जबाबदाऱ्या लिंकन-समोर ठाकल्या होत्या. ह्या थोर जबाबदारीला शोभेशी बुद्धि, भावना व प्रेरणा लिंकनला लाभणार होती. अंतःकरण पिळवटणाऱ्या यादवी युद्धाच्या काळांत अमेरिकेचें नेतृत्व करण्याचें वैभव व शोकजन्यता त्याच्या वांट्याला आली होती. अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांचा नवा अध्यक्ष म्हणून त्याची निवड झाली होती. मेरी लिंकनची महत्त्वाकांक्षा आतां सफल होणार ह्यांत शंका नव्हती. व्हाइट हाऊसची ती सम्राज्ञी होणार होती. अमेरिकन महिलांत तिला अग्रमान मिळणार होता.

# १२

## सर्वांप्रति निर्द्वेष

' अमुचा निरोप घ्यावा – सुखाचा '

—ए. लिंकन.

लिंकननें स्वत: सामानाची बांधाबांध केली व पेटचा-ट्रंकांवर पुढीलप्रमाणें पत्ता लिहिला:–' ए. लिंकन, व्हाइट हाऊस, वॉशिंग्टन, डी.सी. ' स्प्रिंगफील्डचें घर भाडयानें दिलें, व कुत्र्यासाठीं नवीन घर पाहिलें. घोडा आणि गाय हीं विकून टाकलीं. आपल्या लाडक्या सावत्र आईची – साराह् बुश लिंकनची त्यानें अखेरची भेट घेतली. घराच्या छपराच्या लांकडी पट्ट्या नीट राहतील असें बघ, असें त्यानें बिली हर्नडनला सांगितलें. लिंकन व हर्नडन ह्यांच्या व्यावसायिक नात्यांत कोणताच बदल होणार नव्हता. ' जगलों वाचलों तर मी परत येणार आहें; मग आपण मध्यंतरीं कांहींच निराळं घडलं नाहीं, असं समजून पुन्हा एकत्र अगदीं पूर्वीप्रमाणें वकिली करूं या.' लिंकननें बिली हर्नडनला असें सांगितलें.

लिंकन व्हाइट हाऊसमध्यें राहायला निघाला तेव्हांची ही घरगुती हकिकत झाली. ती भयंकर गोष्ट त्यानें कितीहि नाकारली, तरी अगदीं क्वचित्च जेव्हां स्वत:शींच विचार करावयास त्याला वेळ मिळे, तेव्हां तो जो विचार करी, त्यावरून त्याला कळून चुकलें होतें कीं, देश यादवी युद्धाच्या कडयाच्या भयाण टोकापर्यंत येऊन पोहोंचला आहे. कोणत्याहि सन्मान्य मार्गानें हा भयाण सामुदायिक रक्तपात टाळतां आला, तर तो टाळण्याचा सुनिश्चय अध्यक्षपदीं विराजमान होणाऱ्या ह्या व्यक्तीनें केला होता.

११ फेब्रुवारी १८६१ ! लिंकन वॉशिंग्टनला जाण्यास निघाला. वेळ सकाळची होती. पाऊस पडत होता. त्यामुळें हवेंत गारठा आला होता.

वातावरण विशादपूर्ण झालें होतें. विटांनीं बांधलेल्या स्टेशनांत लिंकन आला होता. विस्तीर्ण पश्चिम प्रदेशांतलें तें लहानसें स्टेशन होतें. माल वाहण्यासाठीं एक डबा, धूम्रपानासाठीं स्वतंत्र एक डबा व एक डबा उतारूंचा; अशा तीन डब्यांना इंजिन जोडलें होतें. ही झाली अध्यक्षांची खास गाडी. अगदीं मागच्या दरवाजांत लिंकन उभा राहिला, व त्यानें काळजीपूर्वक पाहून घेतलें. समोर छत्र्यांचा समुद्र पसरला होता, व लोकांचीं तोंडें त्याच्या दिशेलाच होतीं.

तो शांतपणें म्हणाला – “ मित्रहो, मी तुमच्यापासून दूर जात आहें. पण ह्यावेळीं मला किती दुःख होत आहे, हें माझ्या जागीं नसलेल्या कुणालाच उमजणार नाहीं. ह्या जागेचा व येथल्या दयाळू लोकांचा मी सर्वस्वी ऋणी आहें. इथें मी पंचवीस वर्षं राहिलों. माझ्या तारुण्यापासून आतांपर्यंतचा ह्या वृद्धावस्थेपर्यंतचा काळ मीं इथेंच कंठला आहे. इथेंच माझीं मुलं जन्मलीं आणि एक तर इथेंच कायमचं झोपीं गेलं आहे. आतां मी इथून चाललों; केव्हां परत येईन, सांगतां येत नाहीं. कधीं तरी येईन किंवा नाहीं हेंहि सांगतां येणें शक्य नाहीं. वॉशिंग्टनसमोर जी कामगिरी होती, त्यापेक्षां अधिक जबाबदारीची कामगिरी माझ्यापुढें वाढून ठेवलेली आहे. ज्या शक्तीनें मला नेहमीं साहाय्य केलं आहे, त्या दैवी शक्तीच्या साहाय्यावांचून मी ह्या कामगिरींत यशस्वी होऊं शकणार नाहीं. त्या शक्तीचं साहाय्य असेल, तर मला अपयश येणं शक्यच नाहीं. माझ्या सोबत येऊं शकणाऱ्या त्या शक्तीवर श्रद्धा ठेवून, तुमचा निरोप घेऊन व जिथें जिथें कल्याण असेल तिथें तिथें असण्याची उमेद बाळगून तुमच्या सर्वांसह अशी खात्रीनें आशा करतों कीं, सर्व कांहीं सुरळीत होईल. त्या दैवी शक्तीच्या हवालीं मी तुम्हांला करीत आहें. तुम्ही सुद्धां माझ्यासाठीं अशीच प्रार्थना कराल अशी आशा करतों. तुम्ही अमुचा निरोप घ्यावा–सुखाचा.”

गाडीची शिटी वाजली, स्टेशनवरची घंटाहि वाजली, गाडी हळुहळू धुक्यांत अदृश्य झाली. दूर राजधानीच्या दिशेनें ती चालली होती – संकटांतल्या देशाच्या राजधानीच्या दिशेनें.

वि: चरित्र
नों: दि: २३/८/५८

मध्य पश्चिमेंतील लिंकनच्या जीवनाचा आलेख सादर करणें, हा ह्या पुस्तकाचा मुख्य उद्देश. अशा ह्या पुस्तकांत लिंकनच्या अध्यक्षपदीय कारकीर्दींत काय घडलें, ह्याचा नुसता उल्लेख करणें हेंहि चमत्कारिक वाटेल. पण त्यावांचून लिंकनच्या कर्तबगारीला पूर्णत्व कसें आणतां येणार ?

लिंकन स्वभावानें दयाळू होता; व क्रूरता, अन्याय व युद्ध, ह्यांबद्दल त्याला तिरस्कार वाटत होता. ह्या दोन्ही गोष्टींबद्दल लिंकनची ख्याति होती. पण वेळ अशी येऊन ठेपली होती कीं, युद्ध अटळ होतें. फोर्ट सम्टर-वरून मित्रत्वावर तोफा डागल्यानंतर दोन्ही बाजूंच्या – उत्तर संस्थानांच्या व दक्षिण संस्थानांच्या – फौजा आपापल्या सेनापतीच्या आधिपत्याखालीं जमा होत होत्या.

ध्येयवाद व धाडस ह्यांबाबत ह्या दोन्ही बाजूंच्या स्वयंसेवकांत कांहीं फरक करतां येण्यासारखा नव्हता. दोन्ही बाजूंच्या स्वयंसेवकांचीं अंदाजीं वजनें सारखींच होतीं; त्यांची उंचीहि तशीच. केंसांचा रंग सारखा, कातडीचा वर्ण एकच व त्यांचे डोळेहि एकाच रंगाचे. त्यांचें कौटुंबिक प्रेमहि एकमेकांहून भिन्न नव्हतें. ते निघाले तेव्हां त्यांच्या माता रडत होत्या, वडील अभिमान बाळगत होते, त्यांचें ज्यांच्यावर प्रेम होतें अशा मुलीहि मागें राहिल्या होत्या. ह्या सर्वांना मागें सोडून ते आले होते. ज्या उत्साहाचा उपयोग दक्षिण व उत्तर ह्यांना प्रेमानें एकत्र आणण्यासाठीं करावयाचा तो उत्साह ते वयांत आलेले तरुण आणि तारुण्यांत नुकताच प्रवेश करणारे स्वयंसेवक आप्ताचाच गळा दाबण्यास उद्युक्त झालेल्या क्रोधानें पाहण्यांत वांया दवडीत होते. कित्येकदां तर आपल्या विरोधकांच्या शौर्याचेंहि ते कौतुक करीत.

मोठमोठ्या तोफा गर्जूं लागल्या. त्यांतून लागोपाठ गोळे सुटूं लागले. जमिनीवर आणि जलाशयांच्या जवळ बंदुकीच्या गोळ्या येऊन धडकूं लागल्या. दगडी तटाआडून व मातीच्या उंचवट्यांमागून बंदुकांची सणकारी सुरू झाली. लढणारीं माणसें हातांतील बायोनेटांसह दुःखाचा चीत्कार करीत जमिनीवर कोसळूं लागलीं, त्यांच्या प्राणज्योति विझूं लागल्या; पडलेल्यांना पिछाडीला नेण्यांत येऊं लागलें. असें हें अनंत रणकंदन सुरू झालें.

मुसंडीसारखें बुलव्हनचें पहिलेंच युद्ध मौजेखातर पाहण्यासाठीं कॉंग्रेस सदस्य व त्यांच्या बायका जमा होऊं लागल्या; जणूं काय एखाद्या सहलींतलाच हा गंमतीचा प्रकार आहे ! पण दक्षिण संस्थानांचा सेनापति जॅक्सन हा जेव्हां अभेद्य तटबंदीसारखा पुढें सरकूं लागला, व संघराज्याचें सैन्य माघार घेऊं लागलें व नंतर त्याचा पुरा मोड झाला, तेव्हां गंमत पाहण्यासाठीं आलेले गृहस्थ व स्त्रिया ह्यांनीं स्वतःच्या सुबक कपड्यांची पर्वा न करतां त्या खवळलेल्या, व वॉशिंग्टनच्या दिशेनें धांव घेणाऱ्या जमावाशीं मोठ्या त्वेषानें निकराचा लढा दिला.

१८६२ पर्यंत दोन्ही पक्षांचा जवळ जवळ भ्रमनिरास झाला होता. उघड्यावरील युद्धांत सेनॅन्डोहाची दरी, बुलरनची दुसरी लढाई, अँटिएटाम व फ्रेड्रिक्जबर्ग, ह्या लढायांत भयंकर प्राणहानि झाली.

१८६३ पासून कालप्रवाहाची लाट विभक्तांना प्रतिकूल वाटूं लागली. संघराज्यापासून फुटून निघालेल्या दक्षिणेकडील संस्थानांतील गुलाम हे 'जाहीर केल्या दिवसापासून सर्वकाळ मुक्त आहेत, स्वतंत्र आहेत,' असें लिंकननें जाहीर केलें. कांहीं काळानें विक्सबर्गचा पाडाव संघराज्याच्या फौजेनें केला. अटीतटीचा सामना देऊनहि तिच्या फौजांना गेटीस्बर्गकडे माघार घ्यावी लागली.

मॅक्डोवेल, मॅक्लेलॉन, बर्नसाईड, हूकर व मीड ह्यांना आळीपाळीनें सेनापतिपद देऊन लिंकननें पाहिलें. पण अखेर युलिसिस एस्. ग्रॅंट हा त्याला हवा होता तसा सेनापति सांपडला. १८६४ पर्यंत ग्रॅंट दारू पिणें व सिगार फुंकणें, ह्यांतच मस्त राहून निर्दयपणानें छापे घालण्याचें काम करीत होता. पण स्पॉटसिल्व्हानिया कोर्ट हाऊस, कोल्ड हार्बर ह्यांसारख्या निर्जन प्रदेशांतील लढायांत आणि रिचमंड व पेटर्सबर्ग ह्यांच्या आसपास झालेल्या लढायांत त्याने घनघोर युद्ध केलें. ह्यानंतर विभक्तांची राजधानी त्यानें दीर्घ सायासांनीं काबीज केली. ह्याच अवधींत शेरमननें जॉर्जियाच्या भूमींत तहत समुद्रापर्यंत आगडोंब उसळून दिला.

तोफांच्या घनगर्जनेंतूनहि एक चतुर आणि स्निग्ध आवाज वारंवार ऐकूं येत होता. हा आवाज अब्राहम लिंकनचा होता. युद्धाच्या धुमश्चक्रींतहि तो द्वेषभाव कमी करण्याचा प्रयत्न करीत होता.

लिंकनची दिव्यवाणी बोलत होती–

'गुलामांना स्वातंत्र्य देण्यांत आम्हीं स्वतंत्रांना स्वातंत्र्याची ग्वाही दिली आहे.'

पुन्हा हीच वाणी वदली—

'८७ वर्षांपूर्वी आमच्या पूर्वजांनीं ह्या खंडावर एक नवं राष्ट्र वसवलं; तें स्वातंत्र्याच्या अधिष्ठानावर आणि सर्व माणसं जन्मजात समान दर्जाचीं आहेत, ह्या विधानावरील भक्तीनें. आतां आमच्यांत यादवी युद्ध सुरू झालं आहे. त्या अधिष्ठानाचं, त्या भक्तीचं हें राष्ट्र–किंबहुना कोणतंहि राष्ट्र दीर्घकाल जगूं शकतं कीं काय, हें ह्या यादवी युद्धांत कसाला लागणार आहे.'

आणि हीच वाणी–अनंतकाळपर्यंत मूक होण्याआधीं महिन्याभरांत असे भव्य शब्द प्रकट करती झाली कीं, विलक्षण संघर्षकालांत तसें कोणताच सरकारी प्रमुख बोलूं शकला नव्हता—

'सर्वांप्रति निर्द्वेष,–सर्वांप्रति उदारधी–ह्या भावनेनें योग्य काय तें जाणण्याची बुद्धि परमेश्वरानें आपणास दिली आहे, तेव्हां वाजवी जें असेल त्याला दृढ धरून हातीं घेतलेलं काम तडीस नेण्यासाठीं प्रयत्नशील असूं या–राष्ट्राच्या जखमा बांधण्याचं काम आपण हातीं घेतलं आहे; ज्यांच्या जिवावर आम्हीं युद्ध केलं, त्यांच्या विधवांची व पोरक्यांची काळजी वाहण्याचं आम्ही अंगिकारलं आहे; आमच्यांत व इतर राष्ट्रसंबंधांत सर्वकाळ न्याय्य शांति निर्माण होईल व नांदेल अशी गोष्ट साधण्यासाठीं आम्ही बद्धपरिकर आहोंत.'

हें उदारतेचें तत्त्व लिंकननें ४ मार्च १८६५ रोजीं आपल्या उद्‌घाटनपर भाषणांत जाहीर केलें. त्या दिवशीं सोसाट्याचा वारा वाहत होता, पाऊस

पडत होता, ढगांतूनहि बाहेर पडून सूर्यप्रकाश त्याच्या चेहेऱ्यावर विलसत होता. श्रोत्यांपैकीं कांहीं जणांना ही भवितव्याची चाहूल वाटली, ही एक भविष्यवाणी वाटली. त्यांना असें वाटलें कीं, युद्धाच्या कालकूटाभ्रांतून आशेचा सूर्य ह्या भंगलेल्या व धडपडणाऱ्या देशावर प्रकाशत आहे.

अखेर तडफदार रॉबर्ट इ. ली आणि त्याचें सैन्य थकलें, त्यांना अन्न मिळेनासें झालें, औषधोपचारांची सोय होईनाशी झाली, आणि दारूगोळ्याचा पुरवठाहि होईनासा झाला. तेव्हां ९ एप्रिल १८६५ रोजीं तें अप्पोमॅट्टॉक्स कोर्ट हाऊस येथें युलिसिस एस्. ग्रँटला शरण आलें. – संघराज्याचा बचाव झाला. पण त्यासाठीं भीषण मोल द्यावें लागलें होतें ! उत्तरेंत शेताशेतांत, गांवागांवांत आणि शहराशहरांत सुटका आणि आनंद ह्यांचा संमिश्र व कोपायमान असा निःश्वास पसरूं लागला. दक्षिणेंतहि पराभवाच्या कटुतेंतहि दुःखांतून सुटका झाल्याची भावनाच खेळूं लागली. युद्ध संपलें होतें.

पण युद्धाचा शेवट झाला आहे, ही सुवार्ता कानीं पडण्याआधींच फोर्ड थिएटरमध्यें ' आमचे अमेरिकन बांधव ' ( Our American Cousins) ह्या नाटकाचा प्रयोग पाहात असतांनाच एका खुनी माणसाच्या गोळीनें लिंकनचा बळी घेतला होता. पितळेच्या आठ औंसी पिस्तुलांतून ही गोळी सुटली होती व ती जॉन विल्कस बूथ ह्या एक वेड घेतलेल्या नटानें सोडली होती. ह्या गोळीनें – दारिद्र्य, अज्ञान व अशिक्षितपणा ह्यांना तोंड देतां देतां जगांत ज्याला तोड नाहीं अशा थोर, दयाळू व ज्ञानसमृद्ध नेत्याचा अंत केला. लिंकन वांचला असता, तर पुढील पुनर्घटनेच्या काळांतील कटुतेपासून त्यानें देशाला वांचवलें असतें. कारण पराभूत झालेल्या दक्षिणेशीं त्यानें सूडबुद्धीचें वर्तन कधींच ठेवलें नसतें हें ठाम. ' राष्ट्रांच्या जखमा बांधाव्या ' इतकीच त्याची इच्छा होती. लिंकन गेला ! पण लिंकनच गेला नाहीं, तर उत्तरेंतील व दक्षिणेंतील प्रत्येक नागरिकाच्या घरांतलाच एक माणूस गेला होता. त्याच्या मृत्यूनें राष्ट्राचा एक थोर धन्वंतरी व मध्यस्थ हरपला – सर्वांप्रति निर्द्वेष – सर्वांप्रति उदारधी – हें ज्याचें ब्रीद असा धन्वंतरी व मध्यस्थ.


स्प्रिंगफील्ड सोडतांना लिंकननें म्हटलें होतें – “मी कधीं परत येईन, तें सांगतां येणार नाहीं; कधीं तरीं येईन किंवा नाहीं, तेंहि सांगणं शक्य नाहीं.” पण लिंकन परत आला होता; शोकाकुल गाडींतून परत आला होता; त्याला अखेरचा निरोप देण्यासाठीं लहान मोठ्या शहरीं व गांवोगांवीं हजारों लोक एप्रिलच्या दिवसांत आंसूं भरल्या डोळ्यांनीं उभे असतांना लिंकन परत आला होता; इलिनॉयसचा एब लिंकन अनंत कालपर्यंत शांत चिरनिद्रा घेण्यासाठीं आपल्या घरीं परत आला होता.


आणि प्रत्येक वर्षीं एप्रिल महिन्यांत शिरीष पुष्प उमलेल तेव्हां लिंकनचें स्मरण होत राहील.

REFBK-0009838

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 23528 वि: चरित्र
क्रमांक 830 नों: दि: 23/8/58
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 8830
शाखा

## मनपसंत
## लेखनासाठीं





मनांत असूनही अनेकवार अनेक गोष्टीं-मुळें मनपसंत आणि सुलभ लेखन होत नाहीं. मनपसंत लेखनासाठीं मोहरेदार कागद अगर केवळ मनाचा उत्साह असून भागत नाहीं. ह्या गोष्टींबरोबर चांगली लेखणीही असावी लागते. चांगल्या लेखणीची उणीव आजकाल प्लेटो पेन्स भरून काढीत आहेत. प्लेटो पेन्सच्या मृदु व अणीदार नीबमुळें तावच्या ताव कागदावर सुलभ व सफाईदार लेखन करतां येतें.

# plato

चार रुपयांपासून अठरा रुपयांपर्यंत मिळणाऱ्या प्लेटो पेन्सपैकीं कोणतेंही तुम्ही तुमच्या आवडीप्रमाणें निवडूं शकतां.

**म्हात्रे प्रॉडक्ट : PLATO** REGD.

व्यापारविषयक सर्व चौकशीसाठीं
सोल डिस्ट्रिब्यूटर्स
**बेस्ट फाउंटनपेन डेपो**
७९, देवकरण मॅन्शन
प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई २.

Shilpi-m.p-mar-468